किशोर

मे १९७४ • रु. १·२५





PRATIBHA 2318-20 MAR

श्री. बापूराव नाईक यांनी हे मासिक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकरिता उषा ऑफसेट प्रिंटर्स प्रा. लि. नॅशनल हाऊस, ६ ट्यूलॉक रोड, मुंबई १ येथे छापले आणि म. रा. पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, सेनापती बापट मार्ग, पुणे; ४, येथे प्रकाशित केले.

किशोर

वर्ष ३ रे   अंक ५ वा

मे १९७४


संपादक :
श्री. चिं. गो. सहस्रबुद्धे, संचालक

प्रकाशक :
श्री. बापूराव नाईक, नियंत्रक

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे ४

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :
श्री वसंत शिरवाडकर   कार्यकारी संपादक
द्वारा नियंत्रक, पाठ्यपुस्तक मंडळ,
'नीलम' १०८, वरळी सी फेस रोड,
मुंबई, १८.

वार्षिक वर्गणी रु. १२   किरकोळ अंकाची किंमत १ रु २५ पैसे



अदृश्य करणारा कडब्याचा कोट : माधुरी भिडे ... २
(जपानी परीकथा)
दर्पणपटल व गरुडविमान : कृती : सदानंद काळे ... ५
विदूषक : ह. शि. खरात ... ६
पुरुषांची बरोबरी : निर्मला देशपांडे ... ६
वसंत ऋतू : अनंत कांबळे ... ७
पुन्हा सगळे हिरवेगार करावे : दि. बा. मोकाशी ... ८
को-आईचा बूट : शान्ता ज. शेळके ... ११
(एक चिनी लोककथा)
कबूल बाबा, कबूल ! : वामन चोरघडे ... १५
सुंदर दुनिया : यशवन्त ... १७
इसापचा दिग्विजय : पु. रा. बेहेरे ... १८
भारताचा इंग्लंड दौरा : बाळ ज. पंडित ... २३
आबुराव ढबुराव : म. वि. कोल्हटकर ... २६
टाइपरायटरचा निर्माता : ख्रिस्टोफर शोल्स :
प्रा. ना. वा. कोगेकर ... ३२
सुट्टीत शिकायचे : भालचंद्र कडणे ... ३४
असे हे विलक्षण जग : ... ३५
सृष्टीतील नवलकथा : प्रकाश साटम ... ३७
आकाशदर्शन : बाबूराव प. सावे ... ३८
तुमचा शब्दसंग्रह वाढवा : ... ४१
तुफान : लीलाधर हेगडे ... ४२
चित्रबोध-शब्दशोध ... ४८
मुखपृष्ठ : राम वाईरकर ... ४८
आतील सजावट : प्रभाशंकर कवडी, रवी परांजपे, पद्मा सहस्रबुद्धे, राम वाईरकर, शशिकर तेंडुलकर, रमेश उमरोटकर, श्याम जोशी, ज्ञानेश सोनार, किशोर पेंढरकर, श्रीनिवास प्रभुदेसाई.

अदृश्य करणारा कडब्याचा कोट

: सौ. माधुरी भिडे :

जपानमधल्या एका छोट्याशा खेड्यातली गोष्ट आहे ही. ह्या छोट्याशा खेड्यात एक उनाड माणूस रहात होता. त्याचे नाव ओटोको सान. सान म्हणजे जपानी भाषेत श्रीयुत, श्रीमती किंवा कुमारी. तर हा ओटोको सान मोठा खोडकर होता. काही ना काही खोड्या करून सर्वांना त्रास द्यायचा हाच त्याचा उद्योग.

एक दिवस ओटोको एक बांबू घेऊन त्याची नळी बनवीत बसला होता. आधी त्याचा बेत होता की, ह्या नळीतून खडे मारायचे. पण मग त्याला वाटू लागले की, दुर्बिण म्हणून ह्या नळीचा चांगला उपयोग होईल. त्याने लगेच नळी डोळ्याला लावली आणि तीतून तो बघू लागला.

तेवढ्यात एक तेंगू उडत उडत तिथे आला.

—तेंगू म्हणजे एक प्रकारचा परी-माणूस. त्याचे नाक लांब असते, त्याला पंख असतात. त्याच्या डोक्यावर एक काळी टोपी असते आणि शिवाय त्याला जादू पण येते.

आता खरे म्हणजे शहाण्या माणसाने तेंगूच्या वाटेला जाऊ नये. पण ओटोकोने मात्र ह्या तेंगूची खोडी काढण्याचे ठरवले.

झाले. ओटोकोने ठरवले की, ह्या तेंगूला फसवायचे आणि त्याच्या अंगातला कोट मिळवायचा.

लगेच तो दुर्बिणीतून काही फार मोठी गंमत दिसत असल्या-सारखे दाखवू लागला.



तेंगूलाही तो काय पाहातो आहे ह्याची उत्सुकता वाटली आणि तो जवळ येऊन म्हणाला,

"काय रे, बघतो आहेस? मला बघू दे की!"

"माझी नवी दुर्बिण तुला देऊ?" ओटोको मोठ्या ताठ्यात म्हणाला, "वा रे वा! बघ चंद्र काय स्पष्ट दिसतोय ह्यातून!"

"दे की रे." तेंगू म्हणाला, "माझी हॅट आणि बूट देईन मी तुला."

"हॅट!" असे म्हणून ओटोको दुर्बिणीतून बघतच राहिला.

"मग हा कोट देऊ का माझा?" तेंगू म्हणाला.

ओटोकोला तेच हवे होते. त्याने दुर्बिण तेंगुला देऊन टाकली आणि कोट घेऊन पळ काढला.

बिचारा तेंगू दुर्बिणीतून पाहू लागला, तो काहीच दिसेना! कुठला चंद्र आणि कुठले काय.

जरा दूर गेल्यावर ओटोको सानने कोट अंगात घातला आणि काय नवल? तो एकदम अदृश्य झाला!

ओटोकोच्या आनंदाला पारावर राहिला नाही.

तो रस्त्यातून मजेत धावत सुटला. लोकांच्या पायांत पाय अडकवून त्यांना पाडावे. त्यांची नाकेच ओढावी. एखाद्या फेरीवाल्याची टोपलीच पाडून टाकावी—मजाच मजा.

बिचारे रस्त्यातले लोक अगदी चकित होऊन गेले. दिसत तर कोणीच नाही, आणि हे काय प्रकार होताहेत तेच त्यांना कळेना.

तेवढ्यात तिथून एक मोठा सरदार जाताना दिसला. ओटोकोने पटकन् त्याचा डावा कान ओढला. तो रागाने मागे वळून पाहू लागला; तेवढ्यात ओटोकोने त्याचा उजवा कान धरून त्याला गरकन् गोल फिरवला. तो धपकन रस्त्यात पडला. ही गंमत पाहून लोक पोट धरून हसू लागले. सरदार खूप चिडला. पण करतो काय! तिथे तर कोणीच दिसत नव्हते.

ओटोको पुढे चाललाच होता.

मोजे घालून चाललेल्या एका माणसाच्या हातांतले मोजे त्याने पळवले, एका मुलीची छत्री पळवली आणि दोन्ही रस्त्याच्या



कडेला गटारात टाकून दिली. एका कोळणीच्या टोपलीतले मासेही त्याने पळवले. उडत जाणारे मासे पाहून लोक धावले; पण मासे उडत उडत त्यांच्या पायांवरच पडू लागले.

खूप मजा केल्यावर ओटोको घरी गेला. हळूच दाराआड लपून याने आपला कोट काढला. दारातून कोणी आले नसताना ओटोकोला खोलीत पाहून ओटोकोंची आई बिचारी चकित झाली. तिला काहीच न सांगता ओटोको जेवण आटपून स्वस्थ निजला.

आई आपले काम आटपून घर आवरू लागली, तेव्हा तिला दारामागे तो कडब्याचा विणलेला कोट सापडला.

"हरे रामा, कसला घाणेरडा कोट हा!" चिमटीत कोट उचलीत आई म्हणाली, "थांब बाई, ओटोको उठायच्या आत जाळूनच टाकते."

आणि आईने तो कोट चुलीत जाळून टाकला.

जरा वेळाने ओटोको उठला आणि कोट शोधू लागला. पण कोट काही सापडेना. ओटोको भयंकर चिडला आणि कोट जाळल्याचे आईने सांगितल्यावर तर—अरे बापरे! त्याने थैमानच घातले.

आरडा ओरडा करून दमल्यावर ओटोको चुलीकडे जाऊन पाहू लागला. कोटाची राख अजून चुलीतच होती. ओटोकोला वाटले कदाचित अजूनही त्या राखेत थोडी जादू शिल्लक असेल.

त्याने ती सगळी राख गोळा केली. मग बागेच्या एका कोपऱ्यात जाऊन त्याने आपले कपडे काढून टाकले आणि राख आपल्या अंगाला चोपडली.

आणि काय नवल? तो लगेच अदृश्य झाला!

ओटोको खूष झाला; आणि पुन्हा काहीतरी गंमत करायचे ठरवून बाजारात गेला.



'किशोर-कॅमल' रंगस्पर्धा

फेब्रुवारी १९७४

बक्षिसांचे विजेते :

१. **पहिले बक्षीस : रुपये पंधरा**
कु. नितीन भालचन्द्र साने, अहमदनगर.


२. **दुसरे बक्षीस : रुपये दहा**
कु. विवेक जोसेफ नावगिरी, नागपूर—४.

३. **तिसरे बक्षीस : रुपये पाच**
कु. विक्रम चिंतामणि केळकर, सातारा—२.

४. **'कॅमल'—उत्तेजनार्थ बक्षिसे : पाच**
कुमारी पुष्पलता यशवंत भगत, वरगाव (गोवा)
कु. चारुदत्त अंकुश पाटकर, मुंबई—२८.
कुमारी रश्मी जगदीश चेंबुरकर, मुंबई—७१.
कु. संजय चन्द्रकांत पाटील, कोल्हापूर.
कुमारी ज्योती शंकर परब, मुंबई—५७.

५. **'किशोर'—उत्तेजनार्थ बक्षिसे : पाच**
कु. प्रकाश विश्वनाथ मोरे, मुंबई—७१.
कु. बाळासाहेब लक्ष्मण पुणेकर, विटा (सांगली)
कु. प्रशांत बाळकृष्ण केणी, मुंबई—७१.
कु. सुबोध वसंत बेडेकर, मुंबई—१६.
कुमारी मनिषा अर्जुन दळवी, मुंबई—५७.

६. **'कॅमल'—प्रशस्तिपत्रे : दहा**
कु. सुहास सुधाकर कुलकर्णी, मुंबई—६६.
कुमारी भारती केशव मांजरेकर, मुंबई—१५.
कु. प्रभाकर शिवाजीराव जोशी, जळगाव.
कुमारी रोहिणी वसंत वैद्य, चरई, ठाणे.
कु. किशोर रामकृष्ण नेरुरकर, मुंबई—६२.
कुमारी गायत्री शामराव साखरे, तासगाव (सांगली)
कु. राजदत्त अंकुश पाटकर, मुंबई—२८.
कु. अनिल माधव परांजपे, पुणे—३०.
कुमारी प्रतिमा मनोहर जोशी, भाईंदर (ठाणे)
कुमारी प्रगती मधुकर वेलणकर, मुंबई—२२.



बाजारातल्या दारूच्या दुकानातून सुरेख वास सुटला होता. ओटोकोने वास ओळखला. सेक नावाच्या भातापासून बनवलेल्या दारूचा तो वास होता.

ओटोको दुकानात शिरला आणि दारूच्या पिंपाजवळ जाऊन नळाला तोंड लावून दारू पिऊ लागला.

कसला आवाज येतोय् म्हणून सारेजण पाहू लागले तो; गंमतच दिसली !

दारूच्या पिंपाचा नळ उघडा; पण उगीच बारीक धारेने दारू गळतेय्. आणि एक लहानसे कुत्रे ती प्यायला येतेय.

दुकानाचा मालक कुत्र्याला हाकलून नळ बंद करण्यासाठी उठला. तेवढ्यात नळाजवळ एक ओठांची जोडी दिसू लागली. मग जरा वेळाने ओठांभोवतीचा भाग, नाक आणि डोळे पण दिसू लागलेत. आणि जमिनीवर गळणाऱ्या दारूजवळ जमिनीवर ठेवलेले दोन हात दिसू लागले.

मालकाने घाबरून किंकाळी फोडली. त्याबरोबर दोन लालसर डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिले आणि एक चेहरा हातांची एक जोडी बाहेर पळत सुटली.

गंमत काय झाली होती की, त्या कोटाची राख कोरडी होती तोंवर तिच्यात जादू होती. पण ती ओली झाल्याबरोबर तिची जादू नाहीशी झाली.

नुसता चेहरा आणि हात दिसत असलेला ओटोको पुढे पळत होता आणि "पकडा, पकडा !" असे ओरडत लोक त्याच्या मागे लागले होते.

आता ओटोको दमला होता. घामाने भिजला होता. जशी जशी त्याच्या अंगावरची राख ओली होऊ लागली होती तशी तशी त्याची कातडी मधून मधून दिसू लागली. शेवटी धावत धावत तो नदीशी आला आणि त्याने पाण्यात उडी टाकली. चोळून चोळून अंगावरची सगळी राख धूवून टाकली आणि पूर्वीसारखा दिसू लागल्यावर ओटोको कुडकुडत बाहेर आला.

एका माणसाने दयाळूपणाने त्याच्या अंगावर एक किमोनो टाकला.

सगळे लोक त्याच्याभोवती जमले. हसून त्याची थट्टा करू लागले. काय प्रकार आहे ह्याची चौकशी करू लागले.

ओटोकोने शरमेने खाली मान घातली आणि हळूहळू सगळी हकिकत सांगितली.

लोक हसून म्हणाले,

"भले बहाद्दर ! तेंगूला फसवायला बघत होता शहाणा. चांगली फजिती झाली."

ओटोको सानच्या खोडकर स्वभावात ह्यानंतर काही सुधारणा झाली की नाही,ते मात्र माहीत नाही.

■ ■ ■

माझ्या बालमित्रांनो, नमस्ते—

प्रथमतः मी तुम्हा सर्वांचे या पत्राद्वारे आभार मानतो. कारण 'किशोर'मध्ये माझा 'दिल्ली विजय' प्रसिद्ध झाल्यापासून आपणांपैकी अनेकांनी माझा पत्ता शोधून काढून, भेटून व पत्राद्वारे माझे अभिनंदन केलेत.

आपणांपैकी अनेकजणांनी माझ्या वस्तूंची माहिती विचारली. परंतु ती सर्वांना पत्राद्वारे करून देणे केवळ अशक्य असल्याने या लेखाद्वारे ती करून देत आहे. ती वाचून आपण सर्वजण सुट्टीत त्या वस्तू करण्याचा प्रयत्न करालच. आपल्या प्रयत्नात काही अडचणी आल्याच तर माझ्या खालील पत्त्यावर जोडकार्डासह लिहून कळवल्यास मी आपल्याला आवश्यक ती माहिती आनंदाने कळवीन.

तुमचा प्रिय मित्र
सदानंद काळे

माझा पत्ता : कुमार सदानंद काळे
द्वारा श्री. विनायकराव काळे
शास्त्र प्रचारक,
१/४ शुक्रवार पेठ, जगतापवाडा,
रामेश्वर चौक, फुले मंडईजवळ,
पुणे २. (४११ ००२)

दर्पणपटल व गरुडविमान : कृती

: सदानंद काळे :

दर्पणपटलाची कृती :

साहित्य : थर्मोकोलचे एक व अर्धा सेमी जाडीचे तक्ते, एकधारी पाते, कार्डशीट, ट्रेस पेपर, फ्रेमरहित आरसा, वेलवेटचे कापड, रंगीत रेशमी कापड, रंग, टाचण्या इत्यादी.

कृती : प्रथम ५० सेमी × ३० सेमी × १ सेमी या मापाचा थर्मोकोलचा तक्ता कापून घेतला. त्याच्या दोन्ही बाजूंस ३० सेमी उंचीचे थर्मोकोलचे तक्ते टाचण्यांनी जोडले. मग अरुंद बाजूस ३२ सेमी रुंदीचा व ३० सेमी उंचीचा तक्ता टाचण्यांनी जोडला. तेंव्हा माझ्या 'राहुल' चित्रपटगृहाचा पाया व तीन भिंती तयार झाल्या. पाया आकर्षक करण्यासाठी त्यावर पिवळे वेलवेट कापड लावले. नंतर त्यावर कार्डशीटच्या खुर्च्यांच्या रांगा करून बसवल्या आणि त्यांच्या समोरील बाजूस आरसा बसवला.

यानंतर पुढील बाजूने २० सेमी उंचीवर येईल अशा बेताने उतरता थर्मोकोलचा तक्ता टाचण्यांच्या साहाय्याने बसवून दुसरा मजला तयार केला. त्यावरही वेलवेट अंथरून खुर्च्यांच्या रांगा बसवल्या. या मजल्याची लांबी १५ सेमी ठेवली व त्यासमोर १० सेमीवर ट्रेस कागदाचा बनवलेला पडदा थर्मोकोलच्या फ्रेममध्ये चिकटवून अशा रीतीने बसवला की त्याची प्रतिमा खालील आरशात तळमजल्यावरून व्यवस्थित दिसेल.

नंतर मागील बाजूच्या भिंतीवर, मध्य व पुढील बाजूस ३२ सेमी पाय असलेले व १० सेमी उंची असलेले त्रिकोणी थर्मोकोलचे तक्ते टाचण्यांनी उभे बसवून त्यांवर ०·५ सेमी जाडीच्या तक्त्याचे छप्पर घातले. पुढील बाजूस व इतरत्र रंगवून दारे खिडक्या दाखवल्या.

कार्य : वरील मजल्यावरून छोट्या चित्रपट दर्शकाने (फिल्म स्ट्रीप प्रोजेक्टरने) पडद्यावर चित्र दाखवले असता ते खालील मजल्यावरील प्रेक्षकांना आरशात पाहावयास मिळते.

माझ्या पहिल्या लेखात या दर्पणपटलाचा फोटो व आकृती आली आहे. तिच्या साहाय्याने हा नमुना आता तुम्हांला तयार करता येईल अशी खात्री वाटते.

गरुडविमानाची कृती :

साहित्य : कुंचाची काडी, पातळ पत्रा, बारीक तार, बुचाच्या चकत्या, बांबूच्या बारीक काड्या व पट्ट्या, पातळ कागद, रबर बॅण्डस्, लाकडी बारीक चौकोनी तुकडा, एक मणी इत्यादी.

कृती : कुंचाची २८ सेमी काडी घेतली. तिला पुढील बाजूस पत्र्याची पट्टी दोऱ्याने काटकोनात वाकवून पक्की बांधली. तिच्या जवळ तारेचा आकडा काटकोनात वाकवून पक्का बांधून पाय तयार केले. या पायात पुठ्ठ्यांची दोन चाके करून त्यांच्या दोन्ही बाजूंना रबरी चकत्या घालून ती पायांत बसवली.

लहान पातळ लाकडी चौकोनी तुकड्यात काड्यापेटीच्या खणाच्या पातळ पट्ट्या एकमेकांस कोन करून बसवल्या. या तुकड्याच्या मध्यातून तार घालून तिचे एक टोक ठोकळ्यात पक्के बसवले व दुसऱ्या टोकात मणी ओवून त्यास हुकाचा आकार दिला.

काडीस जोडलेल्या पत्र्यास छिद्र पाडून त्यात पंखा अडकवला. काडीच्या दुसऱ्या टोकास तार पिळून ती वाकवून लहानसा हूक तयार केला. या व पंख्याच्या हुकांत रबर बॅन्डस्‌ची माळ करून ती अडकवली.

बांबूच्या पातळ काड्या व पट्ट्या वापरून मागील लेखातील चित्रात दाखवल्याप्रमाणे पंख व शेपूट तयार करून घेऊन ते काडीवर पक्के बसवून माझे गरुडविमान तयार केले.

कार्य : डाव्या हातात काठी धरून, उजव्या हाताने पंख्यास पीळ द्यायचा व गुळगुळीत जमिनीवर विमान ठेवून वाऱ्याच्या दिशेकडे तोंड करून पंखा फिरू लागताच विमान अलगदपणे सोडावे. म्हणजे माझ्या 'गरुडाची झेप' पाहाण्याचा आनंद तुम्हांस लाभेल.

मला कळवा बरं का तुमचे विमान कसे उडाले ते !

विदूषक

नाव
कलंदर
डोके बिलंदर
डोळे
गरागरा
दात
कराकरा
जीभ
अघळपघळ
पोट
ढगळढगळ
नाक
बसके ठुसके
गाल
रुसके फुसके
पाय
झपाझप
हात
लपालप
हसवतो सर्वां
चेहरा मात्र रडवा ?

—ह. शि. खरात



पुरूषांची बरोबरी



मनीमावशी
उंद्रामासी
झुरळाकाकी
ऐकाच
पुरुषांसारख्या मिशा ठेवल्यात
तरी तुम्ही
बायकाच !
जिथ्थंतिथ्थं बरोबरी—
पुढेच एक पाय
बायकांसारख्या बायकांना
हे शोभतं काय ?





—निर्मला देशपांडे



वसंत ऋतु

चैत्र वैशाख
वसंत ऋतू
आंबे फणस
गोड गोड काजू—

चैत्र वैशाख
वसंत ऋतू
मोरांचा नाच
अन् कोकिळेची कुहूकुहू—


चैत्र वैशाख
वसंत ऋतू
तिन्हीसांजेला
हंबरते वासरू—

चैत्र वैशाख
वसंत ऋतू
उन्हांतून येऊन
सावलीत बसू—

चैत्र वैशाख
वसंत ऋतू
दर्याला गाज
आणि चंद्राला हसू—

चैत्र वैशाख
वसंत ऋतू
चैत्र वैशाख
वसंत ऋतू—

— अनंत कांबळे



पुन्हा सगळे हिरवेगार करावे

: दि. बा. मोकाशी :

चातुर्मास हे सुवासांचे महिने. चातुर्मास हा सणांचा व फुलांचा ऋतू. पूजाव्रते व सण आणि फुले यांचा किती सुंदर मिलाफ या महिन्यात करण्यात आलेला आहे!

चातुर्मासांतील कोकणातला तो सरीवरसरींचा पाऊस! वेली-वेलींवर, झुडपाझुडपांवर, झाडाझाडांवर फुले बहरतात. घराभोवतालच्या करवंदीच्या काटेरी वयाही आपले काटे विसरून फुले जोपासतात. बांधांवरून फुललेले गवती तुरे, हिरव्या शेतांना नक्षीदार काठ विणतात. धबधब्यांनी चकाकणाऱ्या डोंगरावर पिवळ्या निळ्या जांभळ्या रानफुलांचे पडदे सोडलेले असतात. ओली हवा फुलांच्या वासांनी थबथबून गाते. मधमाश्या आणि भुंगे इकडून तिकडे, वेडेवाकडे, नागमोडी उडत असतात. जणू फुलांचे सुवास पिऊन ते बेभान होत असावेत. फुलांनी वातावरणात सुवास भरावे आणि पावसांनी ते धुऊन काढावे अशी चढाओढ लागते. शेवटी पाऊस पडून पडून थकतो. मग धुक्याला चिकटून फुलांचे सुवास येतच राहतात.

चातुर्मास आला की कोकणात गेलेल्या माझ्या बालपणीच्या आठवणी मनात गर्दी करतात. या चार महिन्यांत सणामागून सण आणि व्रतामागून व्रत येत राहात. त्यासाठी फुले गोळा करण्याचे काम मुलामुलींकडे असे. आणि फुले तरी किती लागत? लाख लाख. कारण घरात कुणी ना कुणी देवाला लक्ष फुले वाहण्याचा नेम केलेला असायचा. पण लाख फुले म्हणजे काही वाटायचे नाही. आम्ही मुलेमुली परड्या भरभरून फुले वेचून आणायचो. लक्ष वहायला प्राजक्तासारखे दुसरे फूल नाही. पारिजातकाखाली, काळ्या लाल चिखलावर फुलांचा दाट सडा पडलेला असायचा. शेजारच्या रुक्मिणीच्या दारी हाच सडा पाहून सत्यभामा रुसली होती. आम्ही मुले त्या फुलांवर तुटून पडायचो. हाताच्या स्पर्शानेही पाहाता पाहाता मलूल पडणारी ती प्राजक्ताची फुले, नाजूक हळुवार बोटांनी उचलून परडीत ठेवताना सुगंधाने श्वास दरवळून जायचे.

आमच्या गावातीलही फुले मंगळागौरीच्या आरतीत आली

आहेत. यातील पहिल्या कडव्यांतील जवळजवळ सर्व फुले आमच्या गावात होती. पहिले कडवे असे आहे.

॥ जयदेवी मंगळागौरी ॥ पूजेला ग आणिली ॥
॥ जाईजुईच्या कळ्या ॥ सोळा तिकटी दूरवा ॥
॥ सोळापरीची पत्री ॥ जाईजुई अबोल्या ॥
॥ शेवंती नागचाफे ॥ पारिजातके मनोहर ॥
॥ गोकर्ण महाफूले ॥ नंदेटे तगरे ॥ पूजेला ग आणिली ॥

यात कमळाचे फूल नसावे याचे मला आश्‍चर्य वाटे. कारण आमच्या गावाभोवती तीन तळी होती व ती पाण्यापेक्षा कमळांनीच जास्त भरलेली वाटत. घराघरात बसणाऱ्या गौरी कमळांनीच रचल्या जात. चांगली पुरुषभर उंच रास रचीत. ही कमळे खुडण्यासाठी मोठी माणसे तळ्यात शिरत. मुले काठावर बसून पाहात.

कमळांच्या सपाट पसरलेल्या पानांमुळे तळ्याचा पृष्ठभाग काठावरून हिरव्या कागदासारखा दिसे व त्यावरची कमळे चित्र काढावी तशी वाटत. उंच उभ्या देठाची कमळे ही हौशी बाईने अंबाड्यात खोवावी तशी खोवलेली वाटत. कधी आम्ही मुले मोठ्यांमागोमाग तळ्यात शिरत असू. मग कमळाच्या वेली पायांत अडकत आणि चिखलात पाय रुतू लागले की भीती वाटे, काठावरून एवढीशी दिसलेली पाने अजस्र दिसत. कमळाचे पान म्हणूनच पूर्वी पत्र लिहिण्यास वापरीत होते. कमळ खुडले की आळवासारखे त्याचे लांब देठ कुरूप वाटे. पाकळ्या बटबटीत वाटत. तळ्यात आपण पुढे पुढे जावे तशी बदके संथपणे सरकत दूर जात. समोरच्या काठाशी एखादा बगळा एका पावलावर उभा असे. त्याला बकध्यान म्हणतात. यांत एखादा हंस आलेला दिसेल असे नेहमी वाटे. मोठा बगळा उडत येताना दिसला की आम्ही 'हंस हंस' ओरडत धावत असू. पाण्यात तळ्याच्या मध्यावर उभे राहून आकाशाकडे पाहिले की निळ्या नि हिरव्या अशा दोन अजस्र काचांत उभे राहिल्यासारखे वाटे.

आमच्या गावातील मंगळागौरीच्या आरतीत न आलेली फुले म्हणजे, सायली, चमेली, मोगरा, तेरडा, रातराणी, शंकासूर, कण्हेर, नेवाळी, सदाफुली, बकुळ व चाफा. चाफ्याला वारेमापे फुले, पण झाड ठिसूळ. मुले झाडावर चढली तर मोठी माणसे ओरडत. ती फुले काठीने पाडायची. चाफ्याच्या फुलांच्या आत सुंदर पिवळा तांबूस रंग दिसतो त्याचे नवल वाटे. हारामध्ये मध्यावर चाफ्याचे फूल शोभून दिसे. चाफ्याच्या फुलांच्या पाकळ्या दुमडून मध्यावर एकत्र आणून त्यांचा हार करत.



बकुळीची फुले नाजुक. वेचता वेचता एखाद्या पानाचे देठ मोकळे करून त्यांत ती ओवीत असू. बकुळीचे फूल उचलले की त्याच्या देठाच्या भोकातून एखादी काळी मुंगी बाहेर डोकावे. फुंकर घालून आम्ही तिला तिच्या मधुघटातून बाहेर उडवून आतील मध चाखीत असू. फूल चोखताच इवलासा थेंब जिभेवर उतरे. फिक्कट गोड सुवासिक अशी त्याची चव तोंडात फिरत राही. बकुळीच्या भोवती नेहमी मधमाश्या फिरत. वर त्यांचे एखादे पोळेही असे.

फुले वेचून आणली की हार आणि वेण्या करण्याचा मोठा समारंभच चाले. फुलांच्या वेगवेगळ्या राशी घालून भोवती मुली बसत. हारांत ओवावयाच्या फुलां बद्दल वाद होत. एकीकडे भराभर सुयांतून फुले सरकत

हार बनू लागत. मधून एखादी मुलगी सुई टोचली की सू—हाय ! करी.

प्रत्येक देवाचे आवडते फूल होते. जणू फुले कमी पडतात असे वाटून पानेही फुले केली होती. तेही चूक नव्हते. कारण निसर्गाच्या दृष्टीने फुले ही पानाचीच उत्क्रांती. निसर्गाने पुनरोत्पत्तीसाठी केलेली योजना. पानांत बेल, आघाडा आणि दूर्वा महत्त्वाच्या. गणपतीची आवड दूर्वांची, तांबड्या फुलांची आणि केवड्याची. शंकराला बेल आणि पांढरी फुले तर तुळस ही विठ्ठल आणि विष्णू या दोघांना प्रिय. रामाचा दवणा लाडका. कृष्णाची वैजयंती. शंकराला बेलच का आवडतो किंवा गणपतीला दूर्वा का आवडतात इत्यादीबद्दलच्या कहाण्या आम्हांला ठाऊक झाल्या होत्या. सत्यभामा व रुक्मिणी यांची कथा मुलींना फार आवडे.

देवांच्या आवडी अशा ठरलेल्या होत्या. घरांतील मुलींना व स्त्रियांना फुले तर आवडतच; पण पाने व मंजिऱ्याही आवडत. देवांना वाहून उरलेली सर्व फुले व मंजिऱ्या त्यांच्या केसांत विराजमान होत. एवढेच नव्हे तर वईबोळांतून जाताना फूल दिसले की मुली ते पटकन खुडून डोक्यात खोवीत. मग आधी कितीही फुले डोक्यात खोवलेली असोत! लहान मुली जाता जाता गुलबाक्षीची फुले खुडून परकराच्या झोळीत ठेवीत आणि चालता चालता त्यांची लांब डेखे गुंफून वेणी तयार करीत.

प्रत्येक घराभोवतालच्या आवारात व परसात इतकी फुले होती की वेचणारे कमी पडत. सकाळी फुले वेचावी आणि तासाभराने पुन्हा तेथून जावे की पखरण पडलेली दिसे. कुणाच्याही आवारात शिरावे व हवी तेवढी फुले खुडावी. कुणी ओरडत नसे. आपणच वाटले तर ओरडावे—फुले घेतो हं !

त्या वेळी आखीव रेखीव आणि विशिष्टच फुले लावलेल्या बागा नव्हत्या. त्याबरोबरच, 'हे माझं—मी लावलेलं—माझ्या मालकीचं' ही भावना नव्हती. जे उगवले ते देवाने उत्पन्न केलेले होते. देवांसाठी ते कुणीही न्यावे.

या सर्वांत तुळशीची काही निराळी तऱ्हा होती. तुळशीची जागा ठरलेली—अंगणांतील तुळशीवृंदावनात. क्वचित् तिची रोपे लावीत. कुणी हात न लावील अशा कोपऱ्यात. तिची पाने पूजेसाठी व औषधासाठी होती. रोज तिची पूजा व्हायची आणि दिवाळीनंतर थटामाटात तिचे लग्न लागायचे. पुन्हा एकदा फटाके उडवायला चॉन्स मिळायचा. वईत उगवलेली तुळस आढळली तर आश्चर्य वाटायचे. ती तेथून काढून तुळशीवृंदावनात लावली जायची.

त्या काळी दारातून बाहेर पडताच सगळा बगीचाच सुरू होई. तो आमच्या परसातून, बोळातून मागच्या शेतांमधून पार डोंगरापर्यंत पसरलेला होता. टेबलावर फुले ठेवण्याची पद्धत नव्हती. कारण एकतर टेबले नव्हती. आणि फुलांची रचना करायचीच तर त्यासाठी देवघर होते. फुलाफुलांत उणे-अधिक नव्हते. सगळ्या फुलांवर सारखे प्रेम. फुलांना पाय लागला किंवा वास घेतला तर ती देवांना चालत नसत.

इतक्या वर्षांनंतर त्या काळाकडे पाहिले की तो काळ भासाचा किंवा कालिदासाचा वाटतो. सर्व काही पाने, फुले, फळे, वृक्ष, लता यांचे बनलेले होते. आता तो आमच्या वेळेचा परिसर उजाड झाला आहे. निदान आम्हांला तरी फार उजाड वाटतो. भावनेमुळे तसे वाटते असे धरले तरी खरोखरीच आमच्या वेळच्या प्राजक्ती, बकुळी, चाफे आता वठले आहेत. परसू व अंगणे, डोंगर उदास झाले आहेत यांत शंका नाही. पावसाळ्यात आता मुले फुले गोळा करीत हिंडताना दिसत नाहीत. तळी मातीने भरली आहेत. अर्थातच बदके, कमळ किंवा इतर पक्षी यांचा पत्ता नाही. रवीन्द्रनाथ टागोरांनी म्हटल्याप्रमाणे आम्ही पृथ्वीचा हिरवा शालू काढून घेतला आहे. हा हिरवा शालू तिला परत नेसवल्याशिवाय आपण सुखी होणार नाही असे त्यांनी पुढे म्हटले आहे.

त्यामुळेच मला कधी कधी ऊर्मी येते की नाना तऱ्हेच्या बिया घेऊन हेलिकॉप्टरमध्ये बसावे आणि त्या परिसरावर बिया टाकाव्यात, जाऊ तिकडे बिया पेरीत जावे. पुन्हा सगळे हिरवेगार करावे !



(एक चिनी लोककथा)



को-आईचा बूट

: शान्ता ज. शेळके :

चीन देशाची राजधानी पेकिंग हे एक फार प्राचीन, इतिहास-प्रसिद्ध असे शहर आहे. शहराभोवती एक तट बांधलेला आहे. तटाला दोन प्रचंड मनोरे आहेत. एका मनोऱ्याचे नाव आहे 'नगारा-मनोरा.' या मनोऱ्यात एक पाणी-घड्याळ ठेवलेले असे. घड्याळाच्या एका अर्धुळातले पाणी थेंब थेंब गळून दुसऱ्या अर्धुळात उतरले की एक तास झाला असे समजायचे. मनोऱ्यावरचा अधिकारी मग जोरजोराने नगारा वाजवी आणि नगाऱ्याच्या आवाजावरून लोकांना वेळ समजे. तटाच्या दुसऱ्या मनोऱ्याचे नाव आहे. 'घंटा-मनोरा.' या मनोऱ्यावर एक अधिकारी असे. घंटा-मनोऱ्यात एक प्रचंड घंटा टांगलेली होती. सकाळी तटाचे दरवाजे उघडण्याच्या वेळी अन् रात्री ते दरवाजे बंद करण्याच्या वेळी अशी दोनदा ही घंटा वाजवली जाई. घंटेचा घण घण घण असा खोल, गंभीर आवाज कित्येक मैलपर्यंत दूर पसरत असे आणि हा आवाज जर बारकाईने लक्षपूर्वक कान देऊन ऐकला तर घण घण घण आवाजानंतर 'स् स् स् स् स्' असा एक बारीक, सुस्कारा टाकल्यासारखा आवाज ऐकू येई. तो आवाज ऐकला की लोक म्हणत, "बिचारी को-आई आपल्या मागे राहिलेल्या बुटाच्या आठवणीने व्याकूळ होऊन उसासा टाकते आहे!"

पेकिंगभोवतालचा हा तट आणि हे दोन मनोरे फार प्राचीन काळी बांधले गेले. त्यावेळी चीन देशावर सम्राट राज्य करीत होता. हा सम्राट मोठा अहंकारी, गर्विष्ठ होता. एकदा त्याच्या मनात आले, आपल्या राजधानीच्या तटामध्ये देशातले सर्वांत उंच मनोरे बांधायचे आणि सर्वांत मोठा आवाज करणारा नगारा. सर्वांत उत्कृष्ट अशी घंटा आणून ठेवायची. सम्राटांच्या इच्छेप्रमाणे मनोरे बांधून झाले. प्रचंड नगाराही तयार झाला. आता उत्कृष्ट घंटा बनवायचे काम तेवढे राहिले. सम्राटांनी आपल्या अधिकाऱ्यांना बोलावून घेतले आणि ते त्यांना म्हणाले,

"आम्हांला अतिशय उत्कृष्ट अशी घंटा बनवायची आहे. त्यासाठी चीन देशातले सर्वोत्कृष्ट कारागीर तुम्ही बोलावून घ्या. घंटा बनवताना तिला बळकटी यावी म्हणून लोखंडाचा वापर करायला हवा. आवाज मोठा येण्यासाठी पितळ वापरायला हवं. आवाज कलदार व्हावा म्हणून सोनं घालायला हवं आणि आवाजाला गोडी यावी म्हणून चांदी टाकायला हवी. या सर्व धातूंच्या मिश्रणानं केलेली घंटा उत्कृष्ट होणार याबद्दल आम्हांला शंका नाही. जा तर, लागा तयारीला!"

सम्राटांची आज्ञा होण्याचा अवकाश. सारी यंत्रे ताबडतोब वेगाने फिरू लागली. लोखंड, पितळ, सोने, चांदी या धातूंची भरपूर प्रमाणात खरेदी करण्यात आली. त्यासाठी खजिन्यातला खूप पैसा खर्च झाला. मग मुख्य मंत्र्यांनी आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या प्रांतांत धाडले आणि घंटा ओतणारे उत्तम कारागीर शोधून काढून त्यांना आणण्याची कामगिरी त्या अधिकाऱ्यांवर सोपवली गेली.

धातूंची जमवाजमव झाली. देशातले एकाहून एक हुषार कारागीर पेकिंगमध्ये गोळा झाले. त्यांच्यामधला जो प्रमुख कारागीर होता त्याचे नाव होते क्वान-यू. क्वान-यूच्या देखरेखीखाली एक भलाथोरला मांडव घालण्यात आला. मांडवात मोठमोठ्या भट्ट्या पेटवल्या आणि त्या भट्ट्यांवर मोठमोठ्या कढयांतून धातू वितळवण्याचे काम सुरू झाले. बरेच दिवस हे काम चालले होते आणि निरनिराळ्या धातूंची पुन्हा पुन्हा मिश्रणे करण्यात येत होती. सरतेशेवटी तो उकळता रस घंटेच्या साच्यात ओतायचा दिवस येऊन ठेपला. त्या दिवशी खुद्द सम्राट मांडवात आले. त्यांच्याबरोबर दरबारातले प्रमुख मानकरी, सरदार व इतर लवाजमाही तिथे आला होता. गावातल्या अनेक श्रीमंत, घरंदाज स्त्रियासुद्धा तिथे हजर होत्या. वाद्ये वाजत होती आणि स्त्रियांच्या नाजूक हातांतल्या पंख्यांची फुलपाखरासारखी हालचाल सुरू होती. घंटा कशी काय होते याबद्दलचे कुतूहल सर्वांच्या चेहऱ्यावर, डोळ्यांत नाचत होते.

कारागिरांनी भट्ट्यांवरच्या उकळत्या रसाच्या कढया उतरवल्या आणि तो धगधगता रस त्यांनी घंटेच्या साच्यात ओतला. रस साच्यात थंड व घट्ट झाल्यानंतर घंटा तयार होणार होती. म्हणून सम्राट, दरबारी मानकरी व त्यांच्या बायका सारे आपापल्या घरी विश्रांतीसाठी निघून गेले. क्वान-यू मात्र आपल्या चार निवडक सहकाऱ्यांसह सारी रात्र साच्याजवळ डोळ्यांत तेल घालून जागत बसला होता.

पहाट झाली. साच्यातला रस आता आटून घट्ट व थंड

झाला होता. क्वान-यूने काळजीपूर्वक मातीचा साचा फोडला व आतली घंटा बाहेर काढली. पण अरेरे! तो बघतो तर काय? घंटेला सगळीकडे बारीक बारीक भोके पडलेली आणि तिच्यात अनेक दोष राहिलेले.

घंटा साच्यातून बाहेर काढल्याची बातमी सम्राटांना कळली तेव्हा ते उत्सुकतेने घंटा बघायला आले. पाहातात तो घंटा बिघडलेली. घंटा बघून त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन पोहोचली. केवढा तरी पैसा, वेळ आणि श्रम वाया गेले होते. तरीही सम्राटांनी आपल्या रागाला आवर घातला आणि क्वान-यूला सांगितले,

"हे बघ. ही घंटा बिघडली तर बिघडू दे. पण तू पुन्हा एकदा सारे धातु वितळव व विचारपूर्वक नवे मिश्रण तयार कर आणि परत नवी घंटा साच्यात ओत. या खेपेला मात्र काम उत्तम झालं पाहिजे. आता घंटा बिघडली तर ते मला मुळीच खपायचं नाही. सांगून ठेवतो."

क्वान-यू मनातून हादरून गेला होता. त्याने पुन्हा खूप काळजीपूर्वक सारी जुळवाजुळव केली. धातू वितळवले. त्यांची मिश्रणे पूर्वीपेक्षाही अधिक विचारपूर्वक तयार केली आणि पुन्हा एकदा त्याने तो रस साच्यात ओतला. या खेपेला दरबारातले थोडेच लोक कार्यक्रमाला हजर राहिले होते. रस थंड झाल्यानंतर क्वान-यूने साचा फोडून घंटा बाहेर काढली. याही खेपेला घंटा मनाजोगी उतरली नाही. आता मात्र सम्राटांच्या क्रोधाला पारावार उरला नाही. त्यांनी क्वान-यूला आपल्यासमोर बोलावून त्याला शेवटचा इशारा दिला. ते त्याला म्हणाले,

"पाहा क्वान-यू, तुला एकच संधी देतो. शेवटची. आता यानंतर एकतर मला निर्दोष घंटा मिळाली पाहिजे किंवा तुला तुझे प्राण गमावले पाहिजेत. काय हवं ते ठरव तुझं तू! जा आता!"

क्वान-यू जड पावलांनी घरी परत आला. त्याचा चेहेरा पार उतरला होता. मन निराश झाले होते. क्वान-यूला एकुलती एक मुलगी होती. को-आई तिचे नाव. पंधरा वर्षांची को-आई जशी देखणी होती तशीच ती फार शहाणी, समजूतदारही होती. आपल्या आईवेगळ्या मुलीवर क्वान-यूचा फार जीव होता. को-आईचेही आपल्या वडिलांवर भारी प्रेम होते. क्वान-यू उदासवाण्या चेहऱ्याने घरी आला तेव्हा को-आईने आपल्या वडिलांची समजूत घालण्याचा, त्यांना धीर देण्याचा खूप प्रयत्न केला. ती म्हणाली,

"बाबा, काळजी करू नका. देवाची दया असेल तर या



खेपेला तुमची घंटा अगदी उत्कृष्ट, सुंदर होईल. बघा तरी!'' पण क्वान-यूचे मन तसेच उदास राहिले. जड अंतःकरणाने तो नव्या घंटेची जुळवाजुळव करू लागला.

को-आईने आपल्या वडलांना धीर दिला खरा; पण तिला स्वतःला विलक्षण चिंता लागून राहिली होती. तिला खाणे-पिणे सुचेना. रात्री झोपसुद्धा येईना. सरतेशेवटी ती एका ज्योतिष्या-कडे गेली आणि तिने त्याला सर्व हकीगत सांगितली. ज्योतिषी गंभीर चेहरा करून सारे ऐकत होता. को-आईचे सांगून झाले तेव्हा त्याने आपल्या हातातल्या जपमाळा—रुद्राक्षमाळा बराच वेळ उलटया सुलटया फिरवल्या. मग तांबडया पिवळया अलवाणात बांधून ठेवलेल्या, जुनाट पिंगट काळपट रंगाची पाने असलेल्या अन् चित्रविचित्र अक्षरे नि आकृत्या रेखाटलेल्या पोथ्या काढून त्या त्याने बारकाईने वाचल्या. शेवटी त्याने एका कागदावर एक कविता लिहिली. कागदाची घडी करून ती को-आईच्या हाती देत ज्योतिषी तिला म्हणाला,

''आता घरी जा तू मुली. अन् मध्यरात्री हा कागद उघडून त्यावर लिहिलेली कविता वाच. तुझ्या प्रश्नाचं उत्तर तुला त्यात सापडेल!''

को-आई घरी आली. रात्र होईपर्यंतचा वेळ तिने अगदी तळमळत काढला. सरतेशेवटी दिवस मावळला. काळोख पडला. रात्र चढत चालली. मध्यरात्रीची वेळ झाली. को-आईने थरथरत्या बोटांनी तो कागद उलगडला. आतल्या कवितेवरून तिची दृष्टी फिरू लागली. कविता अशी होती :

धगधगणारे तप्त धातुरस
वैर तयांचे असे भयंकर
हवे शिंपण्या पवित्र ऐसे
कुमारिकेचे रक्तच त्यांवर!

कविता वाचून को-आई आश्चर्याने आणि भयाने स्तब्ध झाली. वितळणाऱ्या धातूंच्या रसांचे आपापसातले वैर जर मिटायला हवे असेल तर कुमारिकेचे पवित्र रक्त त्यांवर शिंपडायला हवे. त्याशि-वाय सारे रस वितळून एकजीव झाल्याखेरीज घंटा निर्दोष उतरणार नाही. कुमारिकेचे रक्त....कुमारिकेचे रक्त....

ती सारी रात्र को-आईने रडत रडत जागून काढली. सकाळ झाली तेव्हा तिचा निर्धार ठरला होता. तिने आपले डोळे पुसले आणि आपल्या वडिलांकडे जाऊन ती त्यांना म्हणाली,

''बाबा, आता तिसऱ्यांदा जेव्हा घंटा ओतायची असेल ना, तेव्हा मला तिथे यायला परवानगी दयाल का? मला घंटा कशी करतात ते बघायचं आहे.''

क्वान-यू आपल्या स्वतःच्याच दुःखात चूर होता. प्राणभयाने त्याची विचारशक्ती जणू संपुष्टात आली होती. को-आईच्या प्रश्नाचा त्याला नीटसा अर्थही कळला नाही. त्याने उदासपणे तिच्याकडे पाहिले. को-आईने पुन्हा त्याला तोच प्रश्न विचारला. तेव्हा क्वान-यूने विमनस्कपणे मान हलवून तिला संमती दिली.



घंटा साच्यात ओतण्याचा दिवस येऊन ठेपला. जिथे भट्ट्यांवर कढया उकळत होत्या तिथे खूपच जनसमुदाय लोटला होता. लोकांचे चेहरे उत्सुकतेने-ताणलेले दिसत होते. त्यांच्या डोळ्यांत भीती तरळत होती. समोर जाळ धडधडत होता. वर कढया ठेवल्या होत्या. त्यांत धातू वितळत होते. शेजारीच मातीचा बनवलेला भलाथोरला साचा ठेवलेला होता. आज तिसऱ्यांदा साच्यात रस ओतला जाणार होता. तो निवल्यावर घंटा बाहेर काढणार होते. आणि घंटा जर निर्दोष झाली नाही तर बिचारा क्वान-यू प्राणांना मुकणार होता. लोक तेच कुजबुजत होते. त्या अफाट गर्दीत, सोबत आपली म्हातारी दाई घेऊन आलेल्या को-आईकडे कुणाचे लक्षही गेले नाही. कसे जाणार?

कढयांमध्ये निरनिराळे धातू वितळत ठेवले होते. त्यांना पुरती उकळी फुटल्यानंतर तो लालभडक धगधगता रस अगदी भयंकर दिसत होता. रस साच्यात ओतण्याची वेळ झाली. पुन्हा एकदा वादक आपली वादये वाजवू लागले. घराघरांतून आलेल्या श्रीमंत नाजूक देखण्या स्त्रिया आपल्या हातांतले इवलाले फुलपाखरी रंगांचे पंखे हलवून वारा घेऊ लागल्या. भट्ट्यांवरचा जळजळता रस साच्यात ओतण्यास सुरुवात झाली. साचा जवळजवळ भरत आला होता. शेवटी उरलेली सर्वांत मोठी कढई नोकरांनी उचलली आणि ती ते साच्यात ओतू लागले. सर्व लोकांच्या नजरा त्या उकळत्या, सळसळत्या, शेंदरी रसावर खिळल्या होत्या. इतक्यात नाजूक, लहानखुरी, सुंदर को-आई अचानक त्या साच्याकडे धावली. धावता धावता ती म्हणाली,

"बाबा, तुमच्यासाठी— तुमच्यासाठी करते बरं हे मी; तुमच्यासाठी!"




आणि डोळ्यांचे पाते लवते न लवते तोच एकदम तिने त्या रसाने खदखदणाऱ्या साच्यात उडी घेतली! उडी घेताना तिने क्षणभर मान वळवून मागे दृष्टिक्षेप केला तेवढाच काय तो. दुसऱ्याच क्षणी साच्यातल्य शेंदरी रसात ती दिसेनाशी झाली.

झाला तो प्रकार इतक्या अनपेक्षितपणे घडला की प्रथम काय झाले ते कुणाला काही कळलेच नाही. दुसऱ्या क्षणी मात्र तिथे एकदम हलकल्लोळ उडाला वादकांचे वाद्यांवर फिरणारे हात थांबले. सूर मुके झाले. पुरुष विस्मयाने, दुःखाने ओरडले, हळहळले. आणि बायका हुंदके देऊन, मुसमुसत रडू लागल्या. सम्राटांचा चेहरादेखील गोरामोरा झाला. साच्यातला वितळलेला रस तसाच उकळत होता. को-आईने त्यात उडी टाकल्याबरोबर त्या रसात इंद्रधनुष्याचे रंग उमटले. झळझळले. काही वेळ आतून बुडबुडे विरून गेले. आणि रस थंड होत साच्यात स्थिरावू लागला. बिचारी को-आई. तिची नावनिशाणीदेखील मागे उरली नव्हती. राहिला होता तो फक्त तिचा छोटा बूट. को-आईबरोबर तिची वृद्ध दाई तिथे आली होती. को-आई साच्याकडे धावली तेव्हा त्या दाईने को-आईचा पाय पकडून तिला थांबवण्याचा प्रयत्न केला होता. पण को-आई सफाईने निसटून गेली होती. दाईच्या हातात फक्त तिचा बूट राहिला होता!

ज्योतिष्याने सांगितले ते खरे होते. बऱ्याच तासानंतर, घंटेचा साचा फोडून आतली घंटा जेव्हा बाहेर काढली तेव्हा ती अगदी परिपूर्ण, निर्दोष उतरली असल्याचे दिसून आले. तिच्यात कुठेही अगदी येवढीशीसुद्धा उणीव राहिली नव्हती. घंटा टांगल्यावर ती जेव्हा लोकांनी वाजवून पाहिली तेव्हा तर आधीच्या कोणत्याही घंटेपेक्षा तिचा आवाज अधिक खणखणीत, मंजुळ, सुंदर असा उमटला. चीन देशात असा घंटानाद यापूर्वी कुणीही, कधीही ऐकला नव्हता. घंटेचा घण घण घण असा नाद कित्येक मैलपर्यंत दूरवर गेला. आणि प्रत्येक घणघणाटानंतर 'स् स् स् स् स्' असा पुटपुटल्यासारखा आवाज येऊ लागला. कुणीतरी खूप दुःखाने उसासा टाकावा असा तो 'स् स् स्' आवाज ऐकला की लोक म्हणत, "गरीब बिचारी को-आई! ती आपल्या मागे राहिलेल्या बुटासाठी दुःख करते आहे. तळमळते आहे. उसासे टाकते आहे!"

■ ■ ■





(एक गमतीचा अनुभव)

कबूल बाबा कबूल!

: वामन चोरघडे :

वर्षा दोन वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. फार तर तीन वर्षे झाली असतील. त्या गृहस्थाशी बोलताना मला एक नवा अनुभव आला. त्यांची अन् माझी पूर्वी ओळख नव्हती. माझे नाव त्यांच्या कानी गेलेले असेल. त्यांचे माझ्या नव्हते. गृहस्थ सभ्य होता. वयस्क होता. चेहरा चार माणसांसारखा. कपडे आधुनिक, पण पूर्वीचे आधुनिक. नामदार गोखले. महादेव गोविंद रानडे जसे कपडे घालीत तसे व्यवस्थित कपडे त्याने घातले होते. डोक्यावर पगडी नव्हती; टोपी होती. मिशाबिशा छान वाढल्या होत्या.

एके सकाळी सुमारे आठच्या सुमाराला हे गृहस्थ आले. मी त्यांना 'या बसा' म्हटले. चहापाण्याचे विचारले. माणूस ऐसपैस बसला. माझ्या पूसतपासीने स्वारी जरा स्थिरावली.

गृहस्थ मला त्यांच्या संस्थेतर्फे व्याख्यानाला बोलवायला आले होते. त्यांना घेऊन येतोच अशी त्यांनी आपल्या परीने त्या गावातील लोकांना हमी दिली होती. ज्या संस्थेतर्फे माझे व्याख्यान ठरवायचे तिने स्वखर्चाने त्यांना मुद्दाम माझ्याकडे शिष्टाईसाठी पाठवले होते.

व्याख्यानाचे निमंत्रण घेऊन येणारी अशी माणसे कसे बोलतात, कसे वागतात, केवढी स्तुती करतात याचा अनुभव ज्यांना आहे त्यांना त्याची कल्पना असेलच. आरंभी 'या बसा' म्हटल्याबरोबर ते जेथे बसले असतील त्या जागेची नीट पाहाणी करतात आणि त्या खोलीत ज्या वस्तू असतील त्यांची वाखाणणी करू लागतात.

सदर गृहस्थानेही तसेच केले. जणू पूर्वी ठरवून आल्याप्रमाणे त्याने माझ्या खोलीतील वस्तूंचे स्तुतिस्तोत्र गायला सुरुवात केली.

माझी खोली कशी आहे, हे मला छान ठाऊक आहे. या खोलीत येणाऱ्याने आल्या आल्या चटकन आपले काम सांगावे आणि चालू लागावे. फार वेळ त्याला बसावेसे वाटू नये, अशीच त्या खोलीची रचना मी केली आहे. दहा फूट रुंद व बारा फूट लांब एवढ्या आकाराच्या त्या खोलीला चार दरवाजे आहेत. दोन पलंग आहेत. अवघडून बसता येईल अशा दोन खुर्च्या आहेत आणि भिंतींवर जिथे जागा मिळेल तिथे फोटो आणि पुस्तकांच्या अलमाऱ्या आहेत. माझे अभ्यासाचे एक टेबल त्याच खोलीत आहे. थोडक्यात म्हणजे माझी खोली आणि अडगळीची खोली यांत फारसा फरक नाही.

गृहस्थाने पलंग, टेबल (हे पांजऱ्याच्या फळकुटांच खिळे ठोकून केले आहे.) इथून सुरुवात करून सर्व वस्तूंची स्तुती केली. माझी रसिकता आणि योजकता यांविषयी चांगल्या शब्दांत केलेल्या भलामणीने मी खूष व्हावे आणि निमंत्रण स्वीकारावे म्हणून हे सारे होते, हे ओळखण्याइतका अनुभव माझ्या गाठी होता. मी माझ्या अडचणींची जंत्री त्यांच्यासमोर मांडली.

"वा! वा! असे कसे होईल? आमचा सगळा गाव तुमच्या वाटेकडे डोळे लावून आहे. मी आपला नकार घेऊन गावी गेलो तर मला तोंड दाखवायला जागा राहणार नाही."

तरी मी बधलो नाही. त्याने मग तो मुद्दा तिथेच सोडला आणि माझ्या पलंगाजवळ ठेवलेल्या बेडलँपची चौकशी केली. खोली केव्हा बांधली? मुद्दाम बांधवून घेतली काय? हे साध्या इंजिनिअरचे काम नव्हे, याला कल्पकता हवी, खोलीचा प्लॅन तुम्हीच काढला असेल....या सगळ्या, म्हणजे निवळ कॉब्लर एन्क्वायरीज!

किती ऐकू या खोलीबद्दल, असे मला झाले. ही चार दारांची खोली, माझे मित्र सी. रामचंद्र आणि ग. दि. माडगूळकर हे दोघे सोडले तर आजवर कुणाला आवडली नाही. त्यांना आवडण्याचे कारण त्यांना खोली दिसतच नाही, मीच दिसतो आणि गंमत अशी, की त्यांच्या इतमामाला शोभेल अशा घरातील दुसऱ्या जागी मी त्यांचे सामान नेऊ लागतो तेव्हा ते सहज म्हणतात, 'इथं ऊन लागत नाही ना? पाऊस येत नाही ना? मग या खोलीत काय बिघडले? इथेच राहू.' त्यांचा मुक्काम असेपर्यंत आम्ही मग याच खोलीत झोपतो–तिघेच्या तिघे, उभ्या आडव्या देहांचे!

पण माझ्या मित्रांना माझी खोली आवडणे आणि या सभ्य गृहस्थाला तिची स्तुती करावीशी वाटणे यांत खूप फरक आहे. सांगायचा मुद्दा असा की, परत तो गृहस्थ मला व्याख्यानाची गळ घालू लागला! मला निमंत्रण स्वीकारावयाचेच नव्हते.

अहो, गाव पुरेपूर १९८ मैल दूर. इथून सकाळी एस. टी. मध्ये बसायचे आणि संध्याकाळी सात वाजता पोचायचे. लगेच विश्रांती व ताजेतवाने होऊन आठ वाजता व्याख्यानाला उभे राहायचे. साडेदहापर्यंत कार्यक्रम संपेल (तोही त्या आडगावातला अशक्य) लगेच जेवण केले की ताणून द्यायची. पहाटे ४ ला बस निघते. आरामात बसायचे म्हणजे दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मुक्कामाला आपल्या घरी. आहे काय आणि नाही काय! शिवाय गावातले लोक माझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेले!

मी त्यांच्यासाठी चहा करायला सांगितला होता तो एकदाचा आला आणि चहा आणणारा कोण तर माझा आठदहा वर्षांचा नातू!

त्या भल्या गृहस्थाला चहाची गरज असावी. त्याने कपातून वाफा निघत असलेल्या चहाकडे आणि माझ्या नातवाकडे बघितले. तोच त्याची नजर भिंतीवर असलेल्या एका फोटोकडे गेली.

त्या फोटोत डोक्याची चंपी केलेले एक आठ वर्षांचे पोर लंगोटी घालून संध्या करीत असलेले होते. डोक्याच्या चक्करावरची शेंडी वेडीवाकडी उभी होती.

"अरे वा! हा याचाच फोटो दिसतोय. काय बाळ?"

मला तोंडदेखल्या उच्चारलेल्या 'बाळ' या शब्दाची फार पूर्वीपासून अती चीड आहे. एवढेच नव्हे तर "तुझा अभ्यास कसा आहे? नंबर कोणता? तू हुशार असशीलच. एवढ्या थोर महा-पुरुषाचा तू नातू—" हेही शब्द मला आवडत नाहीत. मुलांनी मुलांसारखे आणि मोठ्यांनी मोठ्यांसारखे वागावे असे माझे पक्के मत.

त्या 'बाळ' शब्दाने मी कावराबावरा झालो, चक्क नकार देऊन त्या गृहस्थास कसे कटवावे याचा विचार करू लागलो. नातवाचे साहाय्य घ्यावे की काय, असाही विचार मनात आला एवढ्यात....

"काय बाळ? काय नाव तुझं?"

त्याने नाव सांगितले.

"कोणत्या वर्गात शिकतोस?"

ते पोरगे गप्प राहिले, तेवढ्यात त्याने आपली चुणूक दाखवली "कप द्या लवकर. ते मला वर नेऊन पोचवायचे आहेत."

"वा! तल्लख आहे हो! बरं झालं लवकर मौज केली. तुझं काय बाबा? तू रोज संध्या करीत असशील. घराण्याचं वळण."

त्या पोराने 'चक्' असा टाळूला जीभ लावून आवाज केला.

"अहो, आजकाल कोण संध्या करतो तर तो करील?"

"नाही साहेब, मी विश्वास ठेवणार नाही. आपल्या घराण्यात–"

"अहो, कसलं घराणं? मीच कधी संध्या केली नाही तर तो काय करणार?"

"असेल म्हणा! पण तेवढंच पाठांतर वाढतं. निदान केशव नारायण चोवीस नावं तरी जिभेवर येतात. स्मरणशक्तीची वाढ होते."

छान खरमरीत उत्तर द्यावे, असे मला वाटले. पण घरचा गोड चहा पाजून त्या गृहस्थाचे तोंड मला खारट करायचे नव्हते. एक शंका चाटून गेली. पाठांतराचा आणि स्मरणशक्तीचा त्या गृहस्थाचा मुद्दा खरा असेल काय?

आणि दुसरी एक कल्पना सुचली. माझ्या चेहऱ्यावर हसरा, मिस्किल भाव उमटला असावा. गृहस्थाला वाटले, मी होकार देणार. पण मी माझ्या नातवाला हाक मारली आणि सहज त्याला विचारले, "कायरे, आपल्या इथं सध्या कोणतं पिक्चर जोरात चालू आहे?"

"नयादौर, दिलीपकुमार टॉप, वैजयंतीमाला हिट."

"बस. एकच?"

त्या कारट्याने नागपुरातील वीस थिएटरांची आणि त्यात चालू असलेल्या वीस पिक्चरची नावे पटापट सांगितली. वीस आणि वीस चाळीस. प्रत्येक पिक्चरमध्ये नायक, नायिका, व्हिलन, साईड-हिरो



सुंदर दुनिया

सुंदर हा सिंह सुंदर हा वाघ
जंगलात त्यांचा केव्हढा रुबाब !
सुंदर हा हंस सुंदर हा मोर
फुलपाखरू हे छान नक्षीदार
उग्र सौंदर्याचा तुफान सागर
खुळखुळणारा ओहळ सुंदर
सुंदर हा नाग काढलेला फणा
घोडा किती तरी उमदा देखणा

सर्वांग सुंदर फुल्ल गुल्मोहर
पुळण सुंदर कुरण सुंदर
गुलाब सुंदर चाफाहि सुंदर
एकाची नसेचि दुसऱ्याला सर
ऐशा सुंदरांनी रंगली दुनिया
उदास हृदया प्रफुल्ल कराया

—यशवन्त

अशी सुमारे प्रत्येकी पाच याप्रमाणे १०० नावे सांगितली. म्हणजे १४० ! आणखी भर म्हणून दिग्दर्शक, पटकथा-संवाद लेखक, पार्श्वगायक अशी प्रत्येकी सुमारे पाच नावे, म्हणजे झाले १०० आणि अगोदरचे १४० एकूण २४० नावे अवघ्या दोन मिनिटांत त्याच्या जिभेतून फुटली.

"आणखी सांगू ? धनवटे रंगमंदिरात नाटक–"

"पुरे, जा तू खेळायला."

पोरटे उड्या मारीत पळाले.

मला मनापासून हसायला आले. कौतुकाने हसतच मी म्हणालो, "घ्या साहेब, आलं ना लक्षात तुमच्या ? पाठांतर आणि देवाच्या चोवीस नावांवर कसोटी लावून तुम्ही संतुष्ट होतात ना ? आणि त्यानं तर दोन मिनिटांत अडीचशे नावांचा निकाल लावला."

"हेच हेच मी म्हणतो भाऊसाहेब. हे असंच काहीतरी आज नव सांगायला पाहिजे. त्यासाठी हात जोडतो. आमच्या गावकऱ्यांना असंच काहीतरी सांगायला आपण चलावं. नाही म्हणू नये. हवं तर या बच्च्याला घेऊन चला."

त्याने मनापासून उच्चारलेल्या 'बच्चा' शब्दाला मी भाळलो आणि गंमत म्हणजे मी त्या गृहस्थाला होकार दिला. ३२० किलोमीटर एस. टी. चा—आठ आणि आठ सोळा तासांचा जीवघेणा प्रवास कबूल केला.

इसापचा दिग्विजय

: पु. रा. बेहेरे :

इजिप्तच्या राजाने पाठवलेले कोडे सोडवण्याची जबाबदारी इसापने घेतल्यामुळे राजाला आनंद झाला. मग बाबिलोनच्या राजाने इसापला पुन्हा आपला खाजगी कारभारी नेमले आणि इसापचा दत्तक मुलगा हेलिअस याला पकडून आणून त्याला इसापच्या स्वाधीन केले. त्याला घेऊन इसाप घरी गेला. मग त्याने हेलिअसला जवळ बसवून घेतले आणि त्याच्या पाठीवर हात फिरवून त्याला उपदेश केला.

इसाप त्याला म्हणाला, 'मुला, आतापर्यंत मी तुला इतक्या चांगल्या गोष्टी शिकविल्या. पण त्या सगळ्या विसरून जाऊन तू माझ्याशी वैर केलेस. असो; यापुढे तरी तुला चांगली बुद्धी होऊ दे. मी तुला आता जे सांगणार आहे ते कधीही विसरू नकोस म्हणजे तुझे कल्याण होईल. पहिली गोष्ट म्हणजे परमेश्वराविषयी पूज्यबुद्धी ठेव. दुसरी गोष्ट म्हणजे नेहमी राजाचा मान ठेव. कारण त्याच्याकडे सत्ता असल्यामुळे त्याला देवाप्रमाणेच मानले पाहिजे. तू आपल्या गुरूंना आणि आईवडिलांना मान दे; कारण तुझे कर्तव्यच आहे. पण ज्याने तुझ्यावर प्रेम केले त्याच्याबद्दल तुला दुप्पट कृतज्ञता असली पाहिजे. आज चांगले अन्न चांगल्या तऱ्हेने सेवन करावे, पण त्याचा हेतू आपले आरोग्य चांगले राहावे आणि दुसऱ्या दिवशी आपले काम करण्यास जोम राहावा हाच असला पाहिजे. राजदरबारात जे तुझ्या कानावर येते ते तुझ्या मनातच मुरून गेले पाहिजे; नाहीतर तूच मरून जाशील.

'मद्यसेवन केलेले असताना आपली विद्वत्ता दाखवण्यासाठी चर्चा करू नकोस. त्यामुळे बेसावध असताना तुला नेमका पकडून हास्यास्पद करतील. तोंडाने बोलशील त्यापेक्षा हाताने अधिक कृती कर. ज्यांना यश मिळाले आहे त्यांचा हेवा करू नकोस. उलट त्यांच्या आनंदात सहभागी हो म्हणजे त्यांच्या सुदैवाचाही तू वाटेकरी होशील. जे दुसऱ्याचा मत्सर करतात ते नकळत आपलीच हानी करून घेतात. आपल्या नोकरा-चाकरांची नीट काळजी घे. जे तुला मिळेल त्याचा त्यांनाही वाटा दे. म्हणजे तुला केवळ धनी म्हणूनच नव्हे तर आपला कल्याणकर्ता म्हणूनही मान देतील. आपले विकार ताब्यात ठेव. एखादी गोष्ट येत नसेल तर ती शिकण्याची लाज बाळगू नये. मूर्ख राहण्यापेक्षा उशिरा का होईना, पण शहाणे होणे चांगले. आपले बेत कधी आपल्या बायकोला सांगू नकोस. बायका नेहमी आपल्या नवऱ्याला ताब्यात ठेवण्यासाठी युक्त्या योजत असतात.

'आज जे मिळवशील त्यातले काही तरी उद्यासाठी राखून ठेवत जा. कारण आपल्या मित्रांकडे याचना करून जगण्याची पाळी येण्यापेक्षा आपण राखून ठेवलेला पैसा आपण मेल्यानंतर शत्रूला मिळाला तरी चालेल. सर्वांशी प्रेमळपणाने आणि सभ्यपणाने वागत जा. कारण कुत्रा गुरगुरतो तेव्हा त्याला फटका मिळतो आणि तो शेपूट हलवतो तेव्हा त्याला भाकरी मिळते. आपल्या चारित्र्याचा अभिमान बाळगावा, संपत्तीचा गर्व बाळगू नये. कारण संपत्ती चोर लुटून नेऊ शकतात, पण चारित्र्य कोणी नेऊ शकत नाही. आपली भरभराट झाली तर शत्रूबद्दलही आकस ठेवू नये. उलट त्यांच्याशी चांगुलपणाने वागावे. म्हणजे आपण किती चांगल्या माणसाशी वाईट वागलो याची जाणीव होऊन त्यांना पश्चात्ताप होईल आणि त्याचे मन पालटेल. कोणाला दानधर्म करावा असे तुझ्या मनात आले तर मागे-पुढे पाहू नकोस. मनापासून दानधर्म कर. कारण लक्ष्मी चंचल असते. दुसऱ्याची निंदा करून कोणी तुझे कान भरू लागला तर त्याला थारा देऊ नकोस. तो तुझा भाऊ असला तरी त्याच्याकडे लक्ष देऊ नकोस; कारण असा निंदक सरळ बुद्धीने बोलत नसतो. त्याने केलेली निंदा ऐकून तू जे बोलशील ते तो इतरांना सांगत सुटणार हे लक्षात ठेव. खूप संपत्ती मिळाली तर हरखून जाऊ नकोस; तुझ्याकडे संपत्ती कमी असली तर त्याबद्दल दुःख करीत बसू नकोस.'

असा उपदेश करून इसाप तेथून निघून गेला. मग मात्र आपण इसापचा किती विश्वासघात केला याची आठवण होऊन हेलिअसला-इसापच्या त्या दत्तक मुलाला अतिशय पश्चात्ताप झाला. इसापने तरीही आपल्याला प्रेमानेच वागवले आणि चांगला उपदेश केला यामुळे तर त्याला मेल्याहून मेल्यासारखे झाले. आपले काळे तोंड दाखवत जगण्यापेक्षा जीव द्यावा असे त्याने ठरवले आणि अन्नपाणी वर्ज्य करून त्याने अखेर प्राण दिला. हेलिअसचा मृत्यू झाला हे कळताच इसापला अतिशय दुःख झाले आणि त्याने मोठ्या इतमामाने त्या मुलाचा अंत्यविधी केला. पण मुलाचे दुःख करत बसण्यास इसापला सवड नव्हती. इजिप्तच्या



राजाने पाठवलेल्या कोडयाचे उत्तर शोधून काढण्याच्या कामास त्याला लागायचे होते. म्हणून त्याने फासेपारध्यांना बोलावले आणि त्यांना चार गरुड पक्षी पकडून आणण्यास सांगितले. फासेपारध्यांनी गरुडाची चार मोठी पिले धरून आणली तेव्हा इसापने त्या पिलांच्या पंखांतील शेवटच्या रांगेतील पिसे ओढून काढली. या शेवटच्या रांगेतील पिसांनी गरुड फार उंच भरारी मारतो. ही पिसे काढून टाकल्यानंतर ती पिले फासेपारध्यांकडे परत देऊन इसाप म्हणाला, 'आता या गरुडाच्या पिलांना वाढवा आणि मुलांना पाठी-वर घेऊन हवेत उंच उडण्याचे शिक्षण त्यांना द्या. हे पक्षी पूर्ण मोठे झाले म्हणजे ते एका मुलाला पाठीवर घेऊन उडू शकतील. या पक्ष्यांना दोरी बांधून ती या मुलांच्या हाती द्यायची म्हणजे हे पक्षी त्या मुलांच्या हुकमतीत राहतील. मुलांच्या इशाऱ्याप्रमाणे हे गरुड पक्षी हवेत उंच जातील किंवा खाली येतील अशा तऱ्हेने त्यांना शिकवून तयार करा.' इसापच्या सांगण्याप्रमाणे फासेपारध्यांनी त्या चार गरुड पक्ष्यांना शिकवून तयार केले. अशी सगळी तयारी होताच ते चार पक्षी, त्यांच्यावर बसणारी चार मुले, फासे-पारधी यांच्यासह तो इजिप्तला जाण्यास निघाला. त्याने आपल्या-बरोबर खूप नोकरचाकर आणि हत्यारपात्यारेही घेतली. त्यांचा तसा काही उपयोग नव्हता; पण एवढा मोठा लवाजमा पाहिल्यावर इजिप्ती लोकांच्या मनात दबदबा निर्माण होणार होता!

अशा तऱ्हेने तो मेम्फिस येथे येऊन पोचला तेव्हा प्रत्यक्ष इसाप येऊन थडकला आहे ही वार्ता राजा नेक्टॅनेबो याला समजली. इसाप आला हे कळताच तो राजा अगदी गडबडून गेला. त्याने आपल्या मित्रांना आणि सल्लागारांना पाचारण केले आणि त्यांना तो म्हणाला, 'इसाप मेल्याची बातमी ऐकली म्हणून आपण आता असे खोडयात सापडलो! इसाप मेला असे वाटले म्हणून मी लिकरगसला आव्हान देणारे पत्र पाठविले.' पण झाल्या गोष्टीला इलाज नव्हता. इसापला उतरून घेऊन त्याची बडदास्त राखण्याचा हुकूम त्याने आपल्या नोकरांना दिला. दुसऱ्या दिवशी राजा नेक्टॅनेबोच्या दरबारात त्याची भेट घेण्यासाठी इसाप हजर झाला. त्याला दरबारात प्रवेश देण्यापूर्वी राजाने आपल्या सर्व सरदार-दरकदारांना रुपेरी झगे घालून बसण्यास फर्मावले; आपणही रुपेरी झगा घालून आणि डोक्यावर शिंगे बांधून तो सिंहासनावर बसला. त्याला इसापची परीक्षा बघायची होती.

इसाप दरबारात आला आणि त्याने सर्व दरबारावर एक नजर टाकून राजाला नम्रपणे अभिवादन केले. तेव्हा राजा नेक्टॅनेबोने त्याला विचारले, 'इसाप, मी आणि माझे हे सगळे सरदार आणि दरकदार यांच्यामध्ये तुला काय साम्य दिसते?'

इसापने उत्तर दिले, 'महाराज, तुम्ही मला पौर्णिमेच्या चंद्रा-सारखे दिसता आणि हे तुमचे सगळे दरबारी लोक चंद्राभोवती

चमकणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे दिसत आहेत. चंद्राचे तेज इतर ताऱ्यांपेक्षा कितीतरी अधिक असते आणि डोक्यावर शिंगे लावल्यामुळे तर आपण अधिकच चंद्रासारखे दिसत आहात.' इसापचे हे उत्तर ऐकून राजा नेक्टॅनेबो चकित झाला आणि त्याने इसापाला नजराणा दिला.

दुसऱ्या दिवशी नेक्टॅनेबोने चमकता जांभळ्या रंगाचा झगा घातला; अनेक तऱ्हेची फुले अंगाखांद्यावर घेतली आणि तो सिंहासनावर बसला. थोड्या वेळाने इसाप दरबारात आला तेव्हा राजाने त्याला पुन्हा प्रश्न विचारला, 'इसाप, मी आणि माझे हे दरबारी लोक यांच्यामध्ये तुला काय साम्य दिसते?'

इसाप म्हणाला, 'महाराज, आपण मला वसंतऋतूतील सूर्याप्रमाणे दिसता आणि हे दरबारी लोक फळे पसरल्यासारखे दिसत आहेत. या झगमगत्या जांभळ्या झग्यात तुमचे तेज खुलून दिसते आहे आणि वसंत ऋतूतील सूर्याने आपल्याभोवती फुले आणि फळे यांचा बहर आणावा तसे हे दरबारी आपण आपल्या भोवती गोळा केले आहेत.' इसापचे बुद्धिचातुर्य पाहून राजाला मोठा विस्मय वाटला आणि त्याने इसापला खूप नजराणे भेट दिले.

तिसऱ्या दिवशी नेक्टॅनेबोने पांढरा स्वच्छ झगा परिधान केला आणि दरबारी लोकांना शेंदरी रंगाचे कपडे घालायला लावले. जेव्हा इसाप दरबारात आला तेव्हा राजाने त्याला विचारले, 'आज मी कशासारखा दिसतो?' इसाप म्हणाला, 'आपण सूर्यासारखे दिसता आणि आपले दरबारी लोक सूर्यकिरणांसारखे दिसत आहेत. सूर्य हा तेजस्वी आणि निष्कलंक असतो; आपणही तसेच निष्कलंक आणि तेजस्वी आहात. सूर्याचे लाल किरण पसरलेले असतात, तसे हे दरबारी लोक दिसत आहेत.

राजाला मोठे आश्चर्य वाटले आणि तो इसापला म्हणाला, 'जोपर्यंत माझे हे राज्य असे विद्यमान आहे तोपर्यंत तो बाबिलोनचा लिंकरगस राजा अगदीच कःपदार्थ आहे हे ओघानेच सिद्ध होते.'

इसाप हसून म्हणाला, 'त्या राजाचे असे निरर्थकपणे आणि बेफामपणे वर्णन करू नका. कारण लिकरगस हा आपल्यापेक्षा फार वरच्या दर्जाचा आहे. पृथ्वीवरच्या सर्व वस्तूंपेक्षा देव झेउस जसा श्रेष्ठ तसा लिकरगस हा सर्व राजांपेक्षा श्रेष्ठ आहे. झेउसने सर्व ऋतू व्यवस्थित राहावेत म्हणून चंद्र-सूर्य निर्माण करून त्यांना प्रकाश दिला. झेउसला राग आला तर त्याचे मंदिरसुद्धा थरकापू लागते. त्यामुळे मेघांचा भयंकर गडगडाट, भीतिदायक विद्युतपात होतात आणि भूकंप सुरू होतात. लिकरगस राजाचे तेज असेच आहे. त्याच्यापुढे तुमचे तेज फिके पडते. त्याच्या श्रेष्ठतेपुढे इतर राजे खुजे ठरतात.'

इसापच्या बोलण्यातील शहाणपणा आणि त्याने तडकाफडकी दिलेले उत्तर ऐकून नेक्टॅनेबोने विषय बदलत म्हटले, 'मी सांगितला होता तसा मनोरा बांधण्याच्या तयारीने तू गवंडी आणि मजूर घेऊन आला आहेस का?' इसाप म्हणाला, 'माझी माणसे तयार आहेत. मनोरा कुठे बांधायचा तेवढे सांगितलेत की लगेच कामाला सुरुवात होईल.'

राजा आश्चर्य करीत करीत इसापला घेऊन शहराच्या बाहेर गेला आणि मनोरा केवढा हवा याचे मोजमाप त्याने दिले. राजाने दाखवलेल्या जागेवर मापे घेऊन इसापने गरुड पक्षी उभे केले आणि त्यांच्याबरोबर आणलेल्या मुलांना त्या गरुड पक्ष्यांवर बसून आकाशात उडण्याची आज्ञा केली. ती मुले हवेत तरंगत वर वर जाऊ लागली तेव्हा ती नेक्टॅनेबो राजाला म्हणाली. 'आता आमच्याकडे चिखल. विटा. तुळया असे मनोरा बांधण्याचे जे काय सामान असेल ते द्या. म्हणजे बांधकामाला सुरुवात करतो.'

नेक्टॅनेबो म्हणाला, 'इसाप. ही पंखांची माणसे तुम्हाला कुठे मिळाली?' इसाप उत्तरला, 'त्यात काय आहे? लिकरगस राजाकडे पंखांची माणसेसुद्धा आहेत. तो राजा मुळी देवाच्या योग्यतेचाच आहे. पण तुमच्यासारखे साधे राजे त्याच्याशी बरोबरी करू पाहतात हे आश्चर्य आहे.'

नेक्टॅनेबो म्हणाला, 'इसाप, मी हरलो हे मी कबूल करतो. पण तू माझ्या एका प्रश्नाचे उत्तर देशील का?'

इसापने उत्तर दिले, 'कोणताही प्रश्न खुशाल विचारा.'

नेक्टॅनेबो म्हणाला, 'मी ग्रीसमधून गाभण असलेल्या घोड्या मुद्दाम इथे आणल्या. पण बाबिलोनमधील घोड्यांचे खिंकाळणे त्यांनी रात्री ऐकले आणि त्या सगळ्या घोड्या गर्भपात होऊन फुकट गेल्या!'

इसाप म्हणाला, 'माझे उत्तर मी उद्या सांगतो. तुमचा प्रश्न मला समजला आहे.' मग इसाप आपल्या निवासस्थानी गेला. एक मांजर पकडून आणण्याचा त्याने आपल्या शिपायांना हुकूम दिला. इसापने सांगितल्याप्रमाणे त्यांनी एक भले मोठे मांजर पकडले आणि रस्त्यावर आणून त्याला चाबकाचे फटके मारण्यास सुरुवात केली. मिसरी लोकांनी हा प्रकार पाहताच ते संतापले आणि त्यांनी इसापच्या घरावर मोर्चा नेऊन त्याच्याकडे या प्रकाराबद्दल तक्रार केली. त्यांचा आरडाओरडा ऐकून इसाप बाहेर आला आणि 'मी त्या मांजराला सोडून देतो' असे सांगून त्याने आपल्या शिपायांना तसा हुकूम दिला. पण तेवढ्याने मिसरी लोकांचे समाधान झाले नाही. कारण इसापने मुद्दाम आपल्याला डिवचण्यासाठी मांजराचे हालहाल केले असेच त्या लोकांना वाटत होते. म्हणून ते इसापविरुद्ध तक्रार घेऊन राजाकडे गेले.

राजाने त्यांची तक्रार ऐकताच इसापला तत्काळ बोलावून आणले. आणि तो त्याला रागाने म्हणाला, 'इसाप ही तू अतिशय ओंगळ गोष्ट केलीस. मांजर हा एक पवित्र प्राणी आहे असे आम्ही मिसरमधले लोक मानतो हे तुला ठाऊक आहे. बुवास्तीस या देवतेचे मांजर हे प्रतीक आहे म्हणून आम्ही त्याला आदराने वागवतो आणि तरीही तू त्या प्राण्याचे भर रस्त्यावर असे हाल हाल का केलेस?'

इसाप म्हणाला, ‘महाराज, या मांजराने आमचे महाराजाधिराज लिकरगस यांचा काल रात्री घोर अपराध केला होता. त्यामुळे त्याला ही शिक्षा देणे भाग पडले. आमच्या लिकरगस महाराजांकडे एक उमदा कोंबडा होता. तो नेमकी वेळ सांगायचा. पण या मांजराने काल रात्री जाऊन त्या कोंबडयाचा जीव घेतला.’

नेक्टॅनेबो संतापून म्हणाला, ‘इसाप, इतके धादांत खोटे बोलण्याची तुला लाज वाटत नाही काय? इजिप्तमधले मांजर एका रात्रीत बाबिलोनला जाईल कसे?’

इसाप उत्तरला, ‘त्यात अशक्य काय आहे? बाबिलोन-मधील घोडयांचे खिंकाळणे ऐकून इजिप्तमधील घोडया नाही का गर्भगळीत झाल्या? तसेच हे!’

इसापचे इतके चपखल उत्तर ऐकताच राजा गप्प झाला. पण आता आपला पराभव होऊन लिकरगस राजाला खंडणी देण्याची पाळी येणार अशीही भीती त्याला वाटू लागली. मग त्याने हेलिओपोलिसच्या विद्वान लोकांना बोलावून आणले. हे लोक तत्वज्ञानातले गूढ प्रश्न विचारून इसापला निरुत्तर करतील अशी नेक्टॅनेबो राजाला मोठी आशा होती. इसापला प्रश्न विचारून निरुत्तर कसे करावे याचा बेत राजाने या विद्वानांबरोबर रचला आणि मग त्यांच्याबरोबर मेजवानीसाठी इसापला आमंत्रण दिले.

मेजवानीसाठी सगळे लोक जमले तेव्हा हेलिओपोलिसचा एक विद्वान इसापला म्हणाला, ‘आम्हांला देवाने येथे पाठविले आहे आणि देवाने सांगितल्याप्रमाणे आम्ही तुला प्रश्न विचारणार आहोत त्याचे उत्तर तू दे.’

इसाप उत्तरला, ‘तुम्ही आणि तुमचा देव दोघेही सारखेच खोटारडे दिसता. कारण तो जर तुमचा खरा देव असेल तर त्याला प्रत्येक माणसाच्या मनातला विचार आपोआपच समजणार! पण तरीही तुम्ही मला हवा तो प्रश्न विचारा.’

तो विद्वान म्हणाला, ‘एक मंदिर आहे आणि त्यात एकच खांब आहे. त्या खांबावर बारा शहरे वसलेली आहेत. त्या प्रत्येक शहरावर तीस तीस तुळया घालून सुरेख छप्पर उभारलेले आहे. प्रत्येक तुळईभोवती दोन स्त्रिया एकमेकींच्या मागे धावत असतात.’

इसाप म्हणाला, ‘आमच्या बाबिलोनमध्ये लहान मुले असली कोडी सोडवतात. ते मंदिर म्हणजे ही पृथ्वी. तिच्या मधला एक स्तंभ म्हणजे वर्ष. त्या स्तंभावरची बारा शहरे म्हणजे बारा महिने आणि त्या प्रत्येक शहरावर घातलेल्या तीस तीस तुळया म्हणजे तीस दिवस. प्रत्येक तुळईभोवती फिरणाऱ्या दोन स्त्रिया म्हणजे दिवस आणि रात्र.’ इसापचे हे उत्तर ऐकून तो राजा आणि ते विद्वान निरुत्तर होऊन गप्प बसले. मेजवानी संपवून इसाप घरी गेला.



दुसऱ्या दिवशी राजा नेक्टॅनॅबोने आपल्या मंत्र्यांना जवळ बोलावले आणि तो त्यांच्याशी खलबते करू लागला. राजा त्यांना म्हणाला, 'या इसापसमोर आपले काही चालत नाही. आपण जर त्याचा पराभव केला नाही तर राजा लिकरगसला शरण जाऊन खंडणी देण्याशिवाय आपल्याला दुसरा मार्गच नाही. इसापचा पराभव करण्याची युक्ती तर काही दिसत नाही.' तेव्हा एक मंत्री म्हणाला, "मला एक युक्ती सुचते. आपण त्याला विचारायचे, 'जे आम्ही कधी पाहिलेले नाही आणि कधी ऐकलेलेही नाही असे काय आहे ?' मग त्याने कितीही हुशारीने उत्तर शोधून काढले तरी आपण म्हणायचे की, यात काय आहे ? हे तर आम्ही ऐकलेले आणि पाहिलेलेही आहे. मग तो निरुत्तर होईल आणि त्याला पराभव स्वीकारून जावे लागेल."

ही युक्ती ऐकून राजा एकदम खुश झाला. इसापचा पराभव करण्याची बेमालुम युक्ती सापडली असे त्याला वाटले. त्याने दरबार भरवला आणि इसापला तेथे बोलावून आणले. मग राजा त्याला म्हणाला, 'इसाप, आता आम्ही तुला फक्त एकच प्रश्न विचारणार आहोत. त्याचे उत्तर तू दिलेस म्हणजे आम्ही पराभव कबूल करू आणि लिकरगस राजाला तुझ्याबरोबर खंडणी पाठवून देऊ. आम्ही जे कधी पाहिलेले नाही आणि कधी ऐकलेलेही नाही असे काय आहे ?'

इसाप म्हणाला, 'तीन दिवसांत आपल्या या प्रश्नाचे उत्तर मी देतो.' मग घरी येऊन इसाप विचार करू लागला. आपण काहीही उत्तर दिले तरी हे दरबारी लोक हे आपण ऐकलेले आहे आणि पाहिलेलेही आहे असे सांगून माझे उत्तर खोटे पाडणार. तेव्हा त्यांनी तसे सांगितले तरी त्यांना खोड्यात टाकण्याची युक्ती काढली पाहिजे. मग इसापने एक कर्जरोखा लिहून काढला.

'मी इजिप्तचा राजा नेक्टॅनॅबो याने बाबिलोनचा राजा लिकरगस याच्याकडून सोन्याच्या एक हजार विटा कर्जाऊ घेतल्या आहेत. त्या मागताच परत करीन.'

मग हा कर्जरोखा घेऊन इसाप नेक्टॅनॅबोच्या दरबारात गेला आणि 'हे तुमच्या प्रश्नाचे उत्तर घ्या.' असे म्हणून त्याने तो कर्जरोखा राजाच्या हातात ठेवला. त्या कागदात काय लिहिलेले आहे हे ऐकण्याइतका सुद्धा राजाच्या मंत्र्यांना धीर निघाला नाही. ते एकदम म्हणाले, 'हेच उत्तर ना ? हे आम्ही पूर्वी अनेकदा ऐकलेले आहे आणि पाहिलेले सुद्धा आहे.' इसाप म्हणाला, 'तसे असेल तर फारच चांगले. त्या कर्जरोख्यात लिहिल्याप्रमाणे सोन्याच्या विटा देण्याची व्यवस्था करा.' इतक्यात, राजाने तो कर्जरोखा वाचला आणि तो आपल्या मंत्र्यांच्या अंगावर ओरडला, 'मुर्खांनो, जे कर्ज मी कधी घेतलेलेच नाही ते तुम्ही कधी ऐकले आणि पाहिले आहे रे ? नको तेथे खोटे बोलता काय ?'

राजाने असा तडाखा देताच ते सगळेजण म्हणाले, 'आमची चूक झाली. ही कर्जाची गोष्ट आम्ही कधी ऐकलेली नाही आणि बघितलेलीही नाही.'

इसाप म्हणाला, 'मित्रांनो, हे तुमचे म्हणणे खरे असेल तर राजाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मी दिले आहे. तुमचे कोडे मी सोडवले आहे.'

राजा नेक्टॅनॅबो म्हणाला, 'इसाप, बाबिलोनचा राजा लिकरगस हा खरोखरच भाग्यवान आहे म्हणून तुझ्यासारखा हुशार माणूस त्याला मिळाला.' मग त्याने इसापकडे तीन वर्षांची खंडणी दिली आणि लिकरगस राजाला मैत्रीचे पत्र लिहून ते इसापकडे दिले. इसाप यशस्वी होऊन बाबिलोनला परतला.

'किशोर'च्या लेखकांना विनंती

पोस्टाचे दर वाढल्याने व किशोरकडे भरपूर अनामंत्रित साहित्य येत असल्याने असे साहित्य पाठवणाऱ्या लेखकांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी आपल्या साहित्याबरोबर ते परत पाठवण्यासाठी पुरेसे पोस्टेज पाठवावे. अशा अनामंत्रित साहित्यापैकी जे साहित्य 'किशोर'साठी स्वीकारले जाईल त्यासंबंधी आवश्यक तो पत्रव्यवहार करण्यात येईलच; परंतु जे साहित्य स्वीकारण्यात आले नसेल, व त्याच्या सोबत पुरेसे टपालहशील नसेल तर दोन महिन्यांनंतर ते निकालात काढले जाईल.

१ सा	ग	२ र		३ फ	ट	४ का	
म		५ ब	र	णी		६ स	७ जा
८ ना	९ वा	डी	बँक ऑफ महाराष्ट्र		१० भो	व	ळ
	घ		११ घे	रा	व		
१२ ध	न	१३ को			१४ रा	१५ प	ण
	१६ खे	डे	१७ गा	व		हा	
१८ धा			र		१९ स	रा	२० फ
२१ पा	ण	व	ठा		डा		ट


'किशोर' मार्च १९७४ कोड्याचे उत्तर

भारताचा इंग्लंड दौरा

: बाळ ज. पंडित :

१९३२ साली भारताचा पहिला अधिकृत दौरा इंग्लंडला गेला होता. त्यावेळी एकच टेस्ट खेळण्यात आली होती. लॉर्डस्‌वरच्या त्या टेस्टमध्ये सुरवातीलाच एक खळबळजनक घटना घडली. इंग्लिश कप्तान जार्डीनने नाणेफेक जिंकून आपली पहिली जोडी हर्बर्ट सटक्लिफ व पर्सी होम्स खेळायला पाठवली. या जोडीने आदल्याच आठवड्यात इसेक्सविरुद्ध ५५५ धावांची प्रचंड भागीदारी उभी केली होती. ही जोडी भारतीय गोलंदाजीचा कसा फडशा पाडते हे बघायला हजारो प्रेक्षक लॉर्डस्‌वर आले. सटक्लिफ-होम्सना गोलंदाजी करणारे महंमद निस्सार व लाला अमरसिंग हे गोलंदाज त्यांच्या मानाने नवीन होते. आपली पहिलीच टेस्ट ते खेळत होते. पण त्यांपैकी निस्सारने भलतीच करामत करून दाखवली. आपल्या तिसऱ्याच षट्कात त्याने सटक्लिफची बचावफळी

कर्णधार अजित वाडेकर



रबर कधीच गमावले नाही, आणि आता....

फोडली आणि त्याच्या स्टँप्स उधळून लावल्या. त्यानंतर लगेच त्याने पर्सी होम्सलाही तंबूचा रस्ता दाखवला. निस्सारच्या एका चेंडूवर त्याची दांडीच उडाली. ५५५ धावा उभारणारे दोघे जण ११ धावेत गडगडल्यामुळे सगळीकडे खळबळ माजली. पण एवढ्याने काय होतेय ? संघाची धावसंख्या १९ असताना लालसिंगने असा काही अचूक थ्रो केला की फ्रँक वुली धावबाद ! ३ बाद १९ ! ! इंग्लिश फलंदाजीचा फडशा पडलेला पाहून इंग्लिश प्रेक्षक चकित होऊन गेले ! भारतीय गोलंदाजीचा कसा फडशा पडतो हे पाहायला आले होते ना ते !

त्याच वेळी जोर केला असता तर भारतीय संघाला नक्की यश आले असते. पण काही क्षेत्ररक्षकांनी झेल सोडले आणि सामना हातचा घालवला. त्यामुळे भारताचा पराभव झाला.

आपल्या खेळाडूंनी पुढे हीच परंपरा चालवली. अनेक वर्षे !

पहिल्याच सामन्यात आली तशी सुवर्णसंधी हातीं यायला त्यानंतर ३९ वर्षे थांबावे लागले. दरम्यान १९४६, १९५२, १९५९ व १९६७ साली भारताने इंग्लंडवर स्वाऱ्या केल्या. पण प्रत्येक वेळी त्यांना निराशेने मान खाली घालूनच परतावे लागले.

पाच दौऱ्यातील १६ टेस्टसामने संपले तरी भारताला एकही विजय इंग्लिश भूमीवर मिळवता आला नाही.

दरम्यान इंग्रजांचे संघ भारतात येऊन टेस्टसामने खेळून जात होते. प्रारंभी पराभव (१९३२-३३) मग बरोबरी (१९५१-५२) व शेवटी विजय (१९६१-६२) अशी प्रगती आपण साधत होतो. पण हे सगळे स्वतःच्या भूमीवर. इंग्लंडमध्ये जाऊन विजय मिळवण्याचे स्वप्न मात्र अधुरेच राहात होते. पण....

फरूक इंजिनियर



इंग्लंडच्या खेळपट्टीचा अनुभव पाठीशी आहे—

पण १९७१ साली गणेशचतुर्थीच्या मुहूर्तावर आपण ओव्हलवर इंग्लंडचा फडशा पाडला आणि नव्या यशाचा श्रीगणेशा केला. जे ३९ वर्षे साधले नव्हते ते अखेर शेवटी आपणास साधले. त्यानंतर गेल्या वर्षीही आपण इंग्लिश संघाला येथे पराभूत केले. अशा रीतीने गेल्या दोन दौऱ्यांत संघ इंग्रजांपेक्षा भारी ठरलेला आहे. याच पार्श्वभूमीवर आपण यंदा इंग्लंडला जात आहोत.

इंग्लंडमधील हा आपला सातवा दौरा आहे. ज्या गोलंदाजांच्या जोरावर आपण गेल्या खेपेला इंग्लंडवर यश मिळवले तेच चंद्रशेखर, बेदी व वेंकटराघवन हे गोलंदाज आजही आपल्या संघात आहेत. त्याचप्रमाणे ज्याच्या नेतृत्वाखाली तेव्हा यश मिळवले तोच अजित वाडेकर आजही संघाचा नेता आहे. शिवाय विश्वनाथ, इंजिनियर, गावसकर, सोलकर,

डेनिस अमिस



टोनी ग्रेग



फॉर्म उत्तम लागलेला आहे—

अशोक मन्कड, किरमानी, प्रसन्ना व अबीदअली हे त्या वेळचे खेळाडू आजही संघाला मदत करीत आहेत. यांपैकी अशोक मन्कड हा फलंदाजीत व प्रसन्ना हा गोलंदाजीत आज विशेष भरात आहे.

संघाचे मॅनेजरही त्या वेळचेच म्हणजे हेमू अधिकारी हे आहेत. त्याखेरीज मार्च महिन्याच्या अंकात मी ज्यांचा 'पुढे आलेले खेळाडू' म्हणून उल्लेख केला त्यांपैकी मदनलाल, ब्रिजेश पटेल व गोपाळ बोस यांचा निवड समितीने संघात समावेश केलेला आहे. हे तिघेही नव्या दमाचे तडफदार खेळाडू आहेत. त्यांच्याच जोडीला मुंबईचा सुधीर नाईक हा फलंदाजही घेण्यात आलेला आहे.

अशा रीतीने संघाची बाजू मजबूत करण्यात आलेली आहे. गावसकर, बोस व नाईक या आघाडीवीरांच्या खाली वाडेकर, विश्वनाथ, अशोक मन्कड, ब्रिजेश पटेल हे फलंदाज मधल्या फळीत खेळणारे आहेत. अबीदअली, सोलकर व मदनलाल हे अष्टपैलू खेळाडू आहेत. दोघे यष्टीरक्षक इंजिनिअर व किरमानी हे फलंदाजीतही वाकबगार आहेत.

मदनलाल, अबीद व सोलकर यांच्यापैकी दोघेजण नवीन चेंडूने गोलंदाजी करतील तर चंद्रा, बेदी, प्रसन्ना व वेंकी हे गोलंदाज मंदगतीने फिरकीचे चेंडू टाकतील. जगात आज मंदगती गोलंदाज कमी झालेले दिसतात. ऑस्ट्रेलिया, वेस्टइंडिज, इंग्लंड अशा मोठ्या मोठ्या संघांतूनही एकेकच चांगला मंदगती गोलंदाज दिसतो. त्या मानाने भारताकडे आज सर्वांत जास्त मंदगती गोलंदाज आहेत. त्यांचा दर्जाही श्रेष्ठ आहे. त्यामुळेच भारताची मंदगती गोलंदाजी आज जगात सर्वश्रेष्ठ ठरते.

असे असल्यामुळे व भारतीय संघात अनेक अनुभवी वीर

वेंकटराघवन



प्रसन्ना



गोलंदाजीची आघाडी—

असल्यामुळे भारतालाच यंदाही यश मिळावे अशी कोणीही इच्छा करील.

संघात आताही जुनेच खेळाडू असले तरी इंग्लंडमधील परिस्थिती मात्र १९७१ च्या दौऱ्याप्रमाणे नाही. त्या वेळी हवा पुष्कळच चांगली होती. यावेळी मात्र पावसाचा व्यत्यय येण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे खेळपट्ट्या ओलसर राहातील आणि अशा ओलसर खेळपट्ट्यांवर खेळण्याची आपल्याला सवय कुठे आहे ?

तसेच इंग्लंडचा संघ वेस्टइंडिजहून परतलेला असणार. वेस्टइंडिजमध्ये त्यांच्या डेनिस एमिस, टोनी ग्रेग, जीऑफ बॉयकॉट, ॲलन नॉट व पॅट पोकॉक या पाच खेळाडूंना उत्तम फॉर्म लागलेला आहे.

त्यामुळे ते खेळाडू भारतीय संघाला बरेच जड जातील असे वाटते.

अशा रीतीने यंदा खेळपट्ट्या अवघड असल्याकारणाने व इंग्लंडचे काही खेळाडू भरात असल्याकारणाने आपल्याला टेस्टसामने सोपे जातील असे वाटत नाही. सामने जिंकण्यासाठी आपणास झटावेच लागणार आहे.

१९६७ साली आपला संघ असाच इंग्लिश हंगामाच्या पहिल्या अर्ध्यात तीन टेस्टस् खेळण्यासाठी गेला होता. परंतु त्या दौऱ्यात थंडगार वारे आणि ओलसर खेळपट्टीमुळे आपणास काही म्हणून काही जमले नाही आणि शेवटी तिन्ही टेस्टस्‌मध्ये आपला पराभव झाला. अर्थात त्यावेळी आपले बरेच खेळाडू इंग्लंडच्या दौऱ्यावर प्रथमच गेले होते. त्यामुळे त्यांची भंबेरी उडणे स्वाभाविक होते. इंग्लंडमध्ये आठवड्यातून सहा दिवस क्रिकेट असते. पाहुण्यासंघाला फक्त रविवारची सुट्टी मिळते. एक मॅच संपली की तेथूनच पुढील मुक्कामाला हलावे लागते. लगेच दुसऱ्या दिवसापासून दुसरी मॅच सुरू! याचा ज्यांना सराव नसतो त्यांचे फार हाल होतात. आपल्याकडे मात्र रोजच्या रोज सामने कधीच नसतात. खेळाडूंना आठवड्याचे शनिवार-रविवार सामने खेळावे लागतात. जेव्हा मोठे सामने असतात तेव्हा दोन सामन्यांच्या दरम्यान सुट्टीही भरपूर असते. त्यामुळे खेळाडूंना विश्रांती घेत खेळता येते. पण सुदैवाने आपल्या संघात असे तीन खेळाडू आहेत की त्यांना इंग्लंडमधील जिकिरीच्या कार्यक्रमाचा चांगलाच अनुभव आहे. ते खेळाडू म्हणजे फरूक इंजिनिअर, बिशनसिंग बेदी व वेंकटराघवन हे तिघेहीजण धंदेवाईक खेळाडू म्हणून गतवर्षी इंग्लंडमध्ये खेळले होते. यांपैकी बेदी हा लागोपाठ दोन हंगामात इंग्लंडमधील एका कौंटीसंघातर्फे खेळला होता व फरूक इंजिनिअर हा तर गेली पाच वर्षे धंदेवाईक खेळाडू म्हणून इंग्लंडमध्ये खेळतो आहे. या तिघांच्या अनुभवाचा लाभ यंदा भारतीय संघास मिळाल्याशिवाय राहाणार नाही.

आज हजारो क्रिकेटरसिकांचे लक्ष या दौऱ्याने वेधून घेतले आहे. गावसकर व सोलकर यांना दौऱ्यावर निघण्यापूर्वी फॉर्म नव्हता. म्हणूनच ते दोघेही दौऱ्यावर काय कामगिरी करतात हे पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमिक उत्सुक आहेत. चंद्रशेखर हा पूर्वीप्रमाणेच गाजतो की नाही याकडे अनेकांचे लक्ष लागलेले आहे. गेल्या खेपेला अशोक मन्कड हा फलंदाजीत काहीच पराक्रम करू शकला नव्हता; पण फेब्रुवारीतील श्रीलंका दौऱ्यात तो विशेष चमकला आहे. त्यामुळे त्याच्याकडून सर्वांना फार मोठ्या अपेक्षा आहेत. खुद्द टेस्टसामन्यात प्रसन्नाला घेणार की वेंकटराघवनला घेणार हेही पाहण्यासारखे होईल आणि मुख्य गोष्ट उरली ती अजित वाडेकरची ! आजवर वाडेकरने वेस्टइंडिजविरुद्ध एकदा, इंग्लंडविरुद्ध दोनदा आणि श्रीलंकेविरुद्ध एकदा नेतृत्व केलेले आहे. त्यांच्याबरोबरच्या एकाही दौऱ्यात त्याने रबर गमावलेले नाही (रबर म्हणजे विजयाधिक्य) उलट ते मिळवलेलेच आहे. असा हा यशस्वी ठरलेला कर्णधार यंदाही यश मिळवतो की नाही हे बघणे मोठे मनोरंजक ठरणार आहे. यंदा हिवाळ्यात भारतामध्ये वेस्टइंडिजचा संघ दौऱ्यावर येणार आहे. इंग्लंडमध्ये आपल्याला यश मिळाले तर वेस्टइंडिजशी लढत द्यायला आपल्याला विशेष जोर येईल हे निराळे सांगायला पाहिजे का ?

□ □ □

'किशोर' मार्च १९७४ अंकातील 'चित्रबोध–शब्दशोध' या सदरातील कोड्याची बिनचूक उत्तरे पाठवणाऱ्यांची नावे :

१. **संजयकुमार भागवत**, नागपूर.
२. **नीला वसंत महाडीक**, मुंबई.
३. **विजय वा. सौदागर**, आजगाव.
४. **विनय केशव भावे**, मुंबई.
५. **रवीन्द्र दि. जगताप**, पुणे.
६. **सुनिल मुजुमदार**, भिलाईनगर.
७. **बाळकृष्ण पद्मजा आणि मकरंद तावडे**
८. **अरविन्द सीताराम नलावडे**, माझगांव.
९. **बेबी वंदना रामचंद्र पुरंदरे**, मुंबई.
१०. **संदीप वैजनाथ भागवत**, मुंबई.
११. **संदीप चंद्रकांत महागावकर**, मुंबई.
१२. **सुधीर, सुहास आणि सुषमा मुकुंद संत**, पुणे.
१३. **राजेन्द्र आणि अनिल ग. भस्मे**, सातारा.
१४. **संजय पाटील**, मुंबई.
१५. **किशोर आणि यशवंत मा. मानकर**, डोंबिवली.
१६. **श्रीकांत केळकर**, मुंबई.

सूचना : स्पर्धकांनी आपली उत्तरे प्रत्येक महिन्याच्या १ तारखेच्या आत कार्यालयात पोचतील अशा बेताने पाठवावीत.



आबुराव टबुराव

: म. वि. कोल्हटकर :

एक होते आबूराव. अंगाने गबूराव. तोण्डाचे खाबूराव. लोक म्हणत ऐसपैस गणपतराव. ढीगभर पोट. कळकट पंचा. मळकट जानवे. धुरकट चेहरा आणि तेलकट हात. जाडजूड झारे, फताडी उलथनी, अगडबंब डाव अशी आयुधे घेऊन आबुराव आपल्या तुकडीबरोबर निघाले की लोक ओळखत भलेमोठे कार्य निघाले आहे. गावजेवण होणार आहे. त्याशिवाय ही खाशी तुकडी चाल करून जाणार नाही.

पुढल्या दारी कनातीचा मांडव तर मागीलदारी चुलवणाचा मांडव. तिथे राक्षसी हंडे, अजस्त्र पराती, कासंड्या, खोल खोल ओगराळी, माणूस बुडेल एवढी पातेली, टोप, गंज अशा पसाऱ्यात शोभेल असा आडवातिडवा आबुराव. इतर आचारी कपभर चहावर, जिलबीच्या वासावर फार तर विडीच्या झुरक्यावर खूष असायचे आबुरावला लागायचा तीन बश्या चिवडा, ·अर्धा डझन केळी आणि निरशा दुधाचा अधून मधून चहा. मग दरबार भरे. गंजवालाच्या पाटावर आबुराव बैठक जमवे. डावीकडे घंगाळी. उजवीकडे जिलबीचे पीठ. पाठीमागे वाणसौदा. आसपास भाज्या चिरणाऱ्या बायका आणि हाताखाली झुलणारे सुदामदेव आचारी.

तेल तेच, तूप तेच. पीठ तेच, मीठ तेच. पण आबुरावचा हात लागला की स्वैपाकाला अमृताची गोडी चढे. जिलबीचे कडे खमंग होई. चकलीचे वेढे खुसखुशीत लागे. नुसत्या नजरेने ह्याला मोहन किती, तुपाची कणी धरेल की नाही, पाकाला गोळी पडेल की नाही हे आबुराव सांगे. मी मी म्हणणाऱ्या अन्नपूर्णा आबुराव आला की माघारी फिरत. सारे सामान त्याच्या हवाली करीत. फक्त अधूनमधून आबुरावची बडदास्त सांभाळली की झाले. ही पहाट उजाडल्यापासून तो ती पहाट उजाडेपर्यंत पंगती चालोत, आबुरावाची स्थापना झाली की चिंता नसे. मांडवात गणपती आणि स्वैपाकघरात आबुराव यांची प्रतिष्ठापना झाली की कार्य यशस्वी होणार याची यजमानाला खात्री वाटे.

देणाराचे हात राजी आहेत आणि खाणाराचे पोट समर्थ आहे तोपर्यंत माणसाने खात राहावे, असा आबुरावचा हिशेब होता. त्यामुळे पायलीच्या बुंदी पाडल्या की दहापाच लाडू तो दाढेखाली भरडून काढी. परातभर जिलबीचा घाणा झाला की दहावीस कडी बोल बोल बोलता नमुन्यावारी गट्टम करी. चिवडा तर त्याला भारी प्रिय. दोन्ही हातांनी अधूनमधून चव घेऊन तिखटमीठ ठरवण्यासाठी तो बकाणे भरीत राही.

आबुराव खादाड होता. पण चोरटा नव्हता. त्याचा हात लागला की पदार्थाला विलक्षण गोडवा येई. त्यामुळे आबुरावला सारीकडून मागणी येई. आबुरावच्या सोयीप्रमाणे कार्याचे मुहूर्तही मागेपुढे सरकवले जात.

वय वाढत गेले. पण आबुरावचे खाणे कमी झाले नाही. ते वाढतच चालले. त्याचे वजन पूर्वी ऐंशी किलो होते. आता काटा पुढे सरकत चालला. वजन वाढू लागले. वजनाच्या वाढीत वाढ होत राहिली तर महिन्याला चार दोन किलो वाढ आहेच. मागचे पाऊल नाही. होता होता त्याने शंभर किलोचा टप्पा केव्हाच ओलांडला. त्याच्या सांध्यामांध्यातून चरबी ठासून भरली. डोळ्यांच्या खालीवर तर इतके मांस चढले की त्याला डोळे उघडणे कष्टाचे होऊ लागले. मानेवर वशिंड उमटले. पोटाचा करणढोल. हाताचे भोपळे. पायाचे करेले. भिंगातून पाहिल्यावर अवाच्या सवा दिसावा तसा खरोखरच आबुराव दिसू लागला.

वाढता वाढता वाढे असे त्याचे शरीर वाढले. अवजड झाले. आपल्याच शरीराचे त्याला ओझे होऊ लागले. चार पावले चालून जायचे म्हणजे मोठे कष्टाचे होऊ लागले. जिना चढायचा म्हणजे धाप लागू लागली. पोट तर इतके पुढे आले की, खालचे पाऊल स्वतःचे स्वतःला दिसेनासे झाले. परात घेण्यासाठी हात पुढे करावेत तर स्वतःचे पोट आधी आडवे येई. पोटावर पंचाची गाठ टिकेना.

असे वजन वाढत चालले की आबुरावला काय करावे सुचेना. रात्र रात्र झोप येईना. बायको, मुले डाराडूर झोपलेली आणि हा आपला टक्क जागा. आता हा वेताळ असाच वाढत गेला तर व्हायचे कसे ? एक दिवस असा उजाडेल की आपण चहूबाजूंनी वाढलेले असू. अगदी गरगरीत चेंडू. स्वतःची गती नाही. हालचाल नाही. कुणीही यावे. धक्का द्यावा. तेवढ्यापुरता गोळा तिथल्या तिथे हलणार. नको हे जिणे ! असा तो रात्ररात्र विचार करी. डोळ्याला डोळा लागत नसे. जागरणामुळे पोटात उष्णता भडके. उष्णतेमुळे आग्यावेताळासारखी भूक लागे. मग केळ्याचे घड साफ कर, दुधाची पातेली सपाट्यासरशी पिऊन मोकळी कर, किलो दोन किलो शेंगदाण्यांचा भुगा पाड. भाकरी काय, पोळी काय, भात काय, भाज्या काय, घरात अन्नाचा दुष्काळ पडे. पोरे आळ्याकडे बघत. तरी आबुरावचा बकासुरी तडाखेबंद आहार सुरूच.

आणि याचा परिणाम म्हणून पुन्हा अंगाचा पसारा आणखी वाढत जाई.

रात्रीची वेळ होती. बायको आणि मुले गाढ झोपली होती. समोरची खिडकी सताड उघडी होती.

पलिकडे एक दुमजली बंगली होती. भोवती थोडीशी हिरवळ होती. मागे एक आंब्याचे झाड होते.

या बंगलीत एक गृहस्थ राहात होता. वयाने थोडा थकलेला होता. केस पिकलेले होते. भिवईचे केसही पिकले होते. डोळे पिंगट होते. त्याच्या घरात माणूस कोणीच नव्हते. एकटा जीव होता. त्याची सोबत करणारे फक्त एक मांजर होते. म्हातारा आणि त्याचे मांजर पहाटे उजाडता दूध केंद्रावर जात. येताना दुधाच्या बाटल्या आणि ब्रेडस् घेऊन येत. एरवी म्हातारा बाहेर पडत नसे. सतत घरात गुंतलेला असे.

खालच्या मजल्यावर तऱ्हेतऱ्हेच्या बाटल्या होत्या. नाना प्रकारची रसायने होती. परीक्षा नळ्या होत्या. बाटल्यांतील द्रव्ये तो गृहस्थ एकमेकात मिसळे. मग रसायनांचे शिसे घेई. त्यांचे मिश्रण करी. काही मोजमाप करी. उतरवून घेई. याप्रमाणे त्याचे सतत प्रयोग चालत.

वरच्या मजल्यावर मोठमोठी कपाटे होती. त्यांमध्ये जाडजूड ग्रंथ ठेवले होते. या ग्रंथालयामध्ये तो कधी कधी दिसे. अवजड पुस्तके उलगडून पाही. तासन् तास वाचत बसे.

एकूण तो म्हातारा गृहस्थ म्हणजे एक गूढ कोडे होते. तो कुणाशी बोलत नसे. कुणाशी हसत नसे. क्वचित् त्याच्या बागेत मुले शिरली की त्यांच्या हातावर लिमलेटची गोळी ठेवी आणि त्यांना बाहेर जाण्यास सांगे.

आबुरावने खिडकीतून पाहिले. बंगलीत खालच्या मजल्यावर एक दिवा होता. त्याचा प्रकाश तावदानातून झिरपत होता. बाकी बंगलीत सामसूम दिसत होती. कोणतीच हालचाल नव्हती. गेले तीनचार दिवस फक्त तेवढाच प्रकाश दिसत होता. बाकी जाग नव्हती. नंतर आबुरावला आठवले की मुले म्हणत होती लिमलेट-काका विलायतला गेले आहेत म्हणून.

हलकेच आबुराव उठला. बिछान्यावर बसला. भांडेभर पाणी प्यायला. त्याला थोडी हुशारी वाटली. तो उठला. त्याने बेताने दार उघडले. तो घराबाहेर पडला. त्याने ठरवले वेळ जाता जात नाही, तर बंगलीमध्ये काय काय आहे याचा पत्ता काढायचा.


आबुरावने भोवती हिंडून पाहिले. एके ठिकाणी कुंपणाची तार जमिनीलगत पडली होती. त्या ठिकाणाहून त्याने प्रवेश केला. मग तो खिडकीजवळ गेला. आतील कोणतीच वस्तू दिसत नव्हती. फक्त मंद प्रकाश हिरवळीवर पडला होता.

हाताने आबुरावने खिडकीचे दार ढकलले. ते आत सहज लोटले गेले. उग्र औषधांचा दर्प यावा तसा भपकारा बाहेर पडला. आत बाटल्या चमचम करीत होत्या. त्यात रंगीबेरंगी रसायने होती.

धोतराचा काचा मारून आबुरावने आत उतरायचे ठरवले. पोटापर्यंत तो सरकला, मग जाम अडकून बसला. तराजू खालीवर होतो तसे त्याचे शरीर झुलू लागले. त्याने हिसडा मारला. पोट फुगवले. नंतर बारीक केले. तेव्हा त्याचे शरीर जे आत फेकले गेले की बोलायची सोयच नाही! कपाटावर ते अजस्त्र शरीर आदळून दोन बाटल्या खळ्‌दिशी फुटल्या.

आबुरावला एखाद्या अद्‌भुत गुहेत प्रवेश केल्याप्रमाणे वाटले. त्याने फटाफटा बटणे लावली. पंखे सुरू केले. बंद केले. कुठे खिडक्यांची दारे उघड, झडपा खोल, कपाटात डोकावून बघ असे चाळे त्याने सुरू केले. आपण अगदी चड्डी घालणारा लहान खोडकर मुलगा झालो आहोत असे त्याला वाटले.

होता होता त्याची नजर भिंतीवरच्या घड्याळाकडे गेली. रात्रीचे साडे बारा झाले होते. एक खवल्या खवल्यांची पाल सर सर करीत उंच तक्तपोशीपर्यंत गेली. तिकडे आबुरावची नजर गेली.



वर शेल्फावर प्रथम मोठी, मग त्याहून लहान, मग त्याहून लहान अशा तेवीस काचेच्या बरण्या होत्या. तेविसावी बरणी म्हणजे अगदी छोटी, अत्तराच्या कुपीएवढी होती.

आबुरावने टेबलावरचे भिंग उचलले. डोळ्यांवर चढवले. एक एक अक्षर तो वाचू लागला. पहिल्या बाटलीवर लिहिले होते, 'वजन घटवण्याचे रसायन'. पुढल्या बाटलीवर तीच ओळ होती. फक्त खाली कंसात लिहिले होते, 'अधिक जहाल !' पुढल्या पुढल्या बाटल्या अधिक अधिक जहाल रसायनाच्या होत्या.

आपण स्वप्नात तर नाही ना असे आबुरावला वाटले. त्याच्या हातातून भिंग पडले. आबुरावाने आनंदाने उडी मारण्याचा प्रयत्न केला. पण फक्त पोटाची वळकटी जागच्या जागी हलली.

परमेश्वराने कृपा केली आणि इथे येण्याची बुद्धी दिली असे त्याला वाटले. कारण आता त्याचे वजन दीडशे किलोच्या पुढे भर वेगाने चालले होते. अशा वेळी त्याला हे दिव्य रसायन भेटले !

त्याने ठरवले आता अगदी जहाल डोस घ्यायचा आणि शरीराचे हे ओझे उतरवून टाकायचे. डोंगर चढायचा, उड्या मारायच्या, झाडावर चढायचे, कोलांट्या खायच्या. एक ना दोन. कारण गेली कित्येक वर्षे त्याच्या अवजड शरीराने त्याला बंदिस्त करून टाकले होते.

आबुरावने शेजारचे स्टूल ओढले. बऱ्याच कसरती करून तो हत्तीचे पिलू सर्कशीत स्टुलावर उभे राहाते तसा उभा राहिला. अगदी छोटी कुपी त्याने काढली. मागचा पुढचा विचार केला नाही. ती तोंडात ओतली. जाग्यावर ठेवली. मग मिळेल त्या दाराने वाट काढीत त्याने घर गाठले. तो बिछान्यावर आडवळला. अंगावर पांघरूण घेतले.

थोड्या वेळाने आबुरावला जाग आली. तेव्हा त्याच्या लक्षात आले की आपले पांघरूण कोणी उचलते आहे. त्याला वाटले बंड्या, भिकोबा, बाळी नाही तर सोनी असेल. कार्टी वाटेल तशी लोळत म्हणून त्याने पांघरूण गुरगटून घेतले. पुन्हा झोप झिर-झिरीत जाळ्याप्रमाणे डोळ्यांवर पसरली. पिंजारी टुई टुई करतो तसा ठेका लावून आबुराव घोरू लागला.

काही मिनिटे गेली. आबुरावची झोप चाळवली. त्याला आनंद वाटला. कारण त्याला पाय सहज उचलता येत होता. पोटाशी घेता येत होता. हात अजिबात त्रास न पडता हलवता येत होते. मान उचलत होती. काय करू न् काय नको असे त्याला झाले ! थोडे धूम पळून यावे किंवा सपासप हात मारून पाण्यात पोहावे असेही त्याला वाटले.

मोठ्या खुषीत आबुराव पुन्हा निजले.

आणखी काही मिनिटे गेली तेव्हा आबुरावला जाणवले की आपले पांघरूण अधांतरी आहे आणि आपल्यालाही कुणीतरी उचलले आहे.

आबुराव घाबरला.

थोडा वेळ गेला.

रुईच्या कापसाप्रमाणे आबुराव तरंगू लागले. उंच आढ्याला जाऊन भिडले. अगदी गच्च चिकटलेच. कारण त्यांचे ते आवाढव्य शरीर; पण त्याचे वजन इतके घटले, इतके घटले की विरळ कापसाचा भलामोठा ढग हवेत सोडून द्यावा.

तोंडास कोरड पडली. अंगाला घाम सुटला. आबुरावना वाटले मोठ्यांदा ओरडावे. पण आवाजच फुटेना. मोठ्या कष्टाने ते उद्गारले, 'आई ऽ आई ग' तेवढ्या शब्दांच्या धक्क्याने त्यांच्या शरीराचा ढग तिथल्या तिथे हलला.

'अग ए पार्वती, ए पार्वती ऽऽ!' आबुराव ओरडले.

पण त्यांच्या बायकोची झोप मोडली नाही.

तेव्हा आबुरावांनी हाका मारण्याचा सपाटा चालवला.

अंगाचा पोंगा तरंगतोच आहे आढ्याला घासून.

बायको चिडली आणि म्हणाली, 'गप्प निजा बघू. रात्रीची काय थट्टा चालवलीय! हाका काय मारताय धडधडीत नाव घेऊन?.... निजा अगोदर....बंड्या. कर रे त्यांना आडवे.'

इतके म्हणून पार्वतीने पांघरूण लपेटले आणि हरवलेली झोप पुन्हा मिळते का ते ती पाहू लागली.

आबुराव कळवळले. विव्हळून म्हणाले, 'अरे मला खाली घ्या रे कुणीतरी.'

त्यांचा रडवेला आवाज ऐकून त्यांची कजाग बायको जागी झाली.

'काय मेली कटकट लावलीय कुणास ठाऊक!' दात ओठ खात ती म्हणाली.

मग तिने दिवा लावला.

बघतात तर आबुराव आडव्या फळीच्याही वर.

'उतरा बघू आधी खाली? ही काय थट्टेची तऱ्हा की काय म्हणायची! चक्क आपले फळीवर पसरलात—आगगाडीच्या बर्थवर झोपावे तसे! उतरा, उतरा आधी!'

बायको कावून बोलत होती.

आबुराव गयावया करीत होते. म्हणत होते, 'नाही ग! शप्पथ, मी नाही ग चढलो.'

'मग गेलात कसे?'

'आपोआप.'

तेवढ्यात खिडकीतून वाऱ्याची झुळूक आली आणि आबु-रावांचा ढग चालला तरंगत झोपाळ्याच्या हलकडीपर्यंत.

ते पाहिल्यावर बायको चमकली. ती घाबरली, 'अहो, धावा! धावा!' म्हणून ओरडू लागली.

तिने दार उघडले.

तेव्हा आढ्याला पाठ लावलेले आबुराव म्हणाले, 'अग अग, दार मीट! नाही तर उडून बाहेर जाईन. मग सापडणार ना!

तेव्हा बायकोने घाईघाईने दार लावले.

पोरे उठली. त्यांनी दिव्यांच्याहीवर चिकटलेला माणूस पाहून भीतीच घेतली. ती किंचाळू लागली. आईला बिलगली. तेव्हा आई म्हणाली, 'आपलेच की रे बाबा. असं कसं झालं ऽऽऽ...'

'काय करू तरी ऽऽ? जा रे, भिकोबा, संतकाकांना उठव ऽऽ म्हणावं, मांत्रिक आणा. ऊठ! पळ! मागल्या दाराने जा ऽ' बायको म्हणू लागली.

पण भिकोबा जागचा हलेना.

बंड्यानेही आईचा पदर सोडला नाही.

'मांत्रिक नको मला. मी भूत नाही. मी आबुराव धांदरफळेच आहे. तुमचा बूकाका नव्हे का? असं काय रे करता?' आबुराव वरून पटापट बोलू लागले. आता शब्दसुद्धा त्यांच्या तोंडातून सटासटा बाहेर पडत होते.

मुले भ्यायली. विचित्र नजरेने बापाकडे पाहू लागली.

'काही नका करू....काही नका करू...ओढा मला खाली.... ओढा....नाहीतर चाललो मी उडून आभाळात!....' आबुराव काकुळतीने म्हणाले.

'अहो, पण ओढा कसे? तुम्ही आढ्याला, आम्ही जमिनीवर.... देवा देवा, कोण ही अवस्था रे ऽऽ' बायको कळवळली.

'चार दोर घ्या. सोडा पाळण्याचे. एक वळकटीचा. एक विहीरीचा! आणि हयगय करू नका. मला सोडू नका. अस्सा ओढा अस्सा ओढा की जातोय कुठं?' आबुराव म्हणाले.

मग मुलांनी दोर आणले. टेबलावर स्टूल चढले. त्यावर आबुरावांची बायको चढली. दोन दोर काखेत गुंफले. दोन पायांत गाठून टाकले. मग चार जण आबुरावांना खाली ओढू लागले.

चार दोऱ्या लावलेले ते पॅराशूट खाली आले! पण ते विरळ कापसासारखे हलके फूल झाले होते. त्यामुळे आबुरावचे शरीर वर उडून जाण्यासाठी धडपड करू लागले. तेव्हा दोन टोके पलंगाच्या



खुरांना बांधण्यात आली. एक कपाटाच्या कोयंड्यात, तर एक टेबलाच्या पायाला बांधण्यात आले. जेमतेम झुलत झुलत ते शरीर जमिनीच्या थोडे वर हेलकावे खात राहिले.

अशा प्रकारे आबुराव खाली तर आले. पण त्यांना खाली टिकवायचे कसे! दोऱ्यांना ओढ लागत होती. आबुरावांचे शरीर उडून जाण्याचा प्रयत्न करत होते. औषधाचा अंमल चढत होता. आणि आबुरावांचे शरीर पाचोळ्यासारखे हलके झाले होते. आता दूर कुठे तरी भरकटत जाणार याची त्यांना खात्री वाटू लागली. आपण अंधारात, काळोखात, वावटळीत सापडलो, गिरगिर करत ढगात गेलो तर? आबुरावांना नुसत्या कल्पनेने रडू आले.

दिवस उजाडला. बातमी चहूकडे पसरली. लांबून लांबून लोक पाहायला येऊ लागले. कुणी म्हणाले, 'तिकीट लावून दाखवा. आमचे काही म्हणणे नाही.'

एकाजणाने दोरी ओढून पाहिली.

आणखी एकाने हा खरा आबुराव नसावा, अशी शंका प्रदर्शित केली.

दुसरा म्हणाला, "हा पारावरचा मुंजा आहे; आता त्याला सोडू नका."

भेटीला आलेली जाड माणसे चपापली. आपलेही ओझे तर हरवणार नाही ना असे त्यांना वाटू लागले.

बिचारे बाबुराव केविलवाणेपणाने सर्वांच्याकडे पाहात होते. दोरीला हात लावला की किंचाळत होते.

आबुरावला जमिनीवर स्थिर कसा करायचा हा एक प्रश्न होता. शेजारचे बाजीराव घोरपडे मोठे हिकमतबाज गृहस्थ होते. मराठ्यांच्या इतिहासाचा त्यांनी खूप अभ्यास केला होता. आपल्या पावशेर मिशा पिळत ते पुढे आले. त्यांनी टाळी वाजवली. 'जातोय कुठ आबुराव? आणि आम्ही सोडू बरा!'

सर्व जण बाजीराव घोरपडे यांच्या तोंडाकडे पाहू लागले. अगदी आबुरावसुद्धा.

बाजीराव घोरपडे म्हणाले, 'विसरा. तुम्ही इतिहास विसरा!'

'अहो, पण कितपत विसरा?' एकाने विचारले.

'तुम्हांला नाही म्हणालो.' बाजीराव फटकळपणे बोलले.

'मस्तपैकी पोलादी चिलखत घाला. जिरेटोप घाला. समशेर आणा वोथट बघून. शिवाय पायांत वाळे, साखळ्या शेराशेराच्या. हातांत कडी लोखंडाची. जातोय कुठं बघू आबुराव?'

ही युक्ती सर्वांना नामी वाटली. ताबडतोब ऑर्डर रवाना झाली. लोहार आले. त्यांनी मापे घेतली. ते कामाला लागले. एकदोन दिवसांत तो जड पोशाख तयार झाला. आबुरावच्या अंगावर चढवण्यात आला.

पाय तेच म्हणजे हत्तीसारखे. हात तेच टंब फुगलेले. पोट तेच नगाऱ्यासारखे. आबुराव तोच पण हलकाफुल्ल झालेला. फुंकर मारली तर पाचपन्नास फूट उडून जाईल असा.

त्याच्या शरीरावर आता तो अजस्र पोलादी पोशाख चढवण्यात आला.



'या जन्मात काय काय भोग आहेत कुणास ठाऊक? चिलखत काय, तलवारी काय. वाळे काय. साखळ्या काय!' कुठून बुद्धी झाली आणि औषध प्यायलो असे आबुरावना झाले.

कुठेही जा डोक्यावर ओझे आहेच. पाठीवर ओझे, पायांत ओझे, हातांत ओझे. आबुरावला जन्म नकोसा झाला.

एकदा आबुराव आंघोळीला मोरीत शिरले. त्यांनी दार लावून घेतले. जिरेटोप, चिलखत उतरवून मनमुराद आंघोळ करावी असे वाटले. ते उघडेबंब झाले. उघडे होताच आढ्याला चिकटले. वरच्या एका भगदाडातून बाहेर पडले. चालले तरंगत.

गच्चीवर एकदोघे ओरडले. लोकांनी धावपळ केली. आणि मांजा तुटलेला पतंग पकडावा तसे आबुरावला पकडून आणले.

मग मात्र आबुरावने पुन्हा कधी तो जड पोशाख उतरवण्याचा अविचार केला नाही.

आता हात हे हात उरले नव्हते. तर वजनदार पट्टी उरली होती. खाण्यासाठी पदार्थ उचलायचा म्हटले तर हाताची तरफ खट्टदिशी खाली येई. फट्टदिशी वर येई.

आबुरावला आठवले, पूर्वी आपण कसे हळूवारपणे, बेतशीर पदार्थ उचलू शकत होतो.

आता पावले ही पावले उरली नव्हती. तर वजन उचलायचे, टाकायचे. उचलायचे, टाकायचे. आणि कष्टाने अक्कट दुक्कटची घरे घेत पुढे जायचे.

धंदा तर पार बसला होता. घरी मुलांची आबाळ सुरू झाली. धड जेवायला नाही. कपडालत्ता नाही.

तेव्हा कोणी म्हणाले, 'याला मोकळा नका बसू देऊ. उद्योगाला लावा.'

आबुरावना नोकरी देण्यात आली. एक सिनेमा थिएटर होते. बाहेर एक छोटे लाकडी घर उभे करण्यात आले. त्यामध्ये आबुरावला बसवण्यात येई. गिऱ्हाईक आले की यंत्राचा खटका दाबावा त्याप्रमाणे हाताची पट्टी फट्‌टदिशी खाली येई. वर, खाली, वर, खाली अशा हालचाली होत. मोड, सुट्टी नाणी यांची वर्गवारी होई. तिकीट फाडले जाई. खटका वर, तिकीट हातात, पुन्हा खटका खाली, हात खाली. पुन्हा कळ दाबावी तसा हात वर, हात खाली.

आबुराव हवालदील झाला होता. देवाची प्रार्थना करीत होता व म्हणत होता, 'सोडव मला या त्रासातून.' कारण जिवंत असून नसल्यासारखा तो होता.

त्याचे वजन घटत घटत आठ किलोवर आले. तेव्हा तो घाबरला. असेच वजन उतरत गेले आणि शून्य किलोवर आले की संपलेच.

त्याला पूर्वीचे दिवस आठवले. केवढे मोठे भव्य शरीर! आणि सगळेच्या सगळे स्वतःचे. आता हे खोटे आणि उसने शरीर दिवसभर वागवायचे आणि मिरवत राहायचे. असे ना का भलेमोठे. केवढे शोभिवंत दिसायचे! मनात आले तर हळूहळू का होईना कुठेही जाता यायचे. वारा आला तर भीती वाटत नसे. उलट आता वारा आला की चिलखताच्या आत शरीर फडफड करू लागते.

आबुराव परमेश्वराचा धावा करीत होता. तेव्हा त्याला आईचे शब्द आठवले. ती लहानपणी एकदा म्हणाली होती, 'परमेश्वर दूर नसतो; आपल्याजवळच असतो.' अशा परमेश्वराचा तो शोध करू लागला. त्याच्या लक्षात आले, ज्याने वजने हरवण्याची किमया केली तो फिरून वजन देण्याची जादू काय म्हणून घडवणार नाही? तो नक्कीच घडवेल. आपण याला शरण जावे. त्याची वाट पाहावी.

एके दिवशी बंगलीमध्ये थोडी हालचाल दिसली. मांजरही घुटमळताना दिसले. आबुरावला हायसे वाटले. मोठ्या लगबगीने तो बंगलीत गेला. लिमलेटकाका खिन्न झाले होते. कारण त्यांच्या प्रयोगशाळेत बरीच पडझड झाली होती. दारे सताड उघडी होती आणि एक महत्त्वाची कुपी नाहीशी झाली होती.

आबुरावांनी काकांचे पाय धरले. 'सोडवा मला यांतून.' ते म्हणाले.

त्या विचित्र पोशाखातील व्यक्तीला पाहून लिमलेटकाका चमकले. दूर होत ते म्हणाले, 'माझ्याकडून आपल्याला काय हवे आहे?'

शेल्फाकडे बोट दाखवीत आबुराव म्हणाले, 'तिथे एक कुपी होती, मी ती चोरली. पिऊन टाकली. मला क्षमा करा.'

काका चमकले, 'अरेरे! ते संप्रवत रसायन आपण प्यालात? अहो, उडून गेला असतात ना?' ते म्हणाले.

'वजने लावून मला कसातरी खाली ठेवण्यात आले आहे. पाहा ही माझी दशा.' चिलखताकडे हात करीत आबुराव म्हणाले.

'घाबरू नका. धीर धरा. माझे दोन्ही प्रकारचे प्रयोग चालू आहेत. आपण प्रयत्न करू.' काका म्हणाले.

काही दिवस त्यांनी आबुरावांना वेगवेगळी रसायने आलटून पालटून दिली. आणि चमत्कार घडला. आबुरावांच्या शरीरात वजन भरू लागले. हळूहळू ते मूळ पदावर आले. भरीव झाले. पृथ्वीमातेची माया त्यांना जाणवू लागली. गुरुत्वाकर्षणाचे हरवत चाललेले नाते पुन्हा जुळले.


आबुराव बाहेर पडले. अंगणात आले. त्यांना कित्ती कित्ती आनंद झाला. ही पृथ्वी सुंदर आहे. ही माणसे मायाळू आहेत, मळकट पंचा, असे जाणवले. मळकट जानवे, तेलकट चेहरा या आपल्या वेशात त्यांनी आरोळी ठोकली, 'या रे ऽ या ऽऽ'. कोपऱ्यात खूप दिवस उभे असणाऱ्या झारे, उलथनी, कढया यांनी ती ऐकली.


पुन्हा पहाटे झारा, उलथनी, कढया यांची तुकडी एक दोन करीत आनंदाने बाहेर पडू लागली.

(कल्पना परकीय)

☐ ☐ ☐







टाइपरायटरचा निर्माता

ख्रिस्टोफर शोल्स

: प्रा. ना. वा. कोगेकर :

त्या दिवशीच्या विमानाने विजय इंग्लंडहून परत भारतात आला. येताना त्याने स्वतःच्या उपयोगासाठी एक छोटासा टाइपरायटर (टंकलेखन यंत्र) आपल्याबरोबर आणला. छोटासा म्हणजे केवढा ? जेमतेम ५–५॥ पौंड वजनाचा. आकारानेही लहान. मला फार आवडला तो ! मी मागताच विजयने मला देऊन टाकला. आमच्या आनंदला ही गोष्ट समजली मात्र ! त्याबरोबर आपले नाव, पत्ता, शाळेतील वर्ग इत्यादी या टाइपरायटरवर स्वतःच टाइप करण्याचा हट्ट त्याने धरला. मी कबूल झालो. टाइपरायटरवरील एकेक अक्षर पाहून, जरूर त्या अक्षराची चावी खाली दाबून आनंदाने आपले नाव, पत्ता सर्व काही व्यवस्थितपणे उमटवली व आपल्यासमोरील छोट्याशा टाईपरायटरचे तो मोठ्या कौतुकाने निरीक्षण करू लागला. त्याबरोबर आता प्रश्नांची सरबत्ती सुरू होणार हे मी ओळखले. "टाईपरायटरचा शोध कोणी, कसा व केव्हा लावला हो ?" त्याने सलामीचा प्रश्न केला. "ख्रिस्टोफर लॅथेम् शोल्स नावाच्या एका अमेरिकन संशोधकाने या यंत्राचा शोध लावला. अमेरिकेत विस्कॉनसिन या नावाचे जे घटकराज्य आहे त्यातील मिलवॉकी या शहरात तो राहात असे. एक विक्षिप्त मनुष्य म्हणून तो तेथे प्रसिद्ध होता. त्याचा जन्म १८२० साली झाला. आपल्या वयाच्या चौदाव्या वर्षापासून त्याने जुळारी (कंपोझिटर) म्हणून काम करण्यास सुरुवात केली. चार वर्षांनंतर म्हणजे वयाच्या १८ व्या वर्षी शोल्स एका वर्तमानपत्राचा संपादक म्हणून काम पाहू लागला." मी सांगितले.

"पण वर्तमानपत्राचा संपादक व टाईपरायटरचा शोध यांचा संबंध कसा काय लागतो ?" आनंदने मध्येच प्रश्न केला.

"अरे हा शोल्स हरहुन्नरी होता. आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी शोल्स संपादकाचे काम सोडून पोस्टमास्तर बनला. इतकेच नव्हे तर त्यानंतर तो जकातवसुलीची कामे करू लागला. त्यानंतर पुन्हा एकदा तो वर्तमानपत्राचा संपादक बनला. हे तर काहीच नाही. अमेरिकन सिनेटच्या निवडणुकीत उभा राहून तो आपल्या गावातून सिनेटर म्हणून निवडून देखील आला. मात्र त्याचा पिंड होता यंत्रज्ञाचा. छपाईच्या कामात त्याचे फार लक्ष असे. आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर तिकिटे, पावत्या, हिशेबाची पुस्तके इत्यादींवर १, २, ३, ४ इत्यादी आकडे उमटवणारे एक यंत्रही त्याने बनवले."

"पण टाईपरायटर यंत्र बनवण्याची कल्पना शोल्सला कशी सुचली ते सांगा ना !" आनंद म्हणाला.

"सांगतो ! या शोल्सचा कार्लोस ग्लिडेन नावाचा, त्याच्याहून लहान वयाचा एक मित्र होता. ग्लिडेनलाही यंत्रे बनवण्याची फार हौस. शोल्सने आकडे उमटवण्याचे आपले यंत्र ग्लिडेनला दाखवताच, आकड्याऐवजी प्रत्यक्ष अक्षरे उमटवण्याचे यंत्र बनवण्याविषयी शोल्सला सुचवले. हीच टाइपरायटरच्या जन्माची सुरुवात म्हणावी लागेल." मी म्हणालो.

"पण काहो, यंत्रे बनवण्याचा आपला नाद पुरा करण्यासाठी शोल्सला बराच पैसा लागत असला पाहिजे नाही का ? मग शोल्स चांगला श्रीमंत असला पाहिजे खरे ना ?" आनंदने मध्येच एक शंका काढली.

"छे! छे! उलट शोल्स अगदी गरीब होता व दुर्दैवाची गोष्ट अशी की आयुष्याच्या अखेरपर्यंत तो गरीबच राहिला." मी म्हणालो.

"म्हणजे त्याच्या यंत्रांनी त्याची 'गरिबी हटवली' नाही ? पण अक्षरांचे खिळे न जुळवता, कागदावर मजकूर उमटवणारे यंत्र

बनवण्याची कल्पना शोल्सच्या अगोदर कोणालाच सुचली नव्हती का ?"

"सुचली होती तर ! इग्लंड व अमेरिकेतील काही संशोधकांच्या मनात शोल्सपूर्वी वरीलसारख्या यंत्राची कल्पना घोळत होती. १८२९ मध्ये बर्ट नावाच्या एका अमेरिकन संशोधकाने तसे प्रयत्नही केल्याचे दिसते. परंतु वरील यंत्राची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याचे काम शोल्सनेच हातात घेतले. त्यासाठी त्याचा मित्र ग्लिडेन याने त्याला पैशाची मदत करण्याचे कबूलही केले. आपल्या संकल्पित यंत्राच्या बनावटीच्या आकृत्या, नकाशे, अक्षरांचे नमुने इत्यादी तयार करण्यासाठी शोल्सने कित्येक रात्रीच्या रात्री जागून काढल्या. अर्थात याचा परिणाम म्हणून तो अशक्त व आजाऱ्यासारखा दिसू लागला. अखेर आपल्या कल्पनेप्रमाणे त्याने कसेबसे एक टंकलेखनयंत्र बनवले."

"या यंत्राचे स्वरूप काय होते ?" आनंदने लागलीच प्रश्न केला.

"शोल्सने तयार केलेल्या या ओबडधोबड यंत्रात एका छोट्याशा लोखंडी पट्टीवर इंग्रजीतील एक अक्षर कोरलेले होते. या पट्टीचे एक टोक दाबताच दुसऱ्या टोकावरील इंग्रजी अक्षर उचलले जाई व कार्बन कागदाखाली ठेवलेल्या एका पांढऱ्या कागदावर ते अक्षर उमटले जाई. आपल्या यंत्रात, शोल्सने प्रत्येक अक्षरासाठी एक एक पट्टी तयार केली होती. या नव्या यंत्राला आपल्या मित्राच्या सूचनेनुसार शोल्सने 'टाईपरायटर' हे नाव दिले."

"तर मग शोल्सचे पहिले यंत्र, पूर्ण स्वरूपात प्रथम केव्हा जन्मले ?" आनंदने मोठ्या उत्सुकतेने विचारले.


"१८६७ च्या सप्टेंबर महिन्यात. त्याचे हे टंकलेखन यंत्र बाहेरून मोठ्या पेटीसारखे दिसे. त्यात प्रत्येक अक्षरासाठी एक एक पट्टी होती. पट्टीवर पांढऱ्या रंगाने संबंधित अक्षर लिहिलेले असे. त्याखेरीज खुणा व आकडे यांसाठी मधूनमधून लहान लहान पट्ट्याही होत्या. ओळ संपली की इशारा देणारी घंटा वाजे. त्यामुळे कागद वर सरकवून दुसऱ्या ओळीत अक्षरे उमटविणे शक्य होई."

"मग हे टाईपरायटर यंत्र तयार केल्यावर, तशी यंत्रे विकून शोल्सला लाखो डॉलर्स मिळवता आले असतील नाही का ?" आनंदने खुश होऊन विचारले.

"छे ! शोल्सच्या सुरवातीच्या यंत्रात सुबकपणा बिलकूल नव्हता. त्या यंत्रावर टाईप करण्यासाठी वेळही फार लागे. साहजिकच, आपल्या मित्रांच्या सूचनांनुसार त्याने आपल्या या यंत्रात निरनिराळ्या सुधारणा करण्यास सुरुवात केली. पण दर वेळेला सुधारणा करून नवे यंत्र बनवावे लागल्यामुळे शोल्सजवळचे सर्व पैसे संपले व तो कंगाल बनला. त्याबरोबर त्याने आपल्या मित्रांना पैशाच्या मदतीसाठी विनंती करणारी पत्रे, आपल्या टंकलेखन यंत्रावर टाईप करून पाठवण्यास सुरुवात केली. पण त्यात त्याला यश आले नाही. अखेर १८६८ साली डेन्स मोअर नावाच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या नजरेस, शोल्सच्या यंत्रावर टाईप केलेले एक पत्र आले. त्याबरोबर या संबंधातले त्याचे कुतूहल जागृत झाले. त्याने सदर टाइपरायटरचे हक्क विकत घेण्याच्या दृष्टीने शोल्सची भेट घेतली. मात्र शोल्सने बनवलेल्या मूळ यंत्रात निरनिराळ्या सुधारणा सुचवून त्याने त्याला नवे सुधारित यंत्र बनविण्यास सांगितले. त्याप्रमाणे शोल्सने बरीच सुधारित यंत्रे बनवली. त्यांमधून एक यंत्र पसंत करून डेन्स मोअरने त्याची किंमत सुमारे २५० डॉलर्स ठरवली." मी म्हणालो. "त्यानंतर लागलीच जगातील निरनिराळ्या देशांत शोल्सच्या टाईपरायटर यंत्राच्या वापरास सुरुवात झाली असेल नाही का ?" आनंदने विचारले.

"नाही. १८७१ साली शोल्सचा टाईपरायटर न्यूयॉर्क शहरात, एका बड्या दुकानात, सर्व लोकांनी पाहावा म्हणून ठेवण्यात आला. पण आश्चर्य असे की, या यंत्राची कोणीच दखल घेतली नाही. जवळजवळ वर्षभर हे यंत्र तसेच दुकानाच्या दर्शनी भागात पडून होते. अखेर डेन्स मोअरने शोल्सच्या वरील यंत्राबाबत बेनेडिक्ट व रेमिंग्टन या दोघा अमेरिकन उद्योगपतींना एक पत्र लिहिले. वरील दोघा उद्योगपतींनी हे यंत्र पाहून, त्याची उपयुक्तता अचूक हेरली व शोल्सच्या यंत्राच्या हक्कासंबंधी बोलणी सुरू केली. रेमिंग्टन-बेनेडिक्ट यांच्या कंपनीने शोल्सच्या टाईपरायटरप्रमाणे एक हजार यंत्रे तयार करून ती जगातील सर्व देशांत विकण्याचे हक्क आपणाकडे घेतले व टाईपरायटरचे नाव रेमिंग्टन टाईपरायटर असे नक्की केले."

"मग हे हक्क रेमिंग्टनला देण्यासाठी शोल्सला खूप पैसे मिळाले असतील नाही का ?" आनंदने विचारले.



"नाही! सर्व हक्क देण्याबद्दल शोल्सला फक्त १२ हजार डॉलर्स इतकीच रक्कम देण्यात आली आणि या व्यवहारात मध्यस्थी करणारा दलाल डेन्स मोअर याने मात्र आपले कमिशन म्हणून या व्यवहारात ५ लाख डॉलर्स एवढी रक्कम घशात घातली. हे आश्चर्य नाही काय?"

"अरेरे! स्वतः शोधलेल्या या यंत्राचा जनक शोल्स मात्र कमी मोबदला मिळाल्यामुळे गरीबच राहिला असेच ना!" आनंद हळहळून म्हणाला.

"हो. धन्याला धत्तुरा व दलालाला मलिदा असाच प्रकार वरील बाबतीत झाला. आपण शोधलेल्या टंकलेखन यंत्राची प्रगती व जगातील सर्व देशांत होणारा त्याचा वापर शोल्स जरी मोठ्या समाधानाने व शांतपणे पाहात होता तरी प्रत्यक्षात त्याच्या नशिबी गरिबीच आली होती. दुर्दैवच त्याचे नाही तर दुसरे काय? तशातच वयाच्या साठाव्या वर्षी शोल्सला क्षयरोगाने पछाडले. कोरड्या हवेच्या ठिकाणी जाऊन प्रकृती सुधारण्यासाठी जरूर असणारा पैसा त्याच्यापाशी नव्हता. डेन्स मोअरने शोल्सची ही अडचण ओळखून फ्लोरिडा भागातील एका निवांत जागी त्याची राहण्याची व्यवस्था केली. पण या गोष्टीला आता फारच उशीर झालेला होता; कारण शोल्सची प्रकृती हे होईपर्यंत फारच ढासळली होती. अखेर १८९० च्या फेब्रुवारी महिन्यात शोल्सने या जगाचा कायमचा निरोप घेतला. त्याच्यामागे त्याची १० मुले होती."

शोल्सच्या आयुष्याचा उत्तरार्ध ऐकून आनंदला फारच वाईट वाटल्याचे त्याच्या चेहेऱ्याकडे पाहून माझ्या ध्यानात आले.

टाईपरायटर म्हणजे लेखणीला मागे सारणारे यंत्रच! वेग, सुवाच्यता व सोय यामुळे हरतऱ्हेच्या कारभारासाठी टंकलेखक आजकाल अत्यावश्यक ठरले जाऊन जगातल्या बहुतेक देशांत तेथल्या भाषांच्या लिप्यांचे टंकलेखक तयार झाले आहेत. टंकलेखकाखेरीज कोणत्याही कार्यालयाचे काम आज चालणे शक्य नाही इतका तो आपल्या जीवनाचा भाग झाला आहे.

■ ■ ■

सुट्टीत शिकायचे

राजूने ठरवले
उन्हाळ्याच्या सुट्टीत
शिकायची
एखादी तरी
कला।


पोहणे, सायक्लींग
किंवा गाणे–बजावणे
नाहीतर
तबला॥

शेजारच्या वाडीतल्या
विहिरीचा तळ
दिसू लागला
म्हणून

राजूने
पोहण्याचा नादच
सोडला।

भाड्याची
सायकल घेऊन
राजूने
मुहूर्त केला
पण........
पहिल्याच दिवशी
उलटा अनुभव
आला॥

ब्रेक नसलेल्या
सायकलचा
पाहाता पाहाता
तोल जो
गेला
तो राजू
मोटारखाली
सापडता सापडता
थोडक्यात
वाचला।



प्रसंगाचा या
धसका
राजूने घेतला
अन्
सायकलवर
न बसण्याचा
निश्चय
केला॥

राजू आता
गाण्याकडे वळला
पण
साऽरेग, सा रे गऽऽ
करून
थोड्याच दिवसांत
थबकला।



राहता राहिला
तबला
राजूने हातात घेतला
पहिला ताल
घेतो नाही तोच
सुट्टीचा महिनाच
संपला॥

—भालचंद्र कडणे



निंदरथळ माणूस

होमो इरेक्टस या पूर्वमानवाची हकीकत आपण मागील अंकी पाहिली. मानवाच्या उत्क्रांतीत यानंतर आणखी काही टप्पे झाले. पण यानंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे निंदरथळ मानव हा होय. इंग्रजीतला या शब्दाचा उच्चार निॲन्डरथॅल असा आहे. मराठीत आपल्या उच्चाराच्या सोयीसाठी आपण त्याला 'निंदरथळ' असे म्हणू या. चित्रकार किंवा हास्यचित्रकार यांना जेव्हा वन्य अवस्थेमधील मानवाचे चित्र काढायचे असते तेव्हा ते निंदरथळ मानवाचे चित्र काढतात. गुहेच्या दारापाशी बसलेला आहे–हातात दगडापासून बनवलेले एखादे हत्यार आहे, अवतीभोवती जनावरांची हाडे इतस्ततः पसरलेली आहेत, अंगाभोवती वन्य प्राण्याचे कातडे गुंडाळलेले आहे, नजरेमध्ये शिकारीचा आविर्भाव आहे–असे हे चित्र असते.

निंदरथळ माणसाचे हे चित्र काल्पनिक असले तरी त्यात बरेच तथ्य आहे. आधुनिक मानवापेक्षा निंदरथळ पुष्कळच वन्य जीवन जगणारा होता. थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्याकरिता खाण्यासाठी मारलेल्या जनावराचे कातडे तो पांघरत असावा. बहुधा तो गुहांमधून वस्ती करत असावा. निंदरथळ मानवाच्या शरीराचे अवशेष व तो वापरत असलेली दगडाची हत्यारे युरोप, रशिया व मध्य आशिया या भागात सापडली आहेत. यावरून जगाच्या बऱ्याच मोठ्या भागात त्याचा वावर होता हे स्पष्ट होते.

पण हा निंदरथळ माणूस होता तरी केव्हा? निंदरथळ माणसाचे जगाच्या निरनिराळ्या भागांत जे अवशेष सापडले आहेत त्यांचा सूक्ष्म रीतीने अभ्यास करून शास्त्रज्ञांनी निंदरथळ माणूस हा सुमारे १,१०,००० ते ३५,००० वर्षांपूर्वी राहात होता असा अंदाज बांधला आहे. म्हणजे निंदरथळ माणसाचे या



निंदरथळ माणसाला गुहेच्या जागेसाठी अस्वलांशी लढाई करावी लागे.


भूतलावर सुमारे ७५,००० वर्षे वास्तव्य होते. हा निंदरथळ माणूस कसा होता? त्याच्या डोक्याची कवटी आधुनिक माणसाचा मेंदू राहील एवढी मोठी होती. पण डोक्याचा आकार मात्र वेगळा होता. आपल्या डोक्याची टाळू कशी चेंडूसारखी फुगीर असते तशी त्याची नव्हती. त्याचे डोके बरेचसे चपटे आणि मागच्या बाजूस वरवंट्यासारखे पुढे आलेले असे होते. त्याची हनुवटीही निमुळती नसून चपटीच होती व ती गळ्याकडच्या भागात उतरलेली अशी असे. त्याच्या गालाची हाडे मोठी व सपाट होती. भुवयांच्या वर कपाळाचे हाड एखादया उंचवट्यासारखे वर आलेले असे. त्याची शरीरयष्टी दणकट होती, पण त्याची चण मात्र काहीशी खुजटच होती. कारण त्याची उंची पाच फुटांहून थोडीशी



निंदरथळ माणसाचे कुटुंब अन्नाच्या शोधात भ्रमंतीवर आहे.

अधिक असेल. त्याचे हातपाय मजबूत, घट्ट व पिळदार असत. पण पायांची हाडे वाकलेली असल्यामुळे तो काहीसा फेंगडा चालत असावा.

निंदरथळ माणसाला अग्नीचा उपयोग निश्चितच माहीत होता. जाळ कसा पेटवावा हे त्याला अवगत झाले असावे आणि म्हणून तो अग्नीचा नियमितपणे उपयोग करी. तो ज्या गुहांमधून राहात



मारलेल्या अस्वलांच्या कवट्यांचे हे 'विजयस्मरण'

असे तेथे जमीन खोदून जाळासाठी तो भट्ट्या तयार करी. तो गुहांमधून राहात असे पण घर तयार करण्याचे तंत्रही त्याने विकसित केले होते. रशियामध्ये निंदरथळ माणसाचे ज्या जागी अवशेष सापडले तेथे भट्ट्यांचे एक वर्तुळ आढळले. या वर्तुळाच्या बाहेर आणखी एका वर्तुळात हत्तीचे दात व हाडे जमिनीत खोवून बसवलेली आढळली हे बाहेरचे वर्तुळ म्हणजे जनावरांच्या कातड्यांची राहुटी उभी करण्याकरिता असावे असा तर्क निघतो. निंदरथळ माणूस काठ्या व गवत यांचा उपयोग करून झोपड्या निश्चितच बांधत होता.

उत्तम शिकारी

निंदरथळ माणूस उत्तम शिकारी होता हे सांगायला नको. शिकार करण्याच्या त्याच्या निरनिराळ्या क्लृप्त्या असत. रानटी मेंढ्या किंवा अशाच इतर काही प्राण्यांना हुसकावून लावून एखाद्या कड्याच्या कपारीवरून खोल खाली उडी घ्यावयास लावायचे आणि खाली दरीत चेंदामेंदा होऊन पडलेल्या या जनावरांचे मिष्टान्न भोजन करायचे, ही त्याच्या शिकारीची एक तऱ्हा होती. हत्ती, गेंडे यांसारख्या प्रचंड प्राण्यांपुढे निंदरथळ माघार घेत होता म्हणता का ? मुळीच नाही. अशा अजस्त्र प्राण्यांना एखाद्या मोठ्या खड्ड्यात पकडून निंदरथळ त्याची शिकार करी. निंदरथळ माणूस गुहांमधून राहत असे. पण गुहांमधून राहणारा आणखी एक प्राणी असे आणि तो म्हणजे भल्यामोठ्या, अवजड शरीराचे व अक्राळ-


विक्राळ दिसणारे अस्वल. गुहांतील जागेवरून निंदरथळ माणसाला या अस्वलाबरोबर नक्कीच झगडा करावा लागला असावा. वास्तविक या अजस्त्र अस्वलापुढे हा माणूस अगदीच छोटा, आणि एवढ्या मोठ्या अस्वलाशी लढाई करायची म्हणजे मोठ्या धोक्याची गोष्ट. तथापि निंदरथळ माणूस या अस्वलाशी झुंज घेत असे. एवढेच नव्हे तर त्याची यशस्वीपणे शिकार करी असा पुरावा मिळतो. अस्वलांना मारून आपल्या विजयाचे स्मारक म्हणून त्यांच्या कवट्या, हाडे वगैरे अवशेष निंदरथळ आपल्या गुहात रचून ठेवी. स्वित्झरलंडमधील काही गुहांत अस्वलांच्या हाडांची अशी विजयस्मारके आढळून आली. घोडे, हरणे, सांबरे, मेंढे या प्राण्यांचे मास हे निंदरथळ माणसाचे खाद्य होते. क्वचित कधी तो नरमांसाचेही भक्षण करी.

संस्कृतीची पहिली चाहूल

निंदरथळ माणसाच्या बुद्धीचा विकास किती झाला होता ? इराकमधील एका गुहेत निंदरथळ माणूस मृत माणसाची विल्हेवाट कशी लावी हे दाखवणारे अवशेष सापडले. निंदरथळ माणूस मृताचे शव झाडांच्या फांद्यांची ताटी करून त्यावर ठेवी, शवावर फुले टाकी आणि मग ती ताटी खड्ड्यात पुरी. दफनाची जागा सुद्धा पानाफुलांनी तो सुशोभित करी. याचा अर्थ असा की माणसाचे आयुष्य क्षणभंगुर आहे आणि मेल्यानंतर माणसाला दुसरा काही जन्म लाभतो असे विचार निंदरथळ माणसाच्या डोक्यात असावेत. माणसाच्या सामाजिक व धार्मिक विधींची ही पहिली चाहूल होती असे म्हणावयास हरकत नाही. निंदरथळ माणसाची ही 'थडगी' अनेक ठिकाणी आढळली आहेत. दक्षिण फ्रान्समध्ये एका अठरा वर्षे वयाच्या मुलाचे दफन केलेले सापडले. या मुलास कुशीवर झोपवलेले होते, त्याचे पाय वाकवण्यात आलेले होते, त्याचे डोके त्याच्या उजव्या हाताच्या बाहूवर ठेवलेले होते. त्याच्या शेजारी दगडाची अनेक हत्यारे व जनावरांची हाडे ठेवण्यात आलेली होती. निंदरथळ माणूस मृताचे दफन अशा प्रकारे विचारपूर्वक योजना आखून करीत असे याचे पुरावे अनेक जागी सापडले आहेत.

निंदरथळ माणूस जगाच्या अनेक भागांत स्थिर झाल्यासारखा होता. सुमारे पाऊण लाख वर्षे पृथ्वीच्या पाठीवर त्याने वास्तव्य केले. तो कलावंत होण्याच्या उंबरठ्यावर उभा होता. मानवाच्या लाखो वर्षांच्या वाटचालीत वस्तूंच्या सजावटीची अंधुक चिन्हे निंदरथळ माणसात प्रथम व्यक्त झाली. हाडे घासून व ओरखडून सुशोभित करण्यात निंदरथळ माणसाने सुरुवात केली. मानवी कलेचाच अशा रीतीने जन्म झाला. कला, संस्कृती, धर्म यांची पहाटेपूर्वीच्या काळोखात ही पहिली हालचाल सुरू झाली. पूर्वमानवाची अवस्था ओलांडून पृथ्वीवर आता मानव उभा राहिला. आधुनिक मानव आणि निंदरथळ माणूस यांच्यामध्ये शरीररचनेच्या दृष्टीने थोडाबहुत फरक असला तरी त्यांच्यात साम्य पुष्कळच आहे. समजा एखादा निंदरथळ माणूस डोक्यावर पगडी, अंगात लांब कोट व धोतर घालून आज एखाद्या ग्रंथालयात येऊन बसला अशी कल्पना केली तर हा कोणी वेगळा माणूस आहे असे कोणासही वाटणार नाही. थोडक्यात निंदरथळ माणूस आणि आधुनिक माणूस हे एकमेकात इतके मिसळले गेले आहेत. ३५,००० वर्षांपूर्वी निंदरथळ माणूस पृथ्वीवर राहून गेला. पण त्यानंतर मात्र तो कोठे गेला, कसा नाहीसा झाला याचा काहीही पत्ता लागत नाही. त्याची जागा त्याच्याहून अधिक सुधारलेल्या अशा माणसाने घेतली हा सुगावा लागतो. हा सुधारलेला माणूस कोण हे आपण पुढच्या अंकात पाहू.






आकाशदर्शन

मे

: बाबुराव प. सावे :

मे महिन्यांत आकाश मधूनमधून तरी ढगाळ असणार, संपूर्ण आकाश जरी ढगांनी भरलेले नसले तरी इकडे तिकडे ढगांचे पुंजके तरंगत असण्याचा संभव आहे. नक्षत्रांच्या एकमेकातील अंतरावरून आपण त्यांना ओळखतो. तेव्हा ढगांचे पुंजके वाऱ्याने सरकत गेले तरच ती नक्षत्रे बरोबर ओळखणे सोपे जाते. उदा० ढगांचे पुंजके बरेच आहेत आणि विशाखा नक्षत्रापैकी एकच तारा मोकळ्या जागेत आहे. तर विशाखा नक्षत्र ओळखणे कठीण जाईल. तसेच, इतर ताऱ्यांचे. परंतु, स्वातीसारखे नक्षत्र तिच्या पिवळसर तेजस्वी प्रभेवरून ओळखणे कठीण नाही.

स्वाती, विशाखा, ज्येष्ठा ही नक्षत्रे या मे महिन्यात आकाशाच्या देवता असे म्हणावयास हरकत नाही. ती साधारणपणे



१. **हस्त** – **Corvus.**
२. **चित्रा** – **Spica.**
३. **स्वाती** – **Arcturus.**
४. **विशाखा** – **Libra.**
५. **अनुराधा** – **Delta Scorpio.**
६. **ज्येष्ठा** – **Anterese.**
७. **मूळ** – **Lambda Scorpio.**
८. **पूर्वाषाढा** – **Lambda Sagittarius.**
९. **उत्तराषाढा** – **Pi Sagittarius.**
१०. **अभिजित** – **Vega.**
११. **हंस** – **Cygnus.**
१२. **श्रवण** – **Altair.**
१३. **ब्रह्मा** – **Beta Centauri.**
१४. **मित्र** – **Alpha Centauri.**

रात्रीच्या सुरवातीस उगवतील. रात्री ११-१२-१ च्या सुमारास डोक्यावर येतील व पहाटेस सूर्योदयाच्या सुमारास मावळतील. स्वाती व विशाखा यांच्यावरोबर वैशाख शुद्ध पौर्णिमा व वद्य प्रतिपदा या दिवशी, म्हणजे मेच्या ६ व ७ तारखांस चंद्र असेल. वैशाख महिन्यात विशाखा, चैत्रात चित्रा असे आपल्या पंचांगाप्रमाणे बरोबर जमते. असो. आकृतीत दिल्याप्रमाणे मे महिन्यात रात्रीच्या सुरवातीस पूर्वेस नक्षत्रे दिसतील. ती तारीख १० च्या पुढे ठळक दिसतील.

पूर्व क्षितिज अंदाजे रात्री ९ वाजता ता. १५ मे.

ता. १५ मे च्या सुमारास, रात्री ९ वाजता स्वाती नक्षत्र अंदाजे ६०° वर आलेले असेल, विशाखा सुमारे ३५°-४०° वर आलेले असेल. त्यानंतर अनुराधा, ज्येष्ठा वगैरे. त्या दिवशी ज्येष्ठा नक्षत्राचा उदय सुमारे ८ वाजता आहे. त्यावरून कल्पना यावी. ज्येष्ठा हे एक तेजस्वी नक्षत्र आहे. रंग तांबूस. त्याच्या तांबूस रंगामुळे त्याला 'अँटिरीझ' म्हणजे मंगळाचा प्रतिस्पर्धी असे प्राचीन युरोपिअन लोकांनी नाव दिले आहे. स्वाती नक्षत्र थोडया उत्तरेस दिसते व ज्येष्ठा पूर्व-दक्षिण कोपऱ्यात दिसेल. हळूहळू वर येणाऱ्या विंचवाचा जणू डोळाच! काही वेळाने डाव्या बाजूस म्हणजे ईशान्य कोपऱ्यात अभिजित नक्षत्र हळूहळू वर येईल. त्याच्या पाठोपाठ हंस, येथे उजव्या बाजूस म्हणजे दक्षिण क्षितिजावर त्रिशंकू दिसेल, त्याच्या थोडया पूर्वेस ब्रम्ह व मित्र हे तारे दिसतील.

या वेळेस आपल्या डोक्यावर कोणकोणती नक्षत्रे दिसतील बरे? हस्ताचे तारे जवळ जवळ डोक्यावर येत आहेत. मघा, फाल्गुनी पश्चिमेला ढळलेल्या आहेत. व्याध तर नैर्ऋत्य कोपऱ्यात मावळण्याच्या तयारीत आहे. अगस्ती आता बरेच दिवस दिसणार नाही.

आपल्या उत्तरेस सप्तर्षी उत्तर-पश्चिम या कोपऱ्यामध्ये जात असलेले दिसतील, परंतु ते कोठेही असले तरी पुढचे तारे उत्तर-ध्रुव तारा दाखवतीलच. उत्तरेकडची सर्व नक्षत्रे जणू काही उत्तरध्रुवाभोवती प्रदक्षिणा घालीत असतात. हे कसे बरे होत

असेल? समजा आपण ६०°–६५° उत्तर अक्षांश असलेल्या प्रदेशात गेलो. उदा० उत्तर रशिया, फिनलँड, नॉर्वे, स्वीडन वगैरे. तेथे आपणास ध्रुव तारा क्षितिजापासून ६०°–६५° वर दिसू लागेल. पण तेथे तो स्थिर असेल. सप्तर्षी नक्षत्र डोक्यावर दिसू लागेल. अर्थात ते निरनिराळ्या दिवसांत निरनिराळ्या ठिकाणी दिसेल. परंतु जणू ध्रुवाभोवतीच त्याचा फिरण्याचा क्रम आहे हे लक्षात येईल. त्याचप्रमाणे शर्मिष्ठा, देवयानी वगैरे आसपासची नक्षत्रे.

आता आपण मे महिन्यात पहाटेस उठलो व पूर्वेकडे पाहिले तर वर वर्णिलेली नक्षत्रे बऱ्याच प्रमाणात पश्चिमेकडे झुकलेली आहेत आणि काही तर मावळलेली आहेत असे दिसून येईल. ता. २१ व पुढे पहाटेस रात्र काळोखी असेल. त्या दिवसांत पुढे दिलेल्या आकृतीप्रमाणे नक्षत्रे दिसावीत.



१. **वृश्चिकाची शेपटी-मूळ नक्षत्र** – **Lambda Scorpio.**
२. **पूर्वाषाढा** – **Lambda Sagittarius.**
३. **उत्तराषाढा** – **Pi Sagittarius.**
४. **अभिजित** – **Vega.**
५. **श्रवण** – **Altair.**
६. **हंस** – **Cygnus.**
७. **धनिष्ठा** – **Delphis.**
८. **शततारका** – **Lambda Aquarius.**
९. **पूर्वाभाद्रपदा** – **Alpha Pegasus.**
१०. **उत्तराभाद्रपदा** – **Gamma Pegasus.**
११. **रेवती** – **Zeta Pisces.**
१२. **अश्विनी** – **Aries.**
१३. **देवयानी** – **Andromeda.**

पूर्व क्षितिज-अंदाजे ता. २१ व पुढे पहाटेस

नक्षत्रदर्शन : मे १९७४

चंद्र : दुपारी २·२५ ला दि. ६ रोजी चंद्राचे पूर्ण बिंब प्रकाशित होईल म्हणजेच पौर्णिमा होईल. ज्येष्ठ महिन्याची सुरुवात करण्यासाठी चंद्र पहाटे २·०४ ला दि. २२ ला उगवणार आहे. दि. १६ ला चंद्र गुरुग्रहाच्या जवळून उत्तरेकडे सात अंशाचे अंतरावरून दि. १९ ला शुक्राच्या जवळून त्याच अंतरावरून जाणार आहे. बुधाच्या दक्षिणेस दोन अंशावर दि. २३ ला, व दि. २४ ला शनीच्या दक्षिणेस अर्ध्या अंशावर व दि. २५ ला मंगळाच्या दक्षिणेस चार अंशांवर चंद्र दिसेल. चंद्र पृथ्वीपासून अधिक लांब अंतरावर दि. १२ ला व जवळ अंतरावर दि. २४ ला असेल.

बुध : महिन्याच्या पूर्वार्धात बुध सूर्याच्या बराच जवळ जाणार असल्यामुळे दिसणार नाही. उत्तरार्धात हा ग्रह सायंतारा म्हणून सूर्यास्तानंतर एक तासाने मावळताना दिसेल. दि. १७ ला बुध रोहिणी ताऱ्याच्या उत्तरेकडून सात अंशांवरून जाईल. बुध ह्या महिन्यात मेष, वृषभ व मिथुन या राशींमधून भ्रमण करणार आहे.

शुक्र : हा पहाटेचा तारा म्हणून सूर्योदयापूर्वी दोन तास उगवून संपूर्ण महिनाभर पूर्वेस दर्शन देईल. शुक्र मीनेतून मेषेत जाईल.

मंगळ : संध्याकाळी पश्चिमेला झुकलेला हा ग्रह महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात स्थानिक मध्यरात्रीच्या आधी दीड तास व दुसऱ्या पंधरवड्यात दोन तास अगोदर मावळणार आहे. दि. ३० ला पुनर्वसू ताऱ्याच्या दक्षिणेस पाच अंशांवर तो दिसेल. मंगळ मिथुनेतून कर्कराशीत जाईल.

गुरु : स्थानिक मध्यरात्रीच्या एक ते अर्धा तास अगोदर हा ग्रह उगवेल. त्यामुळे पहाटेच्या सुमारास याचे दर्शन घेता येईल. हा ग्रह ह्या महिन्यात कुंभराशीत आहे.

शनी : सायंतारा म्हणून पश्चिम क्षितिजावर दिसेल. महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात सूर्यास्तानंतर तीन तासांनी व दुसऱ्या पंधरवड्यात दोन तासांनी मावळताना दिसेल. हा ग्रह मिथुन राशीतून भ्रमण करीत आहे.

वरील आकृतीत अश्विनी नक्षत्र पहाटे सुमारे ४ वाजता उगवून क्षितिजावर आले आहे अशी कल्पना आहे. तेव्हा त्याच्या अगोदर वृश्चिकेतील मूळ नक्षत्र, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, अभिजित वगैरे आकृतीत दाखवलेली नक्षत्रे बरीच वर आलेली आहेत असे दिसेल. काही आकाशमध्यावरून पश्चिमेला ढळलेली असतील. उदा० अभिजित, ज्येष्ठा, श्रवण, धनिष्ठा वगैरे. शततारका व रेवती ही नक्षत्रे विशेष ठळक नाहीत.

येथपर्यंत आपण बऱ्याच प्रमुख नक्षत्रांची थोडीशी ओळख करून घेतली. सूर्य–चंद्रांच्या मार्गातील नक्षत्रे आणि त्यांच्या उत्तरेकडे व दक्षिणेकडे असणारी काही प्रमुख नक्षत्रे पाहिली. 'थोडीशी ओळख' असे का म्हटले हे आपल्या लक्षात आले असेल. कारण, अगोदरच ही आपली माहिती म्हणजे प्रस्तावनावजा समजायची. परंतु खगोल-

शास्त्राचा खोल अभ्यास करणाऱ्यांनाही असे वाटते की आतापर्यंत प्राप्त झालेले सर्व ज्ञान अगदीच अपुरे आहे. तेव्हा आपली कथा काय? असो. परंतु जी काही माहिती शास्त्रज्ञांना आतापर्यंत उपलब्ध झाली आहे, त्या माहितीवरूनही अनेक विलक्षण व गमतीच्या गोष्टी आपल्या लक्षात येतात आणि परमेश्वराची ही सर्व अतर्क्य लीला पाहून आपण विचार करू लागतो. एका थोर शास्त्रज्ञाने म्हटले आहे की खगोलशास्त्र जणू एक स्वर्गातून वाहत येणारी व आपणास फक्त जरासाच भाग दिसणारी नदी आहे. परंतु तिच्या दिव्य दर्शनाने आणि जादूमय पाण्याने आपली ज्ञान व संस्कृतिरूपी शेते नेहमी समृद्ध राहतात.

[जून-सप्टेंबर या पावसाळ्याच्या चार महिन्यांत आकाश ढगांनी आच्छादलेले राहते. त्यामुळे आकाशातील नक्षत्रांचे दर्शन होणे जवळजवळ अशक्य असते. म्हणून 'आकाशदर्शन' हे सदर हे चार महिने देण्यात येणार नाही. ऑक्टोबरमध्ये ते पुन्हा येईल.]





थंड हवेच्या ठिकाणी जायला आपल्याकडे पैसे नाहीत ना!.. म्हणून.

तुमचा शब्दसंग्रह वाढवा

संस्कृत भाषेतील एक श्लोक खाली दिला आहे. श्लोकाबरोबर त्याचा अर्थ व त्यातील अवघड शब्दांचा अर्थही दिला आहे. हा श्लोक घरातील जाणत्या माणसाकडून समजावून घ्या व पाठ करा. त्यामुळे तुमच्या शब्दसंपत्तीत आपोआप भर पडेल.



पात्राऽपात्रविवेकस्तु धेनुपन्नगयोरिव ॥
तृणात् संजायते क्षीरं, क्षीरात् संजायते विषम् ॥ ३ ॥



अर्थ : योग्य व्यक्ती व अयोग्य व्यक्ती यांच्याबद्दलचा विचार मात्र गाय व साप यांच्याप्रमाणे असतो.

गवतापासून (गवतासारखा सामान्य पदार्थ गायीसारख्या योग्य व्यक्तीला दिल्यास त्यापासून अमृतासारखे मधुर व पौष्टिक असे) दूध निर्माण होते (पण, तोच दुधासारखा उत्तम पदार्थ सापासारख्या अयोग्य व्यक्तीला दिल्यास त्या) दुधापासून (प्राणघातक) विष निर्माण होते.

तात्पर्य : योग्य व्यक्ती साध्या किंवा वाईट गोष्टीतूनही चांगले निर्माण करते; तर अयोग्य व्यक्ती चांगल्या गोष्टीतूनही वाईटाचीच निर्मिती करते.

शब्दसंग्रह

पात्र : योग्य व्यक्ती किंवा वस्तू. अपात्र—अयोग्य व्यक्ती किंवा वस्तू
विवेक : विचार. तु—मात्र, परंतु. [विवेकः+तु] धेनु—गाय
पन्नग : साप. इव—प्रमाणे. [धेनु—पन्नगयोः+इव]
तृण : गवत. संजायते—उत्पन्न होते. क्षीरम—दूध.



एका हत्तीची गोष्ट–३

तुफान

: लीलाधर हेगडे :

माणसांनी सर्व हत्तींना बंदिस्त केले. मग त्यांना पाळीव हत्तींच्या साहाय्याने गटवार त्या प्रचंड लाकडी पिंजऱ्यांतून बाहेर काढण्यात आले. प्रत्येक हत्तीच्या गळ्यातले अन् पायातले दोर पाळीव हत्तींना बांधण्यांत आले. पाळीव हत्ती त्या रानटी हत्तींना खेचून नेऊ लागले. जवळ जवळ मैलभर चालल्यावर ते सर्व एका मोकळ्या मैदानात आले. त्या मैदानाला सर्वजण पीलखाना म्हणत. पीलखान्यावर सर्व हत्तींना भोवतालच्या झाडांना बांधून ठेवण्यात आले. त्या उघड्या पण छोट्या मैदानात युक्तिबाज माणसांनी ते चौपन्न लहान मोठे हत्ती दोरखंडांनी बांधून ठेवले.

आपली ती अवस्था पाहून हत्तींना राग आला. तरणेबांड हत्ती आकांडतांडव करू लागले. मधूनच ते प्रचंड चीत्कार करू लागले. कोणी लोळण घेऊन आपली नाराजी व्यक्त केली. ते कुणाला जवळ फिरकू देईनात. वयस्क हत्ती मारक्या नजरेने त्या माणसांकडे पाहात होते. कोणी निसटता आल्यास ती संधी साधायला तयार होते. आपल्याजवळ कुणी आल्यास आपल्या सोंडेचा पट्टा फिरवीत होते. त्या दिवशी एकूण वातावरण तापलेले होते. त्यांच्यापुढे ऊस टाकण्यात आला. माहुतांनी त्यांना पाणी पाजले. मग त्यांची वरात मूळ ठिकाणावर नेण्यात आली.

दुसऱ्या दिवशी त्यांना दोरांसकट नदीत डुंबायला सोडण्यात आले. पोहायला मिळाल्याने सर्व हत्ती खूष झाले. एकेका हत्तीभोवती तीन-तीन पाळीव हत्तींचा पहारा होता. खूप माणसेही त्यांच्या भोवती पहारा करीत होती. कोणी निसटणार नाही याबाबत काळजी घेत होती. खूप दिवसांनी गार पाण्यात यथेच्छ डुंबायला मिळाल्याने त्या जंगली हत्तींची तब्येत एकदम खूष झाली.

अशा प्रकारे त्यांना रोज आंघोळीला नेण्यात येऊ लागले अन् पीलखान्यावरही.

माहुत मात्र त्या हत्तींबरोबर रात्रंदिवस राहू लागले. तुतारीच्या पिलावर गोपाळ नावाच्या पंधरा वर्षांच्या एका मुलाची नेमणूक झाली. तो त्या पिलाची काळजी घेत असे. त्याला ऊस देत असे. कधी कधी तो गुळाचा खडा भरवत असे. त्या पिलाला गूळ फारच आवडला. कधी कधी तो त्याला पिकलेली केळीही देई. त्यामुळे त्याची अन् गोपाळची दोस्ती झाली. गोपाळ त्याला आस्ते आस्ते आपली भाषा शिकवू लागला. कधी कधी त्या पिलाने वाह्यातपणा केला तर गोपाळ उसाची कांडी त्याच्यावर उगारी, पण मारत नसे. कधी कधी तो जोरदार रागे भरे, तेव्हा मात्र ते पिलू सरळ येई. मग गोपाळ ममतेने त्याच्या अंगावरून हात फिरवी. त्या पिलाला गोपाळ आवडू लागला. पण बाकीच्या सर्व माणसांबद्दल मात्र त्याच्या मनात एक प्रकारची अढी निर्माण झाली होती.

एक महिना असे चालले. त्या प्रचंड पिंजऱ्यांतून हत्तींना पीलखान्यात नेण्यात येई. तेथे माणसे त्यांना नाना गोष्टी शिकवण्याचा यत्न करीत. मग त्यांना आंघोळीला नदीवर नेण्यात येई. हत्ती आस्ते आस्ते माणसाळू लागले. पुढे पुढे नेता-आणताना

माणसांनी त्यांना दोर बांधायचे सोडून दिले. माणसांच्या हुकमाप्रमाणे ते हत्ती वागू लागले.

त्यानंतर एके दिवशी पीलखान्यावर माणसांची गर्दी उसळली शहरातून खूप लोक तेथे आले. त्या माणसांना सर्कशीसाठी, लाकडाचे ओंडके वाहण्यासाठी, देवळांसाठी, प्राणिसंग्रहालयासाठी हत्ती विकत घ्यायचे होते. त्यांनी बरोबर ज्योतिषी आणले होते. हत्तींची लक्षणे ते बघत अन् आपल्या गिऱ्हाइकाला आपल्या परीने सल्ला देत.

"जंगली जनावरांची जंगी सर्कस" नावाच्या सर्कसचे मालक तेथे आले होते. त्यांनी त्या हत्तींच्या बाजारातून तुतारीच्या पिलासकट त्याच्याच वयाची आणखी चार पिले खरेदी केली. एक हत्ती अन् तीन हत्तिणी. त्याने त्या तीन हत्तिणींची नावे ठेवली, बिजली, लक्ष्मी, तारा आणि तुतारीच्या पिलाला नाव दिले 'तुफान'.

सर्कसच्या मालकाने गोपाळला विचारले, "तू माझ्याबरोबर येशील? तुझ्यावर ह्या तुफानची जबाबदारी सोपवीन. तुला चांगला पगार देईन. सर्कशीबरोबर हिंडून तुला सर्व देश बघता येईल. तू तयार असशील तर मी तुला नोकरीत ठेवायला तयार आहे."

गोपाळला आनंद झाला. त्याने होकार दिला. तो म्हणाला, "मी यायला तयार आहे, पण माझ्या वडिलांची परवानगी काढायला पाहिजे."

गोपाळचे वडील रानटी हत्तींना पकडण्यात आणि माणसाळवण्यात तरबेज होते. त्यांच्या घराण्यात माहुताचा धंदा पिढ्यान् पिढ्या चालत आला होता. हत्तीकडे नुसती नजर टाकली की ते हत्तीचा स्वभाव ओळखत. बापाप्रमाणे गोपाळही हुशार होता. मुलाला चांगली संधी मिळते आहे असे पाहून गोपाळच्या वडिलांनी त्याला सर्कसमध्ये नोकरी करण्याची परवानगी दिली. गोपाळला खूप आनंद झाला. शिवाय त्याला त्या पिलाचा लळाही लागला होता.

सर्कसवाल्याने हत्तींची चार पिले ताब्यात घेतली. तुतारी काही दिवसांपूर्वी ह्या जगाचा निरोप घेऊन गेली होती. परंतु बिजली, लक्ष्मी अन् तारा ह्या तिघींच्या आया जिवंत होत्या. आता मायलेकींची तातूट होणार होती. त्या तीन हत्तिणींच्या आयांना माणसांनी बांधून ठेवले होते. आपली ताटातूट होणार हे जणू त्यांनी ओळखले. त्या हत्तिणी आपल्या पिलांच्या अंगा-तोंडावरून मायेने सोंड फिरवू लागल्या. सर्कसच्या मालकांनी दोन मोठ्या मालवाहू मोटारगाड्या आणल्या होत्या. माहूत त्या पिलांना गाड्यांच्या दिशेने नेऊ लागले. ती छोटी पिले आपल्या आयांकडे पुनः पुन्हा वळून पाहात होती. हत्तिणी कासावीस झाल्या होत्या. बांधलेला दोरखंड तोडण्याचा यत्न करीत एकटक नजरेने आपल्या पिलांकडे पाहात होत्या. त्यांच्या डोळ्यांतून दुःख ओसंडत होते. त्या केविलवाणा आवाज काढत होत्या. माहुतांनी त्या चार पिलांना मोटारगाड्यांत चढवले. मायलेकरांची शेवटची नजरानजर झाली. गाडीवाल्याने गाडीचे दार बंद केले. मोटारगाड्या हत्तींच्या त्या चार पिलांना घेऊन सर्कसच्या दिशेने रवाना झाल्या.

माणसांच्या तावडीतून सुटलेली विजया जंगलात शिरली. ती खूप भ्याली होती. आपल्या सर्व कळपाला फसवून माणसांनी स्वतःच्या ताब्यात घेतले असेल असा तिने अंदाज केला. आपल्या कळपापैकी आता कोणीही भेटणार नाही याची तिला खात्री वाटत होती. पण माणसांच्या तावडीतून आपण सुटलो ह्याचे समाधान तिला वाटत होते. आपल्या विचारात गर्क असलेली ती हत्तीण झपझप पावले टाकीत चालली होती. तिला अगदी एकाकी वाटत होते.

शेवटी एकदाचा तिला हत्तींचा रुळलेला मार्ग सापडला. तिने ठरवले की ह्या मार्गाने गेल्यास कुठे तरी हत्तींच्या कळपाशी आपली गाठ पडेलच. वाटेत तिला एक तळे लागले. तिला खूप आनंद झाला. ती एकटीच त्या तळ्यात शिरली. पाणी स्वच्छ अन् थंडगार होते. तहानेने ती व्याकूळ झाली होती. ती मनसोक्त पाणी प्याली. मग आपले शरीर तिने पाण्यात लोटून दिले. ती त्या तळ्यात खूप वेळ डुंबली. तिला खूप बरे वाटले. मग ती तळ्याबाहेर आली. मातीमध्ये तिने लोळण घेतली. आपल्या अंगावर तिने माती उडवली. सर्व अंगाला माती लागली याची खात्री झाल्यावर ती उठली.

तिच्या समोर हरणांचा एक कळप टुणटुण उड्या मारीत निघून गेला. त्या कळपाचा दादा काळवीट रुबाबात इकडे तिकडे बघत त्यांच्याबरोबर चालला होता. विजयाने त्यांच्याकडे पाहिले. तिला जास्तच एकाकी वाटले. तिला आपल्या कळपातल्या हत्तींची आठवण झाली. तिला तुतारी-ऐरावत आठवले. तुतारीचे पिलू तिच्या डोळ्यासमोर आले. तिला आपल्या मेघश्यामची आठवण झाली. तिच्या डोळ्यांसमोर त्याची मूर्ती तरळली. मेघासारखा तो सावळा होता. त्याचे खांदे बलिष्ठ होते. डोळे मिश्किल होते. सुळे पांढरेशुभ्र अन् जरा जास्तच वळलेले होते. त्या अक्कडबाज सुळ्यांमुळे तर मेघश्याम तिला खूप आवडे. गेले अनेक दिवस ती दोघे एकत्र चरत होती. त्यासाठी भरारीची परवानगी मिळवली होती. हिरवेगार गवत दिसले की मेघश्याम ते आपल्या सोंडेने उपटी, गवताबरोबर आलेली माती आपल्या पायावर आपटून साफ करी, माती चिकटलेली मुळे तोडून फेकून देई अन् कुणी बघत नाही असे पाहून त्या गोड गवताचा घास तिला भरवी. विजयाही लाजेने चूर होऊन तो घास तोंडात घेई.

तिला तो पहिला प्रसंग आठवला. गोड गोड कोवळ्या पानांची एक फांदी काही केल्या आपल्याला तोडता येत नव्हती. आपण पुढचे दोन पाय वरती घेऊनही आपली सोंड त्या फांदीपर्यंत पोहोचू शकली नाही. हे मेघश्यामच्या लक्षात आल्यानंतर त्याने किती सहजपणे ती आपल्याला काढून दिली! आपण त्यातील अर्धा वाटा त्याला देऊ केला तरी तो घेईना. शेवटी अगदी त्याच्या पुढ्यात नेऊन ती फांदी आपण ठेवली. त्या वेळी त्याने त्या कवळ्या लुसलुशीत पानांचा स्वीकार केला. त्या वेळची त्याची ती मिश्किल नजर—विजयाच्या समोरून तो क्षण हालेना.

तिला दुःखाचा उमाळा आला अरेरे! आपले सर्वस्व त्या माणसांनी हिरावून नेले!!

रात्रभर ती चालत होती. चालता चालता जे काही सोंडेत मिळेल ते ती खात होती. दुरून वाघाची डरकाळी ऐकू आली की लढण्याच्या पवित्र्यात ती उभी राही. मध्यरात्र उलटून गेली तेव्हा सारे अरण्य थोडे शांत झाले. मग एका झाडाला टेकून तिने काही वेळ झोप घेतली. गाढ झोप अशी तिला लागलीच नाही. थोड्याच वेळात ती पुन्हा चालू लागली

सूर्य उगवला. त्या दाट अरण्यात सूर्याचे किरण मधून मधून डोकावू लागले. चालता चालता ती एका सपाट गवताळ भागात आली अन् तिला दिसले की खूप हत्ती तेथे चरत आहेत. तिला खूप आनंद झाला. पण पुढे जायची तिने घाई केली नाही.

ही दुसरीच हत्तीण आपल्या कळपाजवळ आल्याचे सर्व हत्तींना थोड्याच वेळात कळले. ते सर्वजण तिच्याकडे पाहू लागले.

त्या कळपाच्या प्रमुख हत्तिणीने तिला दुरूनच विचारले, "तू कोण ? कुठून आलीस ?"

विजयाने मान खाली घातली अन् निमुटपणे ती त्या हत्तीणीला सामोरी गेली. सर्वजण डोळे टवकारून तिच्याकडे पाहात होते. सर्वांना ती ओळखीची वाटत होती.

आपल्या सर्वांसारखेच तपकिरी डोळे, सोंडेची अन् कानाची ठेवण, आपल्याच कपाळातल्या हत्तीसारखी. सर्वांच्या मनांत हाच विचार आला.

विजयाच्या समोर विद्युलता उभी होती. दोघींनी एकमेकींना ओळखले.

"तू अन् एकटीच ?" विद्युल्लतेने विचारले.

"होय, आमचा सर्व कळप त्या माणसांनी पकडला. मीच तेवढी पळाले. माझं नशीब, तुझी माझी गाठ पडली."

"काही काळजी करू नकोस. खुशाल माझ्या कळपात राहा. किती उत्तम वाढली आहेस ग तू ! तू आमच्या कळपाचं भूषणच ठरशील."

"खरंच तुम्ही सर्व भेटल्यामुळे खूप आनंद झालाय मला." विजया म्हणाली.



मग विद्युल्लतेने तिला जवळ घेऊन आपल्या सोंडेने कुरवाळले. विजयाने आपले अंग विद्युल्लतेच्या अंगाला घासले. तिला खूप खूप समाधान वाटले.

विद्युल्लता म्हणाली, "कधी संधी आली तर या माणसांना चांगली अद्दल घडवू या."

"माझ्या मनातलं बोललीस." विजया म्हणाली अन् मग ते सर्व तळ्यात डुंबायला निघून गेले.

इकडे सर्कसमध्ये दाखल झालेल्या चार पिलांना मोठ्या तबेल्यात ठेवण्यात आले. त्यांच्या पायांत लोखंडी साखळ्या घालण्यात आल्या. त्या साखळ्या त्या चौघांना टोचू लागल्या. कितीही यत्न केले तरी त्या साखळ्या त्यांना काढता आल्या नाहीत.

त्यांना ज्या तबेल्यात ठेवण्यात आले होते त्या तबेल्यासमोरच एका तबेल्यात पुढील बाजूस चार मोठाल्या हत्तिणी उभ्या होत्या. हिरवे गार गवत सोंडेत पकडून त्या आपल्या तोंडात घालत होत्या अन् मजेत खात होत्या. तुफानने डोळे मोठे करून पाहिले. त्यांच्याही पायांत साखळ्या होत्या. परंतु त्या साखळ्यांचे ओझे त्यांना जाणवत नव्हते. आपल्या अंगाखांद्यावर मधूनमधून त्या खुशीने गवत उधळीत होत्या. त्या चारही हत्तीणींना माणसांनी रंगवले होते. त्यांच्या कपाळावर नक्षी काढली होती. सोंड लाल-पांढऱ्या रंगांत रंगवली होती. त्या चारही पिलांना त्यांचा तो अवतार पाहून हसू आले. कुठे रानातल्या वाघाशी झुंज घेणाऱ्या त्या काळ्या सावळ्या हत्तिणी अन् कुठे माणसांच्या ताब्यात राहून रंगरंगोटी करून घेणाऱ्या ह्या हत्तिणी? परंतु आपल्याच पायातल्या साखळीचा आवाज जेव्हा त्या पिलांना ऐकू आला तेव्हा त्यांना आलेले हसू कोठल्या कोठे विरून गेले.

गोपाळने त्यांच्याही समोर हिरवा गार चारा पसरला. हे चौघे तो चारा खाऊ लागले. सर्वांना भूक लागली होती.

सर्कसमधले सर्वजण त्या हत्तींना कौतुकाने येऊन पाहात होते. त्यांना केळी, रताळी, गाजरे भरवत होते.

"ही माणसं चांगली दिसतात." लक्ष्मी बिजलीला म्हणाली.

"मलाही तसंच वाटतं." बिजलीने उत्तर दिले.

तुफान काहीच बोलला नाही. त्याने फक्त आपल्या पायातली साखळी दणकन् आपटली.

इतक्यात सर्कसचे मालक एका माणसाला त्याच्या जवळ घेऊन आले. मालक त्याला म्हणाले, "राजू, हे पाहा तुमचे नवे शिष्य. चांगले तयार करा. तुमचं आणि आपल्या सर्कसचं नाव सर्व देशात दुमदुमलं पाहिजे."

"जरूर." राजू म्हणाला, "ह्या वयाचे हत्ती फार लवकर शिकतात. आजपासूनच सुरुवात करतो."

"ठीक आहे. मी जातो. तुमच्या कामाला लागा." मालकाने राजूचा निरोप घेतला.

मग राजू त्या चौघांशी बोलू लागला. त्याने येताना ऊस आणले होते.

"काय तुफान, ठीक आहे ना? मी फार चांगला मास्तर आहे. तुम्हांला बिलकुल त्रास देणार नाही. हा घे खाऊ. आणि बिजली तू ग? बिजलीसारखी चलाख दिसतेस तू! हा घे ऊस. गोड आहे. तुला खूप आवडेल. लक्ष्मी, तुलाही घे हं ऊस. तू ह्या सर्वांत मोठी दिसतेस. तू ह्या सर्वांची ताई, होय ना? तारा, तू ह्या सर्वांत टारगट दिसतेस. कामचुकार नाहीस ना? छे. हत्ती कधी कामचुकार नसतात. हा घे ऊस, राजू त्या चौघांशी सारखे बोलत होता. मधून मधून त्यांना ऊस देत होता आणि ते चौघे त्याच्याकडून ऊस घेऊन फस्त करीत होते.

राजू सकाळपासून रात्रीपर्यंत सतत त्या हत्तींपुढे रोज येई अन् त्यांच्याशी सारखा बोलत बसे. त्याला त्या चौघांशी दोस्ती करायची होती. आपला आवाज त्या हत्तींच्या ध्यानांत चांगल्या प्रकारे राहील याची खटपट तो करीत होता.

थोडी दोस्ती झाल्याबरोबर तो त्या हत्तींच्या जवळ जाऊन त्यांना आंजारू-गोंजारू लागला. मग तो त्यांना कंदमुळे, फळे भरवू लागला. आस्ते आस्ते त्या चौघांना राजू आवडू लागला.

मग एक दिवस राजू गोपाळला आणि इतर माहुतांना म्हणाला, "आज त्यांना आपण सर्कसच्या रिंगणात घेऊन जाऊ."

माहुतांनी हत्तींचे साखळदंड सोडले अन् त्यांना तबेल्याबाहेर काढले. माहुतांच्या हातांत अंकुश होते.

मोकळे सुटल्याने त्या चौघांना खूप बरे वाटले. ते इकडे तिकडे पाहू लागले. त्यांना पलिकडच्या तबेल्यात खूप घोडे बांधलेले दिसले. वाटेतल्या काही पिंजऱ्यांत माकडे दिसली. त्यांच्या पलिकडे उंटांना बांधण्यात आले होते अन् जवळच झेब्रेही होते. त्या सर्वांना बघून त्यांना आश्चर्य वाटले.

हे चौघे सर्कसच्या तंबूकडे निघाले, इतक्यात त्या तंबूकडून काही माणसे मोठे पिंजरे तबेल्यांच्या दिशेने परत नेत असल्याचे त्यांना दिसले.





हत्तींच्या पिलांनी त्या पिंजऱ्यांत डोकावून पाहिले. बाप रे ! वाघ ! सर्वांच्या छातीत एकदम धडधडले. अन् त्या दुसऱ्या पिंजऱ्यात कोण आहे ? सिंह ! सर्वांनी डोळे मिटून घेतले अन् ते झपझप् चालू लागले. माणसांनी वाघ, सिंहानासुद्‌धा पिंजऱ्यांत अडकवलंय तर. आणि ते त्या पिंजऱ्याच्या बाहेर आले तर ? कुठे आहे आपला गोपाळ, अन् कुठे आहे आपला राजू ? राजू सर्वांच्या पुढे चालला होता. गोपाळ तुफानबरोबर होता. ती पिले आपापल्या माहुतांना बिलगून चालू लागली.

शेवटी ते सर्वजण सर्कसच्या तंबूत शिरले. त्या भव्य तंबूत एक वर्तुळाकार मोकळी जागा होती. तेथे त्या चौघांना राजूने सोडले. त्या चौघांना खूप गंमत वाटली. रिंगणात शिरल्याबरोबर ते एकमेकांशी खेळू लागले, एकमेकांवर धूळ उडवू लागले, कोलांट्या मारू लागले. राजू अन् माहूत त्यांचे ते खेळ कौतुकाने पाहात उभे होते. अर्धा पाऊण तास खेळून झाल्यावर त्यांना तबेल्यात नेण्यात आले.

राजूने असे दोन दिवस जाऊ दिले. मग त्याने ठरवले की पहिल्या प्रथम ह्या पिलांना रांकेने एकामागून एक चालायला शिकवायचे. माहुतांना त्याने सूचना दिल्या. तो त्यांना म्हणाला, "तुम्ही त्या पिलांबरोबर सतत फिरायचे. मी त्यांना हुकूम देईन, 'ओळीत चाला, एकामागोमाग एक'–त्यांना ह्या वाक्याचा नेमका अर्थ काय आहे ते समजावे ह्यासाठी तुम्ही मला मदत केली पाहिजे."

मग राजूने त्या पिलांना रिंगणात घेतले. तो रिंगणाच्या मध्यभागी उभा राहिला. चाबूक फडकावून त्याने हुकूम दिला, "ओळीत चाला, एकामागोमाग एक." एखादा हत्ती वळू लागला की राजू पुन्हा हुकूम देई. मग माहूत आपला अंकुश हत्तीच्या कानाला लावी अन् त्याला सरळ मार्गावर आणी. हत्तीने ऐकले की राजू त्यांना गुळाचे खडे भरवी. मग ती पोरे खूष होत.

अशा तालमी रोज सुरू झाल्या. हत्तींना रांकेत चालण्याची समज आल्यावर राजूने आणखी एका हुकमाची तालीम देण्यास सुरुवात केली. हत्ती वर्तुळाकार रांकेत फिरत असता मध्येच राजू चाबूक फडकवी अन् "थांबा !" असा हुकूम देई.

"थांबा !" ह्या शब्दाचा अर्थ पहिल्याप्रथम त्या हत्तींना समजला नाही. परंतु राजूने माहुतांना सांगून ठेवले होते की मी थांबा हा हुकूम दिला की तुम्ही जागच्या जागी थांबायचे अन् पुढे जाणाऱ्या हत्तींच्या कानाला अंकुश लावून त्यांना थांबवायचे.

आपल्याकडून राजूची काय अपेक्षा आहे हे पहिल्या प्रथम लक्ष्मीने ओळखले. राजूने "थांबा!" म्हटल्याबरोबर लक्ष्मी थांबू लागली. त्यामुळे तिला राजूकडून खाऊ मिळू लागला. मग बिजली आणि ताराला कळले की राजूचा थांबा हा हुकूम झाला की आपण चालायचे नाही. जागच्या जागी थांबायचे.

बिजली आणि तारा हुकमासरशी थांबू लागल्या, पण तुफान राजूचे ऐकेना. राजू त्याला रागावला. म्हणाला, "तुफान, इतकं समजत नाही तुला ? दगड आहेस की फत्तर ?"

माणसाने "चल" सांगितल्यावर चालायचं अन् "थांब" सांगितले की थांबायचे ही गोष्ट तुफानला रुचेना.

बिजली, लक्ष्मी, तारा यांना 'थांबा' असा हुकूम होताच त्या थांबू लागल्या. त्यामुळे त्यांना ऊस अन् केळी मिळू लागली. तुफान मात्र उपाशी. तुफानला गोपाळप्रमाणे राजूही आवडे. पण त्याचे सारखे हुकूम पाळणे त्याला आवडत नसे. पण करतो काय ?



बिजली, तारा, लक्ष्मी त्याच्यासमोर ऊस अन् केळी खाऊन फस्त करू लागल्या की त्याच्याही तोंडाला पाणी सुटे. उशिरा का होईना—तुफान राजूचे ऐकू लागला.

मग राजूने आणखी एक नवा धडा शिकवला. तो प्रत्येकाचे नाव घेई व चाबूक फटकवे अन् "चल" किंवा "थांब" असा हुकूम देई. त्यामुळे प्रत्येक पिलाच्या मनात स्वतःचे नाव ठसू लागले.

मग राजू प्रत्येकाला नावाने स्वतःकडे बोलावू लागला.

"लक्ष्मी, माझ्याकडे ये." असे म्हटल्यावर लक्ष्मी येऊ लागली. तिला खाऊ मिळू लागला. आता माहुताच्या मदतीशिवाय तो त्यांना हुकमाची कसरत देऊ लागला.

"चला", "थांबा", "माझ्याकडे", "जागेवर" ह्या हुकमांची तालीम झाल्यावर राजूने आणखी एक हुकूम काढला— "खाली झोपा," "उठा –" अशा सर्व हुकुमांचा सराव व्हायला तीन महिने गेले.

मग एक दिवस राजूने त्यांना रस्त्याच्या दिशेला नेऊन आणले. सर्कसची जाहिरात उंट, हत्ती आणि विदूषक उत्तम प्रकारे करतात. त्यांना गावातून एकदा फिरवले की झाली सर्कसची जाहिरात. हत्तींच्या मागे तर पोरेसोरे वेडीच होतात. मोठी माणसे त्यांना फळे भरवतात आणि काही जण त्यांच्या सोंडेत पैसेही देतात. हत्ती फळे गट्टम करतात आणि पैसे वर माहुताकडे देतात.

त्यामुळे रस्त्यातील रहदारीच्या आवाजाचा हत्तींना सराव होणे आवश्यक असते. एखादा मोठा ट्रक जोरदार आवाज करीत गेला तर रस्त्यावर पहिल्यांदाच आलेला हत्ती एकदम बिथरतो आणि मग मात्र तो सगळ्यांना पळता भुई थोडी करतो.

म्हणून हत्तींना रस्त्यावर रुळवणे आवश्यक असते. राजूने दुसऱ्या दिवशी त्या हत्तींना रस्त्याजवळ बराच वेळ उभे केले. मग तो त्यांना कमी रहदारीच्या रस्त्यावर नेऊ लागला. आस्ते आस्ते मोटारीचे भोंगे, त्यांचे आवाज यांचा हत्तींना सराव झाला.


एके दिवशी काय झाले—राजू त्या चार पिलांना घेऊन शहरात निघाला होता. शहरात नेणारा तो रस्ता एका रेल्वेच्या पुलाखालून जात होता. ते चार हत्ती त्या रेल्वे पुलाखालून जात असताना एक इंजिनवाली गाडी धडाधडा करीत त्या पुलावरून गेली. तो प्रचंड आवाज ऐकून ते हत्ती भयंकर भ्याले. सैरावैरा इकडे तिकडे पाहू लागले. बिजली गर्रकन् वळली अन् पळण्याच्या तयारीत होती. पण राजू हुशार शिक्षक होता. त्याने जोरात हाक मारली, "बिजली थांब", "लक्ष्मी–चला सर्वजण एका रांकेत." लक्ष्मी सर्वांच्या पुढे उभी होती. राजूचा तो आवाज ऐकून तिला धीर आला. त्या सर्वांनी राजूकडे पाहिले. राजू अजिबात भ्याला नव्हता. तो नेहमीप्रमाणे खंबीर उभा होता. त्यामुळे सर्वांना धीर आला. गाडी निघून गेल्यावर ते चारही हत्ती राजूभोवती गोळा झाले. राजूने सर्वांना थोपटले. त्यामुळे सर्वांना धीर आला. मग ते पुन्हा राजूच्या मागे चालू लागले. अशा प्रकारे त्यांचा धीर चेपत होता. अन् त्यांना गर्दीचा, वाहनांचा सराव होत होता.

(पुढील अंकी चालू)



महाराष्ट्र बँक सादर करीत आहे

चित्रबोध - शब्दशोध



महाराष्ट्र बँकेत, चौदा वर्षांच्या मुलामुलींना आपल्या नावाने खाते सुरू करता येते.
आता पहिली गोष्ट तुम्ही कोणती करणार ?
अर्थातच महाराष्ट्र बँकेत तुमच्या नावाचे खाते उघडणार !
मग उशीर कशाला ?

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. चित्रांना व चौकोनांना क्रमांक दिले आहेत. प्रत्येक चित्र पाहून त्यात दिसणाऱ्या वस्तूचे नाव, वर्णन, माणसाच्या चेहऱ्यावरील भाव, निसर्गदृश्य इत्यादींवरून सूचित होणारा योग्य शब्द चौकोनात भरायचा आहे.

कोड्याचे उत्तर जुलैच्या अंकांत


आई








छायाचित्रकार
आर्. बी. शिंदे
कोल्हापूर










राम आणि श्याम... चालले शिकारीला
वेगाने निघाले राम श्यामचे जेट, क्षणात पोहोचले आफ्रिकेला थेट
राजा तेथला खूप खूष झाला, त्याने त्यांच्या रक्षणाचा बंदोबस्त केला
शिकारीचा झाला सुरू पहा खेळ. चला जाऊ पहायला, लावू नका वेळ
फळांच्या झाडांवर माकडे खूपखूप, मजेत होती करीत सारखी हूप हूप
माकडांनी श्यामला घातला घेराव, पॉपिन्सपुढे फळांना देतो कोण भाव?
पॉपिन्सच्या बघताच गोड गोड गोळ्या. फळे टाकून धावल्या माकडांच्या टोळ्या
रसदार मनपसंत मजेदार
पारले पॉपिन्स
फळांच्या चवीच्या गोळ्या
५ फळांच्या चवी—
रास्पबेरी, अननस,
लिंबू, संत्री व मोसंबी.
प्रत्येक पॅकेटमध्यें १३ स्वादिष्ट गोळ्या.
PARLE POPPINS MIXED FRUITY SWEETS